# श्रीमद्यशवंतरावमहाराज

ऊर्फ देवमामलेदार

या वदान्य व थोर सत्पुरुषाचें चरित्र.

हें

रा. रा. केशव सदाशिव रिसबुड, संगमनेरकर

यांनी तयार केलें.

त्याची दुसरी आवृत्ति.

पुस्तककर्त्यांच्या परवानगीनें

गजानन चिंतामण देव

यांनी छापवून प्रसिद्ध केली.


सन १८९६

सोलएजंट.

जनार्दन बाळकृष्ण परांजपे

बुकसेलर व पब्लिशर

पुणें. पेठ बुधवार.


किंमत १ रुपाया.

पुणें.
श्रीविठ्ठल छापखान्यांत छापिलें.
( सन १८६७ च्या २५ अक्टाप्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व अधिकार ग्रंथकर्त्यानें आपणाकडेस ठेविले आहेत. )

---

विक्रीसतयार.
इंदूर संस्थानच्या महाराणी अहल्याबाईसाहेब होळकर यांचें चरित्र. पृष्ठें १७५ सोनेरी बांधणी. किंमत १। रु. ट. ख. ८=
जनार्दन बाळकृष्ण परांजपे.
बुकसेलर बुधवारपेठ पुणें.

# "देवमामलेदार" पुस्तकाची प्रस्तावना.

ज्याच्या नांवाचा डंका या भारतींत उत्तरेस हिमाचलापासून दक्षिणेस लंकाद्वीपापर्यंत सारखा गाजून राहिला; जो एक मूळचा सामान्य गृहस्थ असतां केवळ आपल्या गुणकर्तृत्वसत्याचरणादिकींवरून महापुरुष हें नांव पावून जगन्मान्यतेनें सर्वत्र वंदनीय झाला ज्याच्या दर्शनसंभाषणाबरोबर मनाची भ्रांति फिटत गेल्यानें सर्व पाप व ताप हरले जाऊन, हृदयप्रांतीं शांति स्थिरावून, ज्याच्या चरणीं विश्रांतिच वाटावी; जो जगत्‌कुटुंबी होत्साता समदृष्टीनें भूतमात्रास नम्र होऊन तनुमनधनेंकरून सदां परोपकारींच रत झाला आणि ज्यानें इहलोकींचें आपलें सर्व अवतारचरित्र संपवून ह्या जगतितळावर आपला दिव्य व भव्य असा उभारलेला कर्तृत्वकीर्तिध्वज अक्षय फडकत ठेवून नुकतेंच परलोकीं प्रयाण केलें. अशा त्या परममंगल महापुण्यश्लोक जगद्वंद्य साधुवर्य श्रीमद्यशवंतराय महाराजांच्या अखंड स्मरणार्थ त्यांचा साद्यंत इतिहासलेख असणें हें जगाच्या मोठ्या अगत्याचें काम आहे, हें जाणून; आणि नाशिक येथें त्यांच्या नांवानें स्थापन झालेल्या स्मारकवर्गणीमंडळींची, महाराजांचें चरित्र पुस्तक करणारास इनाम मिळण्याविषयीं तारिख २९ माहे फेब्रुआरी सन १८८८ इसवीची नाशिकवृत्तांत छापलेली जाहिरात अवलोकन करून; त्या सर्व भाग्यशाली महापुरुषाचें हें खऱ्या माहितीनें यथातथ्य चरित्र लिहून "देव मामलेदार" ह्या नांवानें त्याची सर्वत्र प्रसिद्धि असल्यावरून तेंच नांव ह्या पुस्तकास दिलें आहे.

आतां ह्या यशावर्धक, पूज्य व सर्व संग्रहार्ह पुस्तकास लोक हस्तें परहस्तें आपला उदाराश्रय देऊन ह्या नेत्रहीन ग्रंथकर्त्याची पुढील उमेद कायम राखितील असा पूर्ण भरंवसा आहे.

ग्रंथकर्ता
**के. स. रि.**

---

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

ह्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तींत कांहीं तशाच समजुतीमुळें अथवा नजरचुकीमुळें ज्या कांहीं चुका राहिल्या होत्या त्यांची या नवीन आवृत्तींत सर्व यथातथ्य दुरस्ती केली आहे. शिवाय पहिली आवृत्ति निघाल्यापासून पुढील पांच वर्षांच्या अवधींत ह्मणजे शके १८१५ अखेर पार्वतों महाराजांच्या प्रतिवार्षिक उत्साहांची स्थिति, त्यांच्या स्मारक फंडास मिळालेला द्रव्याश्रय, त्याचप्रमाणें श्री नरसिंहाचें मंदिर व त्यांची छत्री यांचें काम कितपत तयार झालें आहे इत्यादि गोष्टींची पुस्तकाचे शेवटीं ताजाकलमाखालीं माहिती दिली आहे.

सूचना—ज्या पुस्तकाच्या टायटल पेजवर ( मुखपत्रावर ) ग्रंथकर्त्याच्या नांवाचा छाप नसेल ती प्रत कोणी घेऊं नये.

मुक्काम धुळें तारीख २९ दिसेंबर सन १८९९ इ०

के. स. रि.
ग्रंथकर्ता.

---

ह्मणावयास लागून सर्वतोमुखीं " यशवंतराव महाराजकी जय " असा ध्वनी निघूं लागला. कित्येक भोळेभाविक लोक आपल्या हेतुकार्यसिद्धीस्तव महाराजांचा स्तव करून नवस करूं लागले व कित्येक स्त्रीपुरुष आपल्या मुलाबाळांसह महाराजांच्या दर्शनास येऊन नारळ फोडून शेरण्या वांटूं लागले.

असा सर्वत्र जयजयकार चालला असतां कित्येक परोत्कर्षाऽसहिष्णु वरिष्ठ अधिकाऱ्यांस महाराजांचा हा उत्कर्ष सहन न होऊन, त्यांनीं मत्सरभावानें त्यांजवर कांहीं थोतांड उभारून महाराजांची योग्यता कमी होईल, अशा खटपटीनें त्यांस सरकारी नौकरींतून अलग राहून दहा महिने घरीं बसण्याचा दुर्धर प्रसंग आणिला; परंतु महाराजांची ईश्वरनिष्ठा, सत्याचरण, समयधीरता व दीर्घ यत्न यांहींकरून परिणाम सर्व गोड होऊन, सन् १८६३ अखेर पुन्हां त्यांस खानदेश जिल्ह्यांतील सुलतानपूर ऊर्फ शहादें तालुक्याचे मामलतीची जागा मिळून, ते त्या ठिकाणीं रुजू होण्यास अमळनेराहून निघाले. ( ह्या गोष्टीची साग्र हकीकत चवथ्या प्रकरणांत अमळनेर सदराखालीं दिली आहे, तिजवरून कळेल. )

## शहादें सुभ्याची कारकीर्द.

शहादें तालुका आधींच मोठा सुपीक, केवळ सोन्याचा तुकडा; व त्यांत खाऊन पिऊन सुखी अशा शेतीवाल्या गुजर लोकांची मोठी वस्ती; व तसेच लोकही मोठे भोळेभावीक; अशा त्या तालुक्याचे मुख्याधिकारी यशवंतराव महाराज हे होऊन ते शहाद्यास दाखल होण्यांस अमुक दिवशीं खास येणार, अशी महाराजांच्या येण्याची भुमका एक दोन दिवस अगोदरच तालुक्यांत कर्णोपकर्णीं पसरली होती. मग तो लोकांचा आनंद काय सांगावा !! गांवोगांवांहून आपापल्या सुंदर देखा-

त्याच्या चौकटीदार छत्र्यांच्या सुशोभित केलेल्या गाड्यांस तुळतुळीत व उत्तम देखण्या खिल्लारी वगैरे बैलांच्या शृंगारलेल्या जोड्या जुंपून, वर आरूढ होऊन गाड्या पिटवीत, त्या बैलांच्या पैंजणघांट्या–घुंगुरमाळांच्या होत असलेल्या घणघणाट नादांत, गुजर आदिकरून लोक; तसेच गाड्यांघोड्यांवरून गांवांतील कित्येक शेटसावकार व शिष्ट संभावित गृहस्थ; असे सुमारें दोन तीनशें लोक आपल्या हद्दींतील तापी–नदीतीरच्या सारंगखेडें नामक गांवापर्यंत महाराजांस मोठ्या आनंदानें सामोरे जात आहेत, तोंच तेथून जेवणखाण वगैरे आटोपून महाराजांची सर्व खटल्यासह निघण्याची तयारीच होती.

मग जो तो मोठ्या उत्साहानें महाराजांच्या चरणीं लीन होऊन, त्यांस त्यांतील एका उत्तम मृदु बिछायतीच्या गाडींत बसवून सर्व लोक निघून त्वरेनें एक सारख्या चढा ओढीनें गाड्या पळवीत चालले. ( उत्तम गाड्या व बैल बाळगण्याची आणि एकमेकांच्या ईर्षेनें जिवाकडे न पाहतां गाड्या भरधांव पिटवीत नेण्याची या तालुक्याची खानदेशांत मोठी प्रसिद्धी आहे. ) शहादें गांवानजीक महाराज मंडळीनिशीं येऊन ठेपण्यापूर्वींच तेथें भिक्षुकादि याचक हातांत नारळ घेऊन, तसेच सभ्य गृहस्थ, शेटसावकार आणि प्याद्यांशिपायांसह कचेरींतील सर्व नौकर लोक वगैरे ग्रामस्थ मंडळी तासे व जंत्र्यांनिशीं उभी होतीच. इतक्यांत कांहीं अंतरावर होत असलेला “ जय यशवंतराव महाराजकी जय ” असा जयघोष कानीं पडतांच, जोडसनयांचे पूर्व रागावरील सुस्वर आलाप, जोडताशांचा कडकडाट, शिंगांच्या तालतालावरील गर्जना, हलक्यांचा करनाटकी तालाचा टिमटिमाट, बंदुकांचा धुमधडाका आणि भाट लोकांच्या शुभदायक कवितांच्या ललकाऱ्या इत्यादिकांनीं अंबर एकच दुमदुमून गेलें.

मग महाराजांची स्वारी त्या सुस्थल मैदानांत, घालून ठेविलेल्या बिछायतीवर येऊन, त्यांनीं प्रथम भिक्षुक ब्राह्मणांस मोठ्या नम्रतेनें वंदन करून, त्यांजकडून नारळ व अशिर्वाद घेऊन त्या सर्वांस रौप्य दक्षिणेनें संतुष्ट केलें, आणि मग सर्व मंडळीच्या भेटी मोठ्या प्रेमानें घेऊन त्यांसह महाराज खालीं बसले. पुढें सन्मानाची पानसुपारी अत्तर गुलाब होत आहे, तों अगदीं अस्तमान होऊन मशाली प्रज्वलित झाल्या. मग मोठ्या आनंदाच्या गजरानें मंडळीसह महाराज पादचारीच वेशीपाशीं येऊन ठेपतांच श्री ग्रामदेवतेस नमस्कार करून गावांत प्रवेश करून चालले गांवामध्यें महाराजांच्या मार्गांतील दुतर्फा घरांच्या ओट्यांवरून दिवे लावून घरवाले, व स्त्रिया—मुलांबाळांसह त्यांच्या दर्शनेच्छेनें बसले होते. त्यांचे पायां पडणें व मुखानें वेळोंवेळीं जयजयकार करणें चालून, त्यांस राहण्यास सिद्ध करून ठेविलेल्या स्थळीं पोंचवून निरोप घेऊन मंडळी घरोघर गेली.

शहादें येथें महाराज हे रुजू होऊन, सन् १८६४ सालापासून अजमासें तीन चार वर्षें आपलें काम करीत असतां सर्व प्रजाजनांस केवळ विश्रांतिस्थानच होऊन राहिले. त्या वरदी पुरुषाच्या घरीं अथवा दरबारीं येण्याजाण्यास कोणास केव्हांही वर्दी किंवा अटक नसल्यानें त्यांजभोंवतीं नेहमीं लोकांची गर्दी असे. तेणेंकरून कोणी कसाही दुःखी दर्दी आला असतां त्याची दाद महाराजांपाशीं तत्काल लागून त्यास ते धीर देऊन स्थिर करीत कोणाचा कधींच तिटकारा किंवा रोष न करितां सर्वांस होईल तितक्या प्रकारें सुखसंतोष देण्याविषयीं त्यांचा यत्न असे व त्या यत्नाप्रमाणें लोकांचा कार्यभाग साधून येईपर्यंत ती तळमळ त्यांचे जिवास पळ पळ असावी. सन् १८६४ च्या मार्च महिन्यांत माझी शहादें येथील शाळेवर हेडमास्तराचे जागीं अव्वल नेमणूक होऊन मी तेथें गेल्यावेळीं, महाराजांनीं आपले

येथेंच माझें बिऱ्हाड लावून घेऊन माझी सर्वपरी घराप्रमाणें व्यवस्था ठेविली. त्याप्रसंगीं महाराजांची वर दर्शविलेली खरी तळमळ माझ्या प्रत्यक्ष अनुभवास आली. मी आपले कामीं रुजू होऊन पुरे पंधरा दिवस झाले नाहींत, तोंच पुन्हा धुळें येथें माझी दुसरी योजना होऊन, त्वरित परत निघून येण्याविषयींचा रावसाहेब काशिनाथ महादेव थत्ते डे० ए० इन्स्पेक्टर यांचा हुकूम येऊन थडकला. माझें कमनशीब कीं, अशा महाभाग्यशाली सत्पुरुषाच्या समागम—सुखास अल्प कालांत अंतरून मला तेथून निघणें भाग पडलें. त्यावेळीं महाराजांनीं, थेट तीस कोस धुळ्यापर्यंत घरची गाडीबैल शिपाई व वाटखर्चीसह बेगमीचें फराळाचें बरोबर देऊन माझी रवानगी बंधुप्रेमानें करून दिली. अहा हा हा ! काय ही आस्था ! काय तो कळवळा ! प्रत्यक्ष मातापितरांसही तो येणें नाहीं. असो, मागें येरंडोल व अमळनेर तालुक्यांतील त्यांच्या कारकीर्दींत सांगितलेले त्यांचे आंगचे लोकोत्तर गुण व अद्भुत दातृत्वशक्ति यांचा अघटित महिमा देशोदेशीं अधिकाधिक प्रसृत होत चालल्यामुळें लांबलांबून धर्मार्थी, अर्थार्थी, कामार्थी आणि मोक्षार्थी असा चतुर्विध जनसमुदाय महाराजांच्या दर्शनास मोठ्या उत्साहानें येऊन कामना पूर्ण होत्साता त्यांस आशिर्वाद देत व जयजयकार करीत, आपापल्या हेतुस्थलाचा आनंदानें मार्ग धरी.

अशी सर्वत्र स्थिति यथास्थितपणें चालली असतां महाराजांच्या उभयतां वृद्ध मातापितरांच्या परलोकगमनानें त्यांस परम उद्विग्नता प्राप्त झाली. उघडच आहे, ज्यांनीं जन्म देऊन रजाचा गज करून एवढ्या स्थितीस आणिलें, त्या मातापितरांचा आल्पावकाशांत अक्षय वियोग झाल्यानें जो सत्पुत्र ह्मणून आहे, त्यांस कधींही दुःख झाल्यावांचून राहणार नाहीं. परंतु महाराजांच्या आंगीं विचारशक्ति जागृत असल्यामुळें तें वियोगजन्य

दुःख आवरून त्यांनीं आपल्या नित्यक्रमांत अंतर पडूं दिलें नाहीं. आतां येथें जरी थोडें विषयांतर होणार, तथापि अवश्य वाटल्यावरून त्या वृद्ध मातापितरांच्या पूर्वींच्या आणि सांप्रतच्या स्थितीचें थोडक्यांत दिग्दर्शन याखालीं करीत आहे.

महाराजांच्या तीर्थरूपमातुश्रींनीं ईश्वरी निष्ठा ठेवून पूर्वकाळांत बहुतगरीबीनें दिवस काढिले होतें; परंतु पुढें लवकरच त्यांची सबळ पूर्वपुण्याई त्यांस फळास येऊन त्यांची ती सर्व विपत्ति दूर झाली. त्यांचे आठजण मुलगे एकापेक्षां एक शहाणें होऊन क्रमानें सरकारी नोकरीच्या रोजगार धंद्यास लागले. जरी अन्नोदकऋणानुबंधानें आठदिशांस पांगले होते, तथापि आठांकडून आठ मुठींची घरीं मदत होत गेल्यामुळें त्यांचा नित्यक्रम यथास्थितपणें चालूं लागला. आठही पुत्र कमावते असून आज्ञाधारक असल्यानें त्यांच्यासारखे सुखी मातापितर दुसरे क्वचितच आढळूं लागले. पुढें महाराजांस सुभेदारी प्राप्त झाल्या दिवसापासून त्यांनीं त्यांस आपल्या जवळ आणून त्यांची स्वहस्तें सेवाकरून उत्तम शुश्रुषा राखिली. नित्य कचेरींत व समयानुसार गांवगन्ना फिरण्यास, अथवा दुसऱ्या एखाद्या कामास उभयंतां वडिलांचे चरणीं मस्तक ठेवून त्यांनीं जात असावें. आपल्या यशवंत पुत्राची दिगंतरीं ख्याति गाजून हजारों लोक व याचकजन याच्या दर्शन भेटीसाठीं धांव घेऊन येत आहेत, आणि सर्व राजवैभव घरीं अखंड नांदत आहे, असें पाहून त्या वृद्धद्वयांस पुत्राचें मोठें कौतुक वाटून मातुश्रीनें महाराजांची प्रेमानें दृष्ट काढून निंबलोण करीत असावें. असें सर्व पुत्रवैभवसुख भोगून, स्नानसंध्येंत व हरिभजनांत आनंदानें काळ क्रमीत असतां, सन १८६६ ह्मणजे शके १७८८ ह्या वर्षी एके दिवशीं वृद्ध महादेवपंतांनीं यशवंत पुत्राच्या मांडीवर आपला देह ठेविला. पुढें सव्वा वर्षाच्या आंत-

ग. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

च मातुश्री हरिबाई त्याच पुत्राच्या हस्तें जान्हवी तोय प्राशन करून निजधामास गेल्या. असो.

शहादें हा गांव त्यासमयीं आनंदाचें एक क्षेत्रच होऊन जिकडे तिकडे "यशवंतराव महाराज" हा ध्वनि घुमूं लागला अशा ह्या सत्पुरुषाच्या सुसमागमाचा वियोग होण्याचा प्रसंग सन् १८६७ सालीं शहादें तालुक्यास येऊन ठेपल्यामुळें जो तो "देवा, तुला आमची कींव न येऊन हा आमचा सुखाचा ठेवा विरदेल ऊर्फ शिंदखेडें तालुक्याचे हातीं कसा रे दिलास" असे दुःखोद्गार टाकीत तळमळ करून हळहळूं लागला. सावकार लोकांनीं महाराजांस उसनवार दिलेल्या पैशाची मागणी न करितां, आणखी कांहीं गरज पडून प्रसंगविशेषीं आज्ञा होत गेली असतां आह्मी सेवेंत तत्पर आहोंत, अशा विनंतीनें मोठा सत्कार करून सर्व बेबुदीनें खटल्यानिशीं शिंदखेडें येथें त्यांची रवानगी करून दिली.

## शिंदखेडें सुभ्याची कारकीर्द.

सन् १८६७ पासून सुमारें अडीच वर्षें महाराजांचें ठाणें शिंदखेडें येथें होतें. ह्या काळांत तालुक्यांतील सर्व लोकांस शिंदखेडें हा गांव केवळ विश्रामधामच होऊन राहिला होता. कोणी कसाही दुःखी, कष्टी, विरही अथवा उदासीन जन असो; परंतु तो या महाराजांच्या आनंदभुवनांत सकाळ संध्याकाळ देवपूजेच्या समयीं चार घटका जाऊन बसला कीं, तो तेथें तल्लीन होऊन त्याचे त्रिविधताप दूर व्हावे. महाराजांची ती आसनावर बसलेली सानंद शांतमूर्ती; त्यांचीं तीं कडकडीत स्वच्छ वस्त्रेंपात्रें; तो पूजेचा राजविलासी थाट; तो तुळशी व पुष्पांचा दरवळून राहिलेला सुवास; तो समयांचा तसाच घृत पूरित उज्वलित केलेल्या नीरांजन दीपांचा व कर्पुराचा लखलखाट;

तो अगरबत्त्यादि सौगंधिक द्रव्यांचा घमघमाट; महाराजांच्या डावे बाजूस उपाध्यायाची पूजा सांगण्याची लगबग, शागीर्दांची महाराजांच्या हातांत पूजाद्रव्यें देण्याची ती धांदल; उजव्या बाजूस पुराणिकाचें तें भागवत पुराण; समोर तें गवयाचें सुस्वर गायन; दुतर्फा हारीनें पूजेचा तीर्थप्रसाद घेण्यासाठीं बसलेली कचेरींतील वगैरे ग्रामस्थ व परग्रामस्थ मंडळी; सभोंवतीं नानाविध याचकजन उभे असून जोरानें आपापल्या अपेक्षित याचना करीत असतां, वस्त्र, पात्र, अन्न, द्रव्यादिकांची योजना लावून, तें तें त्यांस देण्याविषयीं महाराज आपल्या कारभाऱ्यांस आज्ञा करीत आहेत; मधून मधून एका मागून एक परग्रामस्थ स्त्रिया व पुरुष आपल्या परिवारासह दर्शनास येऊन नारळ फोडून नवसाचे प्रसाद वांटीत आहेत; त्यांतून कित्येक नाना वासना दाखवून आपल्या कामना पूर्ण होण्याविषयीं प्रार्थीत असतां महाराज त्यांस आशिर्वाद देऊन देवाराधना करण्याचें सांगत आहेत; सहस्त्रनाम तुळशींसह पूजा नैवेद्य होऊन मोठ्या गजरानें आरती व मंत्रपुष्पांजलि झाल्यानंतर मुखानें विष्णुसहस्त्रनामाचे पाठ चालून आश्रितजनांसह महाराज देवास प्रदक्षिणा घालिताहेत; इकडे ओसरीवर पांथस्थ ब्राह्मणभोजनासाठीं सोवळें नेसण्याच्या तजविजींत आहेत; आणि घरांत पात्रें मांडून वाढण्याची सुरवात आहे; अशा त्या सत्पुरुषाच्या आनंदभुवनांतील राजवैभवतुल्य तो अपूर्व रम्य देखावा पाहून कोण दुःखीजन विराम पावणार नाहींत ! याकालीं मी शिरपूर येथें तालुकामास्तर असून तेथून शिंदखेडें सहा कोशांच्या टप्प्यांत नजीक असल्यानें मीं मधून मधून सुटींत महाराजांच्या दर्शनास जाऊन येत असावें. तेव्हां वेळोवेळीं हा पूजेचा थाट अवलोकनांत येऊन माझ्या सर्व मनोव्यावृत्ती चार घटका दूर होऊन मला मोठा आनंद व्हावा.

अशा या अखंडित राजैश्वर्यमंडित महा पुरुषाच्या समागमाचीं अडीच वर्षे शिदखेडकरांस तितक्याच दिवसांप्रमाणें झालीं. पुढें बागलाण ऊर्फ सटाणें तालुक्यास महाराजांचें स्थलांतर झाल्याचा हुकूम येऊन ठेपल्याचें कानीं पडतांच त्या वियोगवार्तेनें कित्येक स्तब्ध झाले. कित्येक ही गप्प असेल ह्मणून शोध घेण्यास महाराजांच्या वाड्याकडे जात असतां त्यांस, त्या खऱ्या बातमीनें तिकडून खिन्न होऊन आलेले लोक मार्गांत भेटून, तेथूनच तेही कष्टी होऊन घरास परतले. सारांश, सर्व गांव चार घटकांत उदासीनसा दिसूं लागला.

आतां महाराजांचा वियोग थोडकेच दिवसांत होणार, असें जाणून तालुक्यांतील लोकांची महाराजांच्या दर्शनास येण्याची एकसारखी गर्दी होऊं लागून, आंत लौकर रीघ न होई असा त्यांजभोंवतीं लोकांचा नित्य परिघ पडूं लागला. आपल्या हातून महाराजांची कांहीं तरी शेवटील सेवा घडावी, यास्तव गांवगांवचे कित्येक पाटील वगैरे लोक, महाराजांचें खटलें सटाण्यास पोंचवून देण्यासाठीं माणसांसह आपापल्या घरची एकेक गाडी त्यांच्या निघण्याच्या पूर्वदिवशीं घेऊन शिंदखेडयास आले. ( यांतच शिंदखेड नजीकच्या पाटण गांवच्या सत्राचौधरी पाटलाची एक गाडी होती. या पाटलाच्या संबंधानें एक विशेष चमत्काराची गोष्ट घडून आली ती चवथ्या प्रकरणीं शिंदखेडें सदरा खालीं दिली आहे. )

महाराजांच्या तैनातीस दाखल झालेल्या पन्नास, साठ गाडयांपैकीं कांहींतून ज्यास जितकें थोडें फार सामान मिळालें तितकेंच त्यानें आपल्या गाडींत भरून त्या ओझ्याच्या गाडया पहांटेस पुढें मार्गास लागल्या. पुढें दोन प्रहरीं भोजनोत्तर निघण्याची सर्व तयारी होऊन स्वाऱ्यांच्या गाड्या भरल्या. इकडे

महाराज गांवांत झालेल्या पानसुपाऱ्या घेत घेत वाटेवर नदीच्या वाळवंटांत घालून ठेविलेल्या बिछायतीवर मंडळीनिशीं येऊन ठेपले, आणि तेथें भिक्षुक ब्राह्मणांस योग्यतेची दक्षिणा वांटून त्यांनीं त्यांजकडून नारळ सुपारीसह आशिर्वाद घेतले. नंतर मंडळीस महाराजांकडील पानसुपारी होऊन त्यांनीं प्रेमानें सर्वांच्या प्याद्यां शिपायांसह भेटी घेतल्या. इतक्यांत घरमंडळीच्या गाड्या येऊन ठेपल्या. त्यांजबरोबर खुद्द महाराजांसाठीं सिद्ध होऊन आलेल्या स्वतंत्र गाडीजवळ महाराज येऊन सर्वांचा निरोप घेऊन " जय श्रीनृसिंह " ह्मणून महाराज गाडींत बसले, तों सर्वतोमुखीं " जय यशवंतराय महाराजकी जय " असा एकच गजर होऊन सर्व वाळवंट दणाणून गेलें. महाराजांबरोबर धुळ्यापर्यंत जाण्यासाठीं कित्येक पाटील वगैरे आपापल्या निराळ्या गाड्यांतून बसले; मग शिपाई–मशालजी–गड्यां–माणसांसह सर्व गाड्या नदीच्या पैलतीरास जाऊन पुढें चालू झाल्या. इकडे मंडळी महाराजांचा स्तव करीत, व त्यांजकडे वरचेवर सिंहावलोकन करीत मोठ्या खिन्नतेनें आपापल्या घरास गेली.

महाराजांस धुळ्यास पोंचवून बरोबर गेलेली शिंदखेडकर वगैरे मंडळी आपापल्या गांवास परत चालती झाली. धुळें हा गांव जिल्ह्याचा, तशांत पूर्वींच्या ओळखीचा संबंध; व शिवाय अलीकडील महाराजांच्या साधुत्वाचा सल्लौकिक यांहीं करून त्यांचा तेथें तीन दिवस मुक्काम झाल्यामध्यें त्यांच्या दर्शनेच्छेनें सर्व धुळें एकदम हालून यात्रे प्रमाणें गजबजून राहिलें होतें. धुळें येथील प्रसिद्ध घरंदाज गृहस्थ श्रीमंत रा० रा० शामराव रामचंद्र ऊर्फ बापू साहेब गरुड यांचे घरीं महाराजांस मोठी टोलेजंग मेजवानी झाली. पुढें धुळेकरांचा निरोप घेऊन महाराज हे सटाण्यास जाण्यास मार्गस्थ झाले.

## सटाणें सुभ्याची कारकीर्द.

महाराज हे आपल्या नेमणूकीच्या सटाणें गांवीं दाखल होऊन त्यांनीं आपल्या कामाचा च्यार्ज सन् १८६९ सालीं घेतला सर्व पाप हरण करून जन्ममरणव्यावृत्ति चुकविणारे असे महाराजांचे पुण्यचरण आपल्या पूर्व सद्भाग्येंकरून या तालुक्यास लागले, ह्मणून सर्व बागलाणकर तनुमनांतःकरणपुरःसर त्यांचे धूलदर्शनास येऊन शरण गेले.

मागून कसोटीस लागून लागून तालुका तालुक्याच्या परिक्षेंत पसंत ठरलेलें जें निव्वळ बावन्न कशी सोनें तेंच बागलाणकरास अनायासें लाभलें, त्यापेक्षां आतां त्याच्या जास्त परीक्षेची अपेक्षा उरली नाहीं, ह्मणून ह्मणा; अथवा इतर ठिकाणापेक्षां त्यांतील लोक अधिक निष्ठावंत, ह्मणून ह्मणा; परंतु त्यांतील व्यक्तिमात्रास महाराजांची परम भक्ति जडून त्यांची उक्ति शिरसा मान्य करीत होत्साता आपल्या शक्ति प्रमाणें जो तो त्यांच्या सेवाभजनीं लागला. महाराजांच्या दर्शनासाठीं तालुक्यांतील लोकांची नित्य यात्रा वाहूं लागली. ह्यांत एकादशीस अथवा एखाद्या तिथीपर्वणीस तर इतकी यात्रेची गर्दी होऊं लागली कीं, कित्येकांस दर्शन घेण्याची लौकर संधि मिळूं नये. गर्दीच्या ठिकाणीं पोलीसचे शिपाई बंदोबस्तार्थ उभे राहूं लागले. तेव्हां तेथील आरामनदीरूप चंद्रभागेच्या तीरीं, तें सटाणें गांव पंढरपूरसें वाटून त्यांत महाराज हे श्रीपंढरीनाथच भासूं लागले.

कोणाचें अमळ कांहीं दुखलें खुपलें किंवा कांहीं संकट अडचण पडली, कीं लागलीच नवस होऊन मनाप्रमाणें घडतांच गांवोगांव महाराजांच्या नांवें गुळाच्या वगैरे शेरण्या वाटूं लागल्या. ( ह्या तालुक्यांत गुळाचें उत्पन्न मोठें आहे. ) महाराजांसंन्निध सटाण्यास जाऊन कित्येकांच्या गुळाच्या तुळा होऊन तो गुळ घरो-

घर वाटूं लागला; गांवांतील पुरुष, स्त्रिया, मुलें फावल्यावेळीं नित्य दर्शन घेऊं लागलीं; कित्येक तर महाराजांच्या दर्शनाशिवाय अन्न ग्रहण न करणारे असे नेमिष्ट बनले. महाराजांचा कचेरीस जाण्याचा मार्ग व देवदर्शन वगैरेकडे जाण्यायेण्याचे रस्ते, दुतर्फा घरवाल्यांनीं आपल्या हद्दी हद्दीपर्यंत झाडून त्यांजवर स्त्रियांनीं सकाळ संध्याकाळ तर सडे घालून गुलालमिश्रित रांगोळ्याचे पट्टे रेखून आंतल्या बाजूस चित्रविचित्र कुशलतेच्या रांगोळ्या काढाव्या व उन्हाळ्यांत छायेसाठीं हिरव्या पालवीचे मांडव घालावे. सायंकाळीं महाराज घरीं येण्याचे सुमारास शक्त्यनुसार दिवे लावावे यामुळें तेथें नित्य दिपवाळीच नांदत असल्याचा भास होऊं लागला.

डोकीवर जटाभार, सर्वांगास चर्चिलेली रक्षा, कंबरेस कौपीन काखेंतून सावयव मृगाजिनांच्या गुंडाळ्या, नखें वाढलेल्या, हातांतून सोटे लोटे, आंगावर गळ्यास बांधलेलें एखादें वस्त्र, व मुखानें सीताराम किंवा भोलानाथ उच्चारीत आहेत, अशा गोसावी बैराग्यांच्या अनेक तेजःपुंज भव्य मूर्ति गांवांत थडकून अड्डे लावून धुन्या पेटवून कोणी पंचाग्नि—साधन करीत, कोणी समाधि लावून कोणी जप करीत ध्यानस्थ असे बसलेले असून, कोणी थाटाचे देव्हारे मांडून सकाळ संध्याकाळ भोगयुक्त पूजा व कृष्णजीच्या झोंकदार झांक्या दाखवून, व वड्याळ—झांजा—खंजिऱ्याच्या नादतालावर मोठ्या गजराच्या आरत्या करून, शंखांचे नाद घुमवीत आहेत; वासुदेव, पांगुळ, बाळसंतोष या त्रिविधजनांचा टाळचिपळ्यांच्या तालावरील हरिनामाचा घोष व पोंवाबासरींचे मंजुळ ध्वनि नित्य प्रभातकालीं लोकांस जागृति देऊं लागले; डमरूवाले जोशी यांचा डमरूवाद्याचा गुडगुड नाद उमटूं लागला; गोंधळ्यांच्या कृष्णलीलापर लावण्या व प्रतापी पुरुषांचे पवाडे संबळांच्या कडकडाट तालावर फटकारूं लागले; जंगमांची

तंबुरीच्या सुरांत घंटेच्या सतत चाललेल्या घुंकारयुक्त नादांत टाळखंजिरीच्या तालावरील शिवलीलापर चालिचालींचीं मधुर पदें आणि अनेक तालमोहऱ्यावर शंखांचे झणत्कारयुक्त चाललेले मधुर नाद गुंग करून दंग करूं लागले; वाघ्यामुरळ्यांचीं घंटेच्या घणघणयुक्त नाद तालावरील गाणीं ऐकूं येऊं लागलीं; चोखामेळ्यांच्या जोडप्यांची. तंबुरी-टाळ-ढोलकींच्या स्वर तालावर कृष्ण—लीलापर नानाचालींचीं मधुर आलापयुक्त पदें व तसेंच अभंग नादाऊन तेथेंच तनुमन वेधूं लागलें; कानफाट्यांचीं किंगरीच्या सूरतालावरील गोपीचंदाचीं आणि काठेवाडी टिंगरीवाल्या कबीरपंथी अनाथ जोडप्यांचीं हृदयास द्रव उत्पन्न करणारीं वैराग्ययुक्त गाणीं मनास उपरति देऊं लागलीं; आंधळ्या स्त्रीपुरुषांच्या माळा, पुढील एका डोळस माणसाबरोबर चालून त्यांचा “ दे दाता, आंधळयाला एक पैसा ” असा दैन्ययुक्त गजर होऊं लागला; फकीरांचे सवाल “ महाराजका भला होयगा, सबका भला होयगा ” अशा पुकारणीनें उमटूं लागले; नानकशाईच्या सोट्यांचा खणखणाट व शिद्यांच्या नारळांचा खुळखुळाट कानीं पडूं लागला; वीणा मृदंग मंडळीसह हरिदास लोकांचीं तट्टें व गाड्या, गांवांत प्रवेश करूं लागल्या; मोठमोठे गवई, बजवई व अनेक तंतुवाद्यकार आपापल्या वाद्यांसह गांवांत ठिकठिकाणीं उतरलेले आहेत; वैदिक ब्राह्मण, शास्त्री, पुराणिक यांचे अनुक्रमें वेदघोष, शास्त्रचर्चा, पुराणें चालू आहेत; नाटककारांचे तळ पडून राहिलेच आहेत; इत्यादि नानाविध याचकांच्या झुंडीच्याझुंडी नित्यशः गांवांत दाखल होऊन, ज्यांच्या त्यांच्या गुणकर्तृत्वाच्या हजऱ्या महाराजांच्या खाजगी दरबारांत झडूं लागल्या व तशाच महाराजांकडूनही योग्यतेनुरूप त्यांच्या संभावना, बिदाग्या, खैराती मोठ्या गौरवानें चालू राहून, त्या याचक जनांत “ महाराजांचें

असेंच अखंड ऐश्वर्य नांदून जयजयकार असो " असे वारंवार ध्वनि प्रकट होऊं लागले; कित्येक वारांगना व नाटकशाळा आपल्या सर्व साजिंद्यांसहवर्तमान महाराजांच्या दर्शनास येऊन निरिच्छ बुद्धीनें आपल्या हजऱ्या देण्याविषयींचा हेतु दर्शवीत असतां त्यांस महाराजांनीं " बरें आहे बाई, चालूं द्या. " असें नम्रतेनें बोलून त्यांचें तें नृत्यगायनादि दोन घटका ऐकलेंसें करावें आणि त्यांची इच्छा नसतां त्यांस चोळी व वाटखर्चीसाठीं ह्मणून बळेंच कांहीं द्रव्य देऊन त्यांच्या पाठवण्या कराव्या; व तसेच तमासगिरांचे सजलेले फड हजरीसाठीं आले असतां त्यांचा तिटकारा न करितां घटकाभर तेही गाणें महाराजांनीं ऐकून त्या नटास 'मुला' ह्मणून हाक मारून खाऊसाठीं पांच चार रुपये देत असावें. असो. कोणाचा राग, त्रास किंवा मनोभंग न करितां सर्वत्रांस सुखसंतोष होईल, अशाविषयीं महाराजांची फारच जपणूक असे. शिवाय वर सांगितलेल्या साधुवृंदांस व इतर सर्व याचकजनांस दीड दोनशें पक्के शिधे वांटलें जाऊन, घरीं नित्य पंक्तीस पांथस्थ ब्राह्मणांचे शेंपन्नास पात्र व्हावें. सारांश, मोठ्या राजधानीचें सर्व वैभव या महाराजांच्या मंदिरीं अखंड वास करूं लागलें.

सटाणें गांवांत हलवयांची कायतीं सारीं साधीं एक दोन दुकानें असत, तेथें महाराजांसंबंधानें नाशिक वगैरे कडील उत्तम हलवायांचीं नवीन पंधरा वीस दुकानें शोभूं लागलीं; व त्यांच्या पुढल्याभागीं अडकविलेल्या फळ्यांवरून, पेढे, बर्फी, जिलबी वगैरे ताजा माल नानाकृतीनें रचून त्याचीं पूर्ण भरलेलीं मोठमोठीं स्वच्छ तांटें खालच्या वर्तुळाकार सुंदर बैठकांवर विलसून, विक्रीचे पैसे आंत टाकण्याच्या ढबदार चकचकीत पितळी प्याल्यावरून पितळेच्या तराजू चमकूं लागल्या; जेथें तांबोळ्यांच्या एक दोन किरकोळ दुकानांतून वेळेस कच्चीं पानें-

ही मिळण्याची भ्रांति, तेथें दहा पांच दुकानांमधून कच्च्या व गदरलेल्या पानांचीं नेहमीं पूर्ण भरलेलीं अटकीं शिलकेस असून, हवीं तशीं कळीदार पक्कीं पानें पाहिजे त्या वेळीं पाहिजे तितकीं मिळूं लागलीं. भडभुज्यांची, आटा डाळ वगैरे शिधा सरंजामाचीं, हरजिनशीं वाण्याउदम्याचीं आणि कापडाचीं वगैरे कित्येक दुकानें स्थापन होऊन एक मोठी नवीन पेठच वसली. माळी वगैरे लोकांनीं आपापल्या माळ्या—बागांतून माळवा चांगला पिकवून, केळींचें तक्के व तुळशी फुलझाडांचें वांफे—ताटवे पत्रफुलपुष्पांनीं युक्त केले. पेठेच्या चौहाटीवर चौतर्फा सकाळ संध्याकाळ भाजीपाला, फळफळावळ, पानपत्रावळ वगैरेची मोठी गुजरी भरून महाराजांच्या वाड्याच्या मार्गावर माळी लोक तुळशीफुलांच्या पाट्या मांडून, शिवाय सौगंधिक पुष्पमाळा लटकाविलेल्या छड्या हातांत धरून, आणि किरकोळ वाणी लोक नारळ सुपाऱ्यांचे ढीग घालून विकावयास बसूं लागले. अशा प्रकारें सटाणें हें खेडें गांव असतां नेहमीं गजबजलेलें राहून शहरचा भास देऊं लागलें.

महाराजांकडून पूर्ण–काम होऊन परत जात असलेल्या याचकांच्या द्वारें, दक्षिणोत्तर रामेश्वरा पासून थेट हिमालयापर्यंत, आणि पूर्वपश्चिम जगन्नाथापासून द्वारके पर्यंत, महाराजांच्या सत्कीर्तीचा डंका सर्वत्र गाजून, रावापासून रंकापर्यंत मनांत कांहीं शंका न धरितां त्या अकलंकसत्पुरुषाच्या दर्शनाची इच्छा करून जे ते त्याजकडे धांव घेऊं लागले. दर्शनास येणारा कुटुंबी अथवा एकाकी जन धूळभेटींत प्रथम नारळासह कोणी पेढे बर्फ्यांचे पुडे, कोणी द्रव्य, रत्नमुद्रिका, पुढें ठेवून महाराजांचे चरणीं प्रेमानें लोटांगण घालून वंदन करीत. पुढें ठेविलेल्या नारळपुडाद्रव्यादिकांस महाराजांनीं नुस्ता हस्तस्पर्श करून ज्याचें त्यास तें सर्व परत द्यावें. मग त्या लो-

कांनीं तेथें असलेल्या लोकसमाजास ते पेढे वगैरे वांटून तदंश त्या श्रीफळासह प्रसाद ह्मणून जवळ ठेवावा, व तें द्रव्य महाराजांनीं सांगितल्या प्रमाणें दानधर्माकडे लावावें, अथवा अखंड लक्ष्मी ह्मणून देवांत पुजावें. पेढे-बर्फी-खडीसाखरेच्या भरलेल्या पराती, फळफळावळीच्या पाट्या, गुळाच्या भेल्या, तुपाचीं भांडीं इत्यादि पदार्थ ( समय वशांत द्रव्य ) जे नवस ह्मणून येत त्यांचीही स्थिति वर दर्शविल्या प्रमाणेंच होत असावी. या सर्वानुभवावरून महाराजांची निर्लोभता किती होती हें ज्यास्त सांगावयास नको. कोणी संतति, संपत्ति, आरोग्य, विद्या, यश वगैरेच्या प्राप्तीसाठीं महाराजांस हात जोडून प्रार्थना करीत; अशा सर्व लहानथोर, तरुणवृद्ध, स्त्रियापुरुष, मुलादिकास " बाई, मातुश्री, दादा, बाबा, मुला " वगैरे नम्र शब्दांनीं बोलून कोणास तुळशी–पिंपळ–औदुंबर प्रदक्षिणा, कोणास शंकरास अभिषेक, सांजवात, कोणास नंदादीप, कोणास गोप्रदान व कोणास मातापितरांची सेवा वगैरे देवाची आराधना व दानधर्म करण्यास सांगून " तुमची इच्छा देव पूर्ण करून आनंद देईल " असें ह्मणावें. हें महाराजांचें वचनच आपली कार्यसिद्धि व त्यांचें घडलेलें दर्शन हीच कृतकृतार्थता असें जाणून जे ते त्यांचे गुण व यश मुखानें गात गात आनंदानें आपापल्या घरीं जाऊन त्यांनीं सांगितलेली देवसेवा व दानधर्म वगैरे करावयास लागत.

जेथें नित्य असा अचाट दानधर्माचा थाट उडत आहे व तसाच ब्राह्मण भोजनाचा दंगल झडून सदा मंगल गाजत आहे, तेथें यःकश्चित् जहागीरदाराचीच काय! परंतु त्या खर्चाच्या निभावणीस एखाद्या मोठ्या संस्थानिकाचीही संपत्ति पुरणार नाहीं; मग त्या ठिकाणीं महाराजांच्या पगाराचे दोनशें रुपये कितपत पुरतील याचें अनुमान सहज होत आहे. घरीं पगार

येण्याचाच काय तो अवकाश, कीं झाली खिरापत. बहुत दिवसांपासून महाराजांच्या वाड्यांत ठाणीं घालून बसलेल्या शास्त्री-पुराणीक-हरिदास-गवयांच्या नुसत्या पानसुपारी चंदीचाऱ्यास सुद्धां ते दोनशें रुपये पुरण्याची मारामार पडून त्यांत सरासरी वारावार व्हावी. परंतु आपण एकवार स्वीकारलेल्या दातृत्वव्रताचा किंचित् भंग न होतां त्याची अखंड निभावणी व्हावी एतदर्थ त्या वदान्य सत्वधीर पुरुषास अनेक सावकारांच्या दुकानांतील द्रव्याचे तोडेचेतोडे, थोडे होऊं लागले. शिवाय दर्शनास येणाऱ्या जाणाऱ्या नव्या नव्या लोकांची नित्य नवी उसनवारी ( शेंकडों रुपयांपासून तहत चार आण्यापर्यंत देखील ) करण्याचा महाराजांस प्रसंग येऊं लागला याचें आश्चर्य करावयास नको.

आपल्या संभावना बिदाग्यांसाठीं नानाविध याचकांचे महाराजांस कर्जदाराप्रमाणें होत असलेले तगादे व त्यांचे ते तीव्रतर शब्दप्रहार; तशींच तडी, तापडी, अतिथि, अभ्यागत यांची नित्यशः होत असलेलीं भलभलतीं मागणीं; आणि त्याप्रमाणेंच त्यां सर्वांचे हेतु पुरवून त्यांच्या रवानग्या करून देण्याची सतत मनांत घोळत असलेली चिंता; इत्यादि शेंकडों कसण्या चोहोंकडून लागून महाराजांच्या अंतःकरणास क्षणभर देखील विसावा मिळूं नये. तथापि महाराजांनीं तो शीण न मानून कोणाचा आधींच रोष किंवा तिटकारा न करितां त्यांस महाराज "दादा बाबा, भय्या, मुला किंवा आई, बाई, मुली" इत्यादि गोडगोड शब्द बोलून "जरा थांबा, मी तुमच्याच तजविजींत आहे" असें मोठ्या शांत वचनानें त्यांच्या कामना पूर्ण करून त्यांस वाटेस लावावें.

ईसवीसन् १८६९ सालचे अखेरीस, अहंमदनगर जिल्ह्यांतील नाशिकसबतुकडी मोडून सरकारांतून स्वतंत्र नाशिक जिल्हा

स्थापन झाला. त्यावेळीं खानदेशांतील बागलाण, मालेगांव व नांदगांव हे तीन तालुके नाशिक जिल्ह्यास वर्ग होऊन जोडले गेले. इतके दिवस रावसाहेब यशवंतराव महादेव हे खानदेश जिल्ह्यांतले मामलेदार ह्मणून जी ख्याति होती, त्या ठिकाणीं आतां ते नाशिक जिल्ह्यांतले मामलेदार, अशी प्रसिद्धी होत चालली. नगर व खानदेश या दोहों जिल्ह्यांतील हरएक कामकाजाची निरनिराळी वहिवाट असे, त्यामुळें कामकाजांत भिन्नमतानें घोटाळा होऊन अव्यवस्था होईल, ती न होतां सर्वत्र एकसारखी वहिवाट चालण्यासाठीं नाशिक जिल्ह्याचे कलेक्टर रा॰ ओव्हन साहेब बहादुर यांनीं तालुक्यानिहाय अकरा मामलेदार लोकांची कमिटी भरविली, तींत सटाण्याहून राव॰ यशवंतराव महादेव हे आले होते. त्या मामलेदार लोकांच्या कमेटींत मुलकी, नगदी वगैरे कामाची वाटाघाट होत असतां सर्वांमध्यें राव॰ यशवंतरावाचें पडलेलें मत सर्वांनुमतें पसंत झाल्यामुळें त्यांच्या पूर्ण हुषारी व वांकबगारीविषयीं साहेब बहादुरांची खात्री होऊन त्यांची त्यांजवर मर्जी बसत चालली.

## शिंदेसरकारचें मुंबईस आगमन आणि त्यांचे भेटीकरितां महाराजांचे गमन.

ईसवी सन् १८७१।७२ सालीं श्रीमन्महाराज जयाजीराव शिंदे अलीजा बहादर सं॰ ग्वाल्हेर यांची स्वारी दक्षिणप्रांतीं श्रीक्षेत्र पंढरपूर वगैरे यात्रेसाठीं येऊन परत मुंबईस आल्या वेळीं त्यांचे मनांत अशी उत्कंठा प्राप्त झाली कीं, ज्याचा साधुत्वकीर्तिदुंदुभिध्वनि सर्व भरतखंडांत दुमदुमून राहिला आहे; ज्याचे औदार्याद्यनेक सद्गुण सर्वतोमुखीं वारंवार निघून सर्व लोक मोठ्या धन्यतेनें ज्याची प्रशंसा करीत आहेत; शेंकडों कोसांवरून हजारों लोक ज्यांचें नांव गात, ज्यांच्या दर्शनासाठीं धांव घेत आहेत

अशा जगद्विख्यात पुण्यश्लोक साधुवर्य यशवंतराव महाराज देवमामलेदार यांच्या दर्शनानें आपण पुनीत होऊन कृतकृतार्थ व्हावें. मग शिंदे सरकारांनीं ही आपली इच्छा मुंबई सरकारास प्रदर्शित केल्यावरून त्या सरकाराकडून नाशिक जिल्ह्याचे कलेक्टरास जलदीची अशी तार गेली कीं, " तुमचे जिल्ह्यांतील राव० यशवंतराव महादेव देवमामलेदार यांस शिंदे सरकारच्या भेटीसाठीं भेटीचें कारण संपेपर्यंतची, स्पेशल रजा इकडून मंजूर केली आहे. यास्तव त्यांस मुंबईस निघून जाण्याविषयींचा ताबडतोब हुकूम पाठवून परवानगी द्यावी. " त्याप्रमाणें कलेक्टरचा जलदीचा हुकूम पोहोंचतांच महाराज कांहीं आश्रितमंडळीसह मुंबईस जाण्याच्या तयारीस लागले.

हें वर्तमान बाहेर पडतांच जो तो येऊन मुंबईस बरोबर-येण्याचा आपला हेतु महाराजांस दर्शवूं लागला. त्याजवर महाराजांकडून कोणास नकार ह्मणून मिळालाच नाहीं. एकतर अनायासें मुंबई शहर पाहण्यांत येऊन महाराजांच्या समागमानें कोणतीही अडचण वगैरे न पडतां चार दिवस मोठ्या जल्लोषानें रहाणें होईल; व दुसरें, शिंदेसरकारच्या स्वारीचा थाट व मजा दृष्टीस पडेल; अशा उद्देशानें गावांतील शिष्ट संभावीत लोक. महाराजांच्या घरीं ठाणें देऊन बसलेला परग्रामस्थ शास्त्री वैदिकादि विप्रसमुदाय व नेहमींचीं जवळ असणारी आश्रित मंडळी कचेरींतील दोन कारकून शिवाय आचारी पाणके व शिपाई मशालजी वगैरे मिळून दीडशांवर लोक महाराजांबरोबर मुंबईस निघण्यासाठीं सिद्ध होऊन महाराजांच्या स्वारीच्या सर्व गाड्या भरल्या.

अशा थाटाची महाराजांची स्वारी निघून मनमाडस्टेशनावर येऊन दाखल झाली. मग आपल्या पदरच्या खर्चानें चार रिझर्व डब्यांतून बहुतेक मंडळी बसवून, महाराज आपण दाहा

पांच मंडळीनिशीं सेकंड–क्लासच्या डब्यांत बसले. इतक्यांत "जय यशवंतराव महाराजकी जय" असा जय–घोष होऊन गाडी निघाली. ही मुंबईस जाण्यासाठीं महाराज निघाल्याची बातमी मनमाडाहून लागलीच तारायंत्रद्वारें मुंबई पर्यंतच्या सर्व स्टेशनांस जाऊन थडकली. त्यावरून ज्या त्या स्टेशनच्या व आसपासच्या गांवांतील लोकांस महाराज येण्याचें वर्तमान समजतांच सर्व स्त्रियापुरुषांची एकच धांदल होऊन मोठ्या लगबगीनें गाडी येण्याचे संधीस ते आपापल्या स्टेशनावर दाखल होऊन महाराजांच्या दर्शनासाठीं गाडी येण्याची मार्गप्रतीक्षा करीत बसले. स्टेशनमास्तर वगैरे कामगारांनीं, गाडी थांबण्याचा अवकाश थोडा आणि मिळालेला लोकसमुदाय मोठा, ह्या मानानें सर्वांस थोडक्या वेळांत दर्शन होण्यासारखा सर्व बंदोबस्त व व्यवस्था आगाऊ लाऊन ठेविली होती. मग गाडी येऊन स्टेशनावर ठेपत आहे, तोंच "जय यशवंतराव महाराजकी जय" अशा जयजयकार शब्दानें सर्व स्टेशन दणाणून जावें; गाडी थांबतांच स्टेशन-मास्तर वगैरे मंडळींनीं महाराजांस अलाद उतरून घेऊन त्यांजसाठीं आगाऊ सिद्ध करून ठेविलेल्या उत्तम व मृदु पीठासनावर त्यांस आदर सत्कारानें नेऊन बसवावें; स्टेशनचे कामगार लोक आपण दर्शनकामपूर्ण होत्साते आलेल्या लोकांच्या हेतुपरिपूर्णतेस साधनभूत होऊन महाराजांच्या गौरवसत्कारार्थ त्यांनीं हारगजरे, पानसुपारी, अत्तरगुलाब, यांहीं करून महाराजांस संतुष्ट करावें; त्या समयीं सुष्ट-दुष्टभाव कोणाच्या मनांत न वसतां लोक खारीक, खोबरें, पेढे, रेवड्या, बत्तासे, साखरफुटाणे वगैरे बरोबर आणलेल्या शेरण्यांचा प्रसाद सर्वांस वांटीत असतां वरचेवर महाराजांच्या नांवाचा जयध्वनि होत असावा; इतकें सारें कृत्य पांच सात मिनिटांत उरकून पुन्हां महाराज वन्हिरथारूढ होत आहेत, तों पुन्हां "जय

यशवंतराव महाराजकी जय " अशी आरोळी होऊन गाडी चालती व्हावी. मध्यंतरीं विगतपुरी व कल्याण स्टेशनांवर ज्यास्त वेळ गाडी थांबत असल्यामुळें इतर ठिकाणांपेक्षां लोकास दर्शनास ज्यास्त अवकाश मिळून ती हृत्तापहर शांतमूर्ति अवलोकन करण्यास नेत्रांस त्रासरहित अशी अधीक संधि सांपडली. कित्येक युरोपियन लोकही आपल्या बायकांमुलांसह महाराजांचा संयोगलाभ घेण्यास नेटीव लोकांबरोबरच विभागी झाले. गाडी पोहोंचण्यास रात्र होणाऱ्या लहान मोठ्या स्टेशनांवरून दीपोत्सव झाले. गाडीच्या थांबण्याच्या नियमित वेळांतस्टेशन-मास्तराकडून हा दर्शनसमारंभ उरण्याची कितीही जलदी होत गेली, तथापि प्रत्येक स्टेशनावर दोनचार मिनिटें ज्यास्त विलंब लागत गेला. अशा क्रमानें मुंबई येथील बोरीबंदरच्या स्टेशनावर महाराजांच्या स्वारीची गाडी रात्रीं दहा सव्वादहा वाजतां जाऊन थकतांच स्टेशनचा सर्व प्लयाटफार्म हादरून महाराजांच्या जयघोषानें दणाणून गेला.

त्या समयीं तेथें कोणी तारखात्याकडील मोठे अधिकारी चिंतोपंत ह्मणून गृहस्थ होते ( तपासांत यांचे पूर्ण नांव व हुद्दा कळला नाहीं. ) त्या उदार व भाविक पुरुषानें महाराजांस मोठ्या प्रेमानंदानें गाडींतून उतरून घेऊन, अशा रात्रीच्या अवेळीं त्यांस शहरांत जाऊं न देतां सर्व मंडळीसुद्धां फराळादिकाची आगाऊ सर्व सिद्धता करून ठेविलेल्या स्टेशनानजीकच्या एका प्रशस्त रम्यस्थळीं उतरावयास नेलें. पुढें महाराजांची स्नानसंध्या पूजा आटोपत आहे, तों इकडे जातींजातीच्या पंक्ति निरनिराळ्या आखून पाट रांगोळी, केळीचीं पानें उदबत्त्यासह तयारी होऊन पात्रें वाढून पाटांवर मंडळी येऊन बसली. नंतर महाराज पात्रावर येऊन बसतांच " पुंडरीकवरदा हरिविठ्ठल " ह्या नामगजरानें सर्व फराळास बसले.

फराळाचा बेत श्रीमंती थाटाचा असून वाढण्याची व्यवस्था उत्तम ठेविलेली असल्यामुळें कोणास कोणत्याही पदार्थाची न्यूनता ह्मणून पडलीच नाहीं. अशा रीतीनें श्लोकांच्या गजरांत फराळ उरकून पानसुपारी, हार, गजरे, फुलें, अत्तरगुलाब, होऊन त्या सुगंधानें तें सर्व स्थळ दरवळून गेलें. असो; ही महाराजांची सेवा औदार्ययुक्त मनोत्साह बुद्धीनें करून त्यांचे चरणीं लीन होत्साता आपल्या आजपर्यंतच्या कमाईचें खरें चीज व सुफलता झाली असें मानून मोठ्या कृतार्थपणानें चिंतोपंत हे संतोष पावले.

शाबास! याचें नांव सत्कारणीं द्रव्याचा व्यय! नाहीं तर, गोल्डननाइट–कंपनी, स्पिरिट–पार्टी, अथवा जालिक्लब, यांजमध्यें खाण्यापिण्याच्या चैनबाजींत एका रात्रींतून शेंकडों रुपये उडवून देणारे, असे आधुनिक सुधारलेले लोक प्रस्तुतकाळीं जागोजाग बहुत आढळून येत आहेत. परंतु चिंतोपंत हे तसे नसून ते आपल्या सद्धर्मयुक्त कर्तृत्वानें, महाराजांच्या ह्या चरित्रमालिकेंत आपलें नांव चिरस्थाई गोंवून घेण्यास पात्र झाले. तर, अशाच प्रकारें व्यक्तिमात्रानें स्वधर्मनिष्ठ होऊन स्वकष्टार्जित द्रव्याचा सद्व्यय करून जगांत गाजावें, हें त्यांस भूषण आहे. असो. पुढें बिछाने पडून महाराजांसह सर्व मंडळी निजली.

सकाळीं उठून महाराजांची स्वारी मुंबापुरींत प्रवेश करून कांदेवाडींत कोणा एका भाट्याच्या हवेलींत जाउन उतरली. सोईप्रमाणें जागोजाग मंडळींची बिऱ्हाडें लागून महाराजांकडे एका स्वतंत्र प्रशस्त दिवाणखान्याची योजना झाली. ही महाराज येऊन दाखल झाल्याची वार्ता उदकांत पडलेल्या तैलबिंदुप्रमाणें सर्व मुंबापुरींत लागलीच पसरली. मग काय विचारितां! मनाची सर्व लगबग होऊन जे ते हातचें काम

डॉ. ब. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

टाकून मोठ्या धांदलीनें महाराजांच्या दर्शनासाठीं नारळ व पेढ्याबर्फीचे पुडे घेऊन आपल्या स्त्रियापरिवारासह गाड्या, बग्या, फैटणींतून बसून व कोणी पादचारी असे सहस्रावधि लोक धांव घेऊं लागले. इकडे महाराजांची देवपुजा चालली आहे, तों लोकांची दर्शनासाठीं एकच रांग लागून प्रसाद घेऊन आनंदानें परतून घरोघर जाऊं लागले; अशा क्रमांत माध्यान्ह काल लोटून महाराजांचा नक्तोपोषणाचा फराळ होऊन सर्व मंडळींचीं भोजनें झालीं. मग आदल्या रात्रीच्या जागरणामुळें जरा वामकुक्षी होऊन महाराज उठत आहेत, तों तिसरा प्रहर झाला.

याच सुमारास शिंदे सरकाराकडील कांहीं दरखदार मंडळीसह खासगी कारभारी व खानगीकडील कांहीं थोर थोर कामगार लोक, महाराजांस राजवाड्यांत घेऊन जाण्यासाठीं मेणे, शिग्राम, बग्या, स्वार शिबंदी भालदार चोपदारांसह मोठ्या लवाजम्यानिशीं महाराजांच्या निवासस्थानीं येऊन ठेपले. मग त्या सर्वांनीं भक्तिपुरःसर महाराजांचे चरण वंदून “ महाराजांनीं राजवाड्यांत येउन आपल्या दर्शनानें सर्वांस पावन करावें ” अशी कारभाऱ्यांनीं आपल्या सरकारची असलेली विनंति त्यांस मोठ्या नम्र वचनानें दर्शविली. तेव्हां महाराजांनींही तत्काल त्यांच्या इच्छेनुरूप त्यांस रुकार दिला.

मग बरोबरीची कांहीं धूर्त अशी पांच चार आश्रित मंडळी, दोन विद्वान् शास्त्री, पांच चार वैदिक तसेच पांच सात सभासंभावीत गृहस्थ, आपले कनिष्ठ बंधू बळरामपंत आणि सटाणें कचेरींतील निळकंठ भास्कर काळे कारकुन शिवाय दोन दोन शिपाई अशा सुमारें पंचवीस तीस मंडळीसह महाराज राजवाड्यांत जाण्यास सिद्ध झाले. न्यावयास आलेल्या बग्या फैटणींतून मंडळी आणि खुद्द सरकारच्या देखण्या सुंदर शिग्रामांत

महाराज हे कारभाऱ्यांसह बसून ती स्वारी राजवाड्यांत जाण्यास निघाली. मार्गांतून महाराजांच्या दर्शनेच्छेनें दुतर्फा आपापल्या हद्दींत स्त्रियापुरुष उभे होतेच. महाराजांचा शिग्राम जवळ येऊन थडकतांच उभे राहिलेले सर्व लोक "जय यशवंतराव महाराजकी जय" अशा जयघोषानें पुष्पवृष्टि करून महाराजांस दुरून नमस्कार करीत आहेत, अशा प्रकारें महाराजांची स्वारी राजवाड्यापाशीं येऊन ठेपली. इतक्यांत भालदार चोपदार ललकारून महाराज आल्याचें सुचवीत आहेत, तोंच खुद्द शिंदेसरकारची स्वारी वाड्याबाहेर महाराजांस सामोरी येऊन पादवंदन करून त्यांनीं त्यांस हात देऊन शिग्रामांतून खालीं उतरून घेतलें. मग सरकार व महाराज या उभयतांच्या स्वाऱ्या, बरोबरील मंडळीसह राजवाड्यांत प्रवेश करून मजल्या वरील आपल्या खाजगी कडील हवाशीर व सुशोभित अष्टपैलु बंगल्यांत गेल्या.

त्या अष्टपैलु सुरेख बंगल्याच्या गुळगुळीत भिंती चित्रविचित्र रंगी बेरंगी बेलबुटीयुक्त वालपेपरांनीं मजेदार मढविलेल्या असून, त्यांजमधील दर्शनीं सुरूचे खांब उत्तम दिलेल्या वारनिसाच्या योगानें लकाकी मारीत आहेत; वरील, उंची—किनखाबि हिरव्या छता भोंवती तांबडी जाळीयुक्त रेशमी गोंडेदार झालर भिंतीच्या शिरोभागीं खुलत आहे; छताखालीं नानारंगी हंड्यांच्या अष्टपैलु रांगामधून, मेणबत्या लावण्याचीं लोंबत असलेलीं शुभ्र बिलोरी झाडें विलसत असून त्यांज खालचीं झुंबरें वाऱ्या सरशीं हळूहळू हालून आपल्यांतील नानामिश्र रंगाची लकाकी मारून, पाहणाऱ्याच्या नेत्रांस थक्कता देत आहेत; सभोंवतालच्या खिडक्यावरून, रंगी बेरंगी नक्षीदार वेलबुटीचे चिकाचे पडदे रेखले सोडलेले असून, त्यांजवर सिंचन केलेल्या कस्तुर्यादि सौगंधिक द्रव्याचा मंदमंद सुगंध सर्वांच्या घ्राणेंद्रियांस संतुष्टता

देत आहे; गुलाबपाणी सिंचन करून, सभोंवतालच्या खुंट्यांवरून हेलकावत सोडलेल्या सुवासिक पुष्पांच्या कमालखानी हारांचा परिमळ चोंहोकडे दरवळून मनास तर्रता देत आहे; खालच्या गुळगुळीत सपाट अशा जमिनीवर विच्छाविलेल्या अग्रचाच्या ताठ सतरंजीवर पर—मिश्रित मश्रूचे रुजामे पसरलेले असून, त्यांजवर एकसांचाचे वेलबुट्टीदार मखमाली गालीचे घातले आहेत व त्यांजमागें टेंकावयासाठीं शेवरीच्या नरम कापसानें भरलेले वर धुवट मलमलीच्या अभ्रयांनीं आच्छादलेले असे गजनीचे मृदु लोड ठेविले आहेत; या बिछायतीच्या समोरील बाजूस मश्रूनीं मढविलेलीं शिसवीचीं तुळतुळीत कोंचें शोभत असून, त्यांजमधून अंतरांतरानें मांडलेल्या एक—खांबी वर्तुळाकृति टेबलांवरून नुकत्याच किल्या देऊन सुरू केलेल्या इंग्रजी बाजांच्या पेट्यांतून, सप्तसूरमिश्रित मधुर आलापयुक्त अतृटित मंजुल ध्वनि निघून, ते सर्वांच्या कानांस आपल्याकडें आकर्षण करून घेऊन चित्तवेधीत आहेत; भिंतीस बसविलेल्या कांचनमय रुंद बैठकांवरून, वाटोळीं घड्याळें टिकटिक शब्दानें आयुष्याचा क्षणोक्षण जात असल्याचें सर्वांस दर्शवीत आहेत; भिंतीचे मर्यादेस एका हारीनें मांडून ठेविलेल्या व हिरव्या बनातीनें पृष्ठभाग मढविलेल्या, अशा एक—खांबी वर्तुळाकृति टेबलांवरून रेशमी सुंदर सरपोसानीं आच्छादलेलीं अशीं पानसुपारीचीं, हारगजरे फुलांचीं, अत्तरगुलाब वगैरे सौगंधिक द्रव्याचीं फळफळावळीचीं अशीं सुवर्ण—रेखांकित वेलबुटीयुक्त मोठ मोठीं चांदीचीं तबकें विराजीत असून मंद मंद वायूनें ज्यांवरील सरपोस किंचित् वर उडत आहे. यावरून तीं तबकें आपलें मुखवस्त्र केव्हां निघेल आणि केव्हां आपण महाराजांचें दर्शन घेऊं, अशा उत्कंठेंत असल्याचा भास देऊं लागली; अशा त्या अंतरंग दंग करून गुंग करणाऱ्या बहुरंग महालांत मुख्यस्थानीं सुशोभित

दिव्य सिंहासनावर बहुमानपूर्वक महाराजांस सरकारांनीं स्वहस्तें बसविलें, तों दोहों बाजूंकडील चोबदारांची जयजयकार युक्त ललकारी होऊन कारभाऱ्यांच्या व्यवस्थेनें योग्यतेनुरूप सर्व मंडळी बसली.

इतक्यांत ज्यामध्यें कांहीं रत्नखचित कांचन मुद्रिकादिकरून बहुमोल भूषणें आणि पांच हजार रुपयांच्या नोटी आहेत, असें एक आणि तशींच पूजा साहित्याचीं दुसरीं चांदीचीं तांटें, कारभाऱ्यांनीं महाराजांपुढें आणून हजर करतांच, खुद्द शिंदेसरकारांनीं प्रथम तें नजराण्याचें ताट आपल्या हातांनीं महाराजांपुढें जरा सरकावून नजराणा ह्मणून ठेविलें; आणि महाराजांची पादपूजा करून, कंठांत पुष्पांचा हार, हातांत गजरे व शिरीं पागोट्यांत एकादशलडी तुरा खोवून, फळफळावळीचीं तांटें पुढें केलीं, नंतर अनन्य भावानें सरकार महाराजांच्या चरण—सरोजीं मिलिंद होऊन त्या सहजानंद शांत मूर्तीच्या दर्शनानें कृतकृतार्थ होत्साते कंठ सद्गदित होऊन जरा बाजूस स्थित झाले.

त्या महालास जोडून लगत असलेल्या राणीवशांतील दुसऱ्या दिवाणखान्यांत, वस्त्रालंकारानें मंडित होऊन महाराजांच्या दर्शनेच्छेनें आतुर होऊन सिद्ध असलेल्या राजांच्या राण्या आणि आप्तस्वकीय वर्गांतील इतर स्त्रिया, कांहीं पडत—पोशी किंवा मराठीमोळ्याचा मुखावर बुरखा न राखतां शंकारहित होत्सात्या आपापल्या दासीजनांसहवर्तमान एकामागून एक, मधील दाराचा पडदा बाजूस सारून त्या दिव्य महालांत प्रवेशून महाराजांच्या सिंहासना समोरील मर्यादेच्या खुल्या जागीं येऊन स्थित झाल्या. मग क्रमाक्रमानें. महाराजांच्या मंगलदायक चरण द्वयावर सहस्त आपापले सौभाग्य--भाल--प्रदेश अर्पण करून, त्या श्रीविष्णुरूप यशवंत मूर्तीच्या दर्शनानें डो-

ळ्यांचें पारणें फेडून त्या सर्व धन्य झाल्या. महाराजांनीं सर्वांस सप्रेम आशीर्वाद देऊन श्रीफलादि प्रसाद अर्पण केलेला ग्रहण करून त्या राजस्त्रिया परत अंतरगृहांत जाऊन पडदा पडला.

मग श्रीमंत सरकारांनीं महाराजांस हात जोडून विनंति केली कीं, " ॥ रिक्तपाणिर्नपश्येत्तु राजानं देवतां गुरुम् ॥ दैवज्ञं भिषजं मित्रं फलेन फलमादिशेत् ॥ या महा वाक्याप्रमाणें, म्यां सेवकानें या अर्पण करून पुढें ठेविलेल्या द्रव्याचा महाराजांकडून स्वीकार झाला पाहिजे; दुसरें, महाराजांस जें कांहीं लोकांचें देणें आहे, तें या दासाचे हस्तें फेडविण्यासाठीं कर्जाची एक याद मला मिळावी; तिसरें, महाराजांच्या दानधर्म वगैरे खर्चासाठीं कांहीं स्वास्थ्य ह्मणजे दरमहाची नेमणूक करून द्यावी असें मनांत आहे, यास्तव ही सेवा मजकडून घेण्याची मला आज्ञा व्हावी. " असें सरकारचें वचन ऐकून मोठ्या नम्रतेनें महाराज ह्मणाले, सरकार, " रिक्तपाणिर्न पश्येत् " या पैकीं कोणताच अधिकार मजकडे येत नाहीं; मी एक साधारण मनुष्य इंग्रज सरकारचा नौकर आहे, तेव्हां मजपुढें ठेविलेलें हें द्रव्य घेण्यास मी पात्र होत नाहीं. हीं राजभूषणें राजासच योग्य. मला यःकश्चितास तीं काय होत ! हें नोटारूप द्रव्य राजाचे खजिन्यांतच असणें उचित् आहे. दुसरें, माझे साबकार इतके उच्छृंखळ नसल्यानें मला कोणाचा कधींच तगादा नाहीं, व जें देणें आहे तें माझ्या आहारीं आहे. इतक्यावर कदाचित् कोणी तसेंच निकडीचें मागणें केलें, तर तेवढ्या पुरत्याची समजूत करण्यासारखी माझी प्राप्ति आहे; ह्मणून त्याची मला इतकी काळजी नाहीं. तिसरें, माझ्या वास्तवीक योग्यतेपेक्षां इंग्रजसरकार मला ज्यास्त पगार देत आहे, तेवढ्या दोनशें रुपये प्राप्तींत माझा सर्व उत्तम चरितार्थ चालून, प्रसंगीं कोणी कांहीं मागितल्यास त्यासही थोडें बहुत देण्यास मला

सवड होत आहे. इतक्यावर कदाचित प्रसंगवशात तशीच कांहीं मला विशेष अडचण पडल्यास ती दूर करण्यास आपले शिवाय मला दुसरें कोण आहे ? हें महाराजांचें सयुक्तिक व आनंदप्रद भाषण ऐकून महाराजांच्या निर्लोभतेविषयीं शिंदेसरकार चकित होऊन थक्क झाले. आणि मनांत ह्मणाले, धन्य ह्या पुरुषाची ! असा निस्पृही व तृष्णारहित पुरुष काय तो हाच एक मला आढळत आहे. वैराग्य धारणानें अंगास रक्षा चर्चून कौपीन धारण करणारा योगी देखील प्राप्त-लक्ष्मीचा त्याग करणार नाहीं, मग हे महाराज तर जगत्कुटुंबी असतां, द्रव्य तृणासमान मानीत आहेत; त्या अर्थी हा सत्पुरुष प्रत्यक्ष लक्ष्मीकांतच या भूतळीं अवतरून वास करीत आहे, असें वाटतें. तर मग यांचे घरीं अखंड राजवैभव नांदत असल्याचें जें मी ऐकत आहें, त्याचें काय नवल ! काय ही भाषणप्रौढी ! किती ही लीनता ! काय ही समाधान वृत्ती ! किती ही शांति ! काय ही निरहंता ! दूरदूरचे लक्षावधि लोक यांच्या दर्शनेच्छेनें धांव घेऊन उड्या घालतात, यांत आश्चर्य नाहीं. अशा सर्व-भाग्य-गुण-संपन्न सत्पुरुषाच्या दर्शनानें आज मी पावन होऊन धन्य झालों.

मग इशारत होतांच पानसुपारी वगैरेचीं तबकें कारभाऱ्यांच्या द्वारें येऊन ठेपलीं, तों सरकारांनीं उठून स्वहस्तीं त्यांतील सिद्ध असलेले गोविंदविडे पुढें ठेवून, पुष्पगुच्छासह अत्तरगुलाब महाराजांस दिलें. त्या प्रमाणेंच इकडे मंडळीस कारभाऱ्यां कडून पानसुपारी, हारगजरे फुलांचे झेले अत्तर गुलाब देणें होऊन, महाराज उठत आहेत, तोंच सरकार त्यांस हात देऊन उठले. सर्व मंडळीही त्यां सरशीच उठून भालदारांचीं जयजयकारयुक्त ललकारी होऊन मुजरे झाले. महाराजांचा हात धरून चालत असतां सरकारांनीं विनंति केली कीं,

आजच्या प्रमाणेंच उदईक हे पुण्यचरण ह्या पर्णकुटिकेस लागून, या सद्दर्शनानें ह्या दासास पावन करून धन्य करावें. त्याजवर "मी सरकारच्या वचनास हजर आहें." असें महाराज बोलून कारभाऱ्यांसह शिग्रामांत बसले. मंडळीही वहनारूढ होऊन महाराजांची स्वारी पूर्ववत् सर्व थाटानें चालू होतांच सरकारस्वारी राजवाड्यांत परतली. महाराज स्वस्थानास दाखल होत आहेत, तों अस्तमान होऊन सायं—स्नानाची वेळ झाली.

मग नित्य महाराजांच्या दर्शनास मुंबापूरिस्थ लोकांची इतकी गर्दी होऊं लागली कीं, त्या ठिकाणीं लोकांच्या बंदोबस्तार्थ इंग्रज सरकारांनीं पहारा ठेविला. नित्य महाराजांची स्वारी शिंदेसरकारच्या वाड्यास प्रथम दिवसाच्या सर्व थाटानें जाऊन परत यावी. त्यांतच शिंदेसरकारांनीं एक दिवस महाराजांकडील यच्चावत मंडळी, तसेच मुंबापुरिस्थ शिष्ट महाजन लोक आणि आपल्या सड्या स्वारींतील कारभारी, दिवाण, अमीर, उमराव, मुत्सद्दी, मानकरी व खानगी कडील सर्व कामगार इत्यादिकांस अगत्यपूर्वक पाचारण करून, महाराजांच्या आदरातिथ्यार्थ रात्रीच्या मोठ्या मजलसीचा बेत केला. आपल्या राजमहालाजवळील दुसऱ्या एका प्रशस्त बंगल्यांत प्रथम रात्रीं आठ वाजतां तमाम मंडळी जमल्यावर मसालेमिश्रित आटींव बासुंदीची व फळफळावळीची यथेच्छ मेजवानी देऊन शास्त्री वैदिकादि भिक्षुक—जनांस एकेक मोहोर दक्षणा देण्यांत आली. तेथील छोटेखानी पानसुपारी झाल्यावर ती सर्व मंडळी दहा वाजतां मुख्य मजलसीच्या अष्टपैलु महालांत येऊन दाखल झाली. हंड्या, झुंबरें, वालशेट, शामदानें आणि मूनलाइट, यांतील उज्वलित केलेल्या रोशनाईचे प्रकाश किरण, खालच्या मृदु बिछायती वरील पसरून टाकिलेल्या सुवर्ण—रजत मिश्रित मुकेसावर पडून ती परावृत्त किरण—दीप्ति नेत्रांस वरचेवर दिप-

MI 5066

वीत आहे; भिंतीच्या खुंट्यांवरून लटकावून सोडलेल्या सुवासिक पुष्पहारांचा सुगंध व कोंपऱ्या कोंपऱ्यांतून चांदीच्या जाळीदार आडण्यावरून उदवत्या लावण्याच्या सोनेरी झाडांतून प्रज्वलित केलेल्या सुगंधयुक्त म्हैसुरी अगरबत्त्यांचा सुवास एकवटून सर्व महाल दरवळून गेला आहे; अशा त्या चकचकाट व घमघमाटयुक्त रमणीय महालांत महाराज मुख्य स्थानीं व जवळच बाजूस सरकार बसून, नजरेच्या आटोक्यांत योग्यतेनुरूप सर्व मंडळी बसली. इतक्यांत सरकारच्या पदरचे गंधर्वतुल्य प्रसिद्ध हस्सुखां गवयांचे चिरंजीव नथ्थेखां गवई हे आपला एक शागिर्द व महशूर जोरावरशिंगनामक बजवय्ये यांसह येऊन मुजरा करून महाराजांसमोरील आपल्या बैठकीवर बसले.

मग लागलीच तंबूरे लावून पखवाजावर थाप पडली. प्रथम सुरसुरावट व रागदारीचा जोड होऊन गाणें सुरू झालें. आधींच नथ्थेखां गायनकलानिपुण आणि त्यांतून महाराजांस आपलें खरें कर्तृत्व दाखविण्याविषयीं त्यांच्या मनाची खरी उत्सुकता, तशींच जोरावरशिंगाची एक–निष्ठेची साथ. यांहीं करून त्या दिवशींचा नानाढंग गाण्याचा रंग सर्वांचें अंतरंग कसें गुंग करून टाकणार नाहीं ? एकेक ख्याल, वेळेवेळेच्या मानानें नाना रागदारींत गात असतां, सर्वत्र वाहवा होऊन पुऱ्या पांच चिजा होत नाहींत तों दोन वाजले. पुढें एक पद उत्तररागिणींत परमेश्वराच्या स्तुतिप्रार्थनेचें गाऊन तंबूरे खालीं ठेविले. मग पानसुपारी, हारगजरे, अत्तरगुलाब झाल्यानंतर मुजरे होऊन मजलस उठली, व महाराजांची स्वारी सर्व मंडळीनिशीं स्वस्थानीं गेली.

अशा क्रमानें महाराजांचें पांच दिवस मुंबईस वास्तव्य होऊन शिंदेसरकारांस परमावधीचा संतोष झाला. मग सहावे दिवशीं आपल्यां ग्वालेर संस्थानास जाण्यासाठीं सरकारस्वा-

रीनें कूच ठरलें. त्याप्रमाणें स्वारीची सर्व सिद्धता होऊन, स्पेशल गाडीनें शिंदेसरकार महाराजांसह निघून नाशिकचे स्टेशन पर्यंत गेले. त्यावेळीं नाशिक जिल्ह्याचे कलेकटर मे० अर्सिकन् साहेब बहादुर हे स्टेशनावर शिंदेसरकारचे मुलाखती करितां आलेले असून महाराजांच्याद्वारें त्या उभयतांची भेट गाडींतले गाडींतच यथास्थितपणें झाली. सरकारचा निरोप घेऊन साहेब बहादुरांसह महाराज, गाडी खालीं उतरतांना त्यांस त्यांच्या स्वारीच्या खर्चाबद्दल म्हणून एक हजार रुपयांच्या नोटी शिंदेसरकार देत असतां " सरकार हें काय म्हणत आहां! इतक्या जलदीचें कारण नाहीं; लागेल तेव्हां मी मागून घेईन " असें म्हणून महाराज खालीं उतरले व पुढें गाडी चालू झाली.

मुंबईतील नामांकित नानाशंकरशेट वगैरे कांहीं श्रीमान् गृहस्थ व मोठमोठे शेट सावकारादि मंडळीच्या हेत्वनुरूप मुंबईस कांहीं दिवस राहण्यासाठीं महाराजांनीं कलेक्टर साहेब यांजपासून तोंडी वीस दिवसांची रजा मागून घेऊन पुढें थोडक्याच वेळानें जाणाऱ्या मेलगाडीनें महाराज रात्रीं तीन वाजतां निघून मुंबईस सकाळीं जाऊन पोहोंचले. महाराजांचा एकंदर एकोणीस दिवस मुंबईस मुक्काम झाला. त्यांत तेथील कांहीं महाजन मंडळींनीं महाराजांच्या नित्य खर्चाची सर्व व्यवस्था उत्तम ठेविली होती. सर्व कोकणपट्टी व गुजराथ प्रांत महाराजांच्या दर्शनासाठीं लोटून लोकांच्या गर्दीची सीमा झाली. बंदोबस्तही सरकारांतून उत्तम ठेविला गेला होता. गाड्या, बग्या, मेणे, घोडे यांची रीघ लागून आवारा पुढें त्यांची मोठी थाप लागून राहिली. महाराज सकाळीं सात ते दहा आणि दुपारीं तीन ते सहा वाजे पावेतों वाड्यापुढील मोकळ्या प्रशस्त जागीं बसून लोकांची दर्शनकामना पूर्ण करीत. यांत कांहीं बडे बडे लोक महाराजांचे बाहुरक्षक होऊन लोकांची झिम्मड दूर सारीत असतां प्रत्येकाचे

हात व मस्तक महाराजांचे पायास स्पर्शून ते गुडघ्यापर्यंत सुजून सुजून गेले.* रात्रीं आठ ते अकरा वाजेपर्यंत शहरवासी बडे संभावीत गृहस्थ दर्शनास येऊन जात. घटकोघटकीं सहस्रावधि नारळ फुटून पेढे बरफीच्या परातीच्या पराती वांटून खलास होऊं लागल्या. अशावेळीं केवळ प्रसादभक्त असलेल्या कांहिकांचा निर्वाह त्या मिठाईवरच होऊं लागला. एक दिवस तर शहरांत नारळांची दुर्मिळता होऊन वेळेस अर्ध्या आण्याच्या जागीं दोन आण्यांसही नारळ मिळेनासा झाला. हें वर्तमान तारेनें बंदरोबंदरीं लागलीच पोंचून दुसरे दिवशीं नारळांचीं जहाजें मुंबईस येऊन थडकलीं. मिठाईची लूट होऊन वारंवार तूट पडूं लागली.

महाराजांच्या द्वारीं त्रिकाल चौघडा झडत आहे; घडशी—वाजंत्री, अलगुजवाले, सतार, बीन, सरोद, रुद्रवीणा सारमंडल, जलतरंगादि करून तंतुजल वाद्यकार, मोठमोठे गवई तशाच गाणारिणी नाटकशाळा आदिकरून गुणिजन येऊन निरिच्छ बुद्धीनें आपापल्या हजऱ्या मनोभावापासून देत आहेत; रात्रीं महा-

---

* या गर्दीत एका परभीण बाईच्या हातांतील पाटली कोणी काढून घेतल्यामुळें ती मोठ्यानें ओरडून घाबरून रडूं लागली. तीस जवळ बोलावून महाराज धीर देऊन म्हणाले, " बाई, रडूं नका पाटली सांपडेल " असें ह्मणून तीस जरा स्थिर करीत आहेत, इतक्यांत एक मनुष्य महाराजांचे पायीं डोयी ठेवीत आहे तों त्यास महाराज ह्मणाले " बाबा, या बाईची तुजजवळ असलेली पाटली तिची तिला देऊन टाक. देव तुझें कल्याण करील. " या महाराजांच्या भाषणाबरोबर तो मनुष्य आपलें दुष्कृत्य महाराजांनीं जाणिलें, मजसारिखा पापी कोणी नाहीं, असें मनांत आणून पश्चात्तापानें ती त्यानें चोरलेली पाटली खिशांतून काढून तत्काल त्या बाईस दिली. आणि महाराजांच्या चरणीं मस्तक ठेऊन सर्वपरि क्षमा मागितली. हा चमत्कार हजारों लोकांनीं प्रत्यक्ष पाहून, महाराज हे परमेश्वरी अंश असल्याची सर्वांची खात्री झाली.

राजांच्या वाड्यापुढें मोठा दीपोत्सव होत आहे; याचक-जनांच्या इच्छा पूर्ण होऊन ते आनंदानें दुवा देत परत जात आहेत; शेंकडों सद्गृहस्थ महाराजांच्या पंक्तीचा सवडीप्रमाणें प्रसाद एकेकदां घेऊन कृतकृतार्थ होत आहेत; आणि बड्या बड्या लोकांच्या घरोघर महाराजांप्रीत्यर्थ पानसुपारीचे समारंभ चालू आहेत.

असा नित्य श्रीनित्यमंगलाचा थाट मुंबईस चालू असतां, पुणें येथून रा० ब० मदन श्रीकृष्णजी, स्माल—काज—कोर्टाचे जज्ज आणि रा० ब० विनायक वासुदेवजी, ओरिएंटल ट्रान्सलेटर टु गव्हर्नमेंट, हे उभयतां सद्गृहस्थ पुण्यांतील दुसऱ्या कांहीं संभावित लोकांनिशीं महाराजांच्या दर्शनासाठीं मुंबईस येऊन चार पांच दिवस होते. त्यांचा मनोदय महाराजांस कांहीं दिवस पुण्यास घेऊन जाण्याचा असल्यावरून ट्रान्सलेटर यांनीं नाशिकचे कलेक्टर साहेबांस खासगी पत्रानें विनंति केली कीं, महाराजांस आणखीं वीस दिवसांची किरकोळीची रजा द्यावी. त्याप्रमाणें कलेकटर साहेबांकडून रुकार मिळून मशारनिल्हे उभयतां गृहस्थ महाराजांस त्यांजबरोबरील पन्नास साठ मंडळीनिशीं आपल्या बरोबर पुण्यास घेऊन गेले. बाकीची मंडळी मुंबईहून परत सटाण्यास गेली.

## मुंबईहून पुणें येथें महाराजांचें जाणें.

पुणें येथील बुधवार पेठेंतील माणकेश्वराचे वाड्यांत सतरा दिवस महाराजांचें वास्तव्य घडलें. त्यांत हरदु गृहस्थांनीं महाराजांच्या स्वारीचा उत्तम बेत राखून सर्व प्रकाराची चांगली व्यवस्था ठेविली होती. पुणें, नगर, सोलापूर, सातारा प्रांतांतील व मोगलाई मुलुखांतील लोक महाराजांच्या दर्शनास धांव घेऊन यात्रेची एकच धूम उडून राहिली. परंतु सर्व बंदोबस्त

उत्तम असल्यानें दरोबस्त लोकांस स्वस्थपणें महाराजांचें दर्शन होऊं लागलें. पुणें व लष्करांतील बडे बडे साहेब लोकही आपापल्या मडमा व बाबालोक यांसह मोठ्या उत्कंठेनें येऊन महाराजांच्या चरणीं लीन झाले. द्वारीं अष्टोप्रहर चौघडा झडून, नाना गुणिजनांच्या हजऱ्या वगैरे सर्व प्रकारचा थाट मुंबईहून कांकणभर जास्त उडून राहिला.

एके दिवशीं महाराजांनीं शनवार पेठेंतील ओंकाराचे वाड्यांत आपल्या जन्मभूमीचा दर्शनविधि करून ब्राह्मण संतर्पण केलें. व तशीच एके रात्रीं पुण्यांतील सर्व वैदिक, शास्त्री, पुराणिक, हरिदास इत्यादि भिक्षुक मंडळीची मोठी सभा करून त्यांस दक्षणा व पोषाख दिले. त्या शिष्टसंभावनेकडे बावीसशें रुपये पर्यंत खर्च लागला, असें समजतें. शहरांत महाराजांच्या सन्मानगौरवार्थ पानसुपारीचे बहुत समारंभ झाले. एके दिवशीं हिज एक्सेलेन्सी मुंबईचे गव्हरनर साहेब सरवुल्यम राबर्ट सेमोअर व्हेसे फिटझरल्ड, जी. सी. एस. आय यांजकडेस गणेशखिंडींतील खुद्द त्यांचे बंगल्यावर महाराजांस मोठी जाफत झाली. त्या जाफतीस पाचारण केलेले बडे बडे लोक नेमल्यावेळीं येऊन खुद्द गव्हरनर साहेब बंगल्याचे काम्पाउंडापर्यंत महाराजांस सामोरे जाऊन त्यांनीं त्यांस नेऊन मुख्य स्थानीं बसविलें. त्या समयीं “सरकारच्या ताबेदाराचा ताबेदार असा मी एक यःकश्चित् मामलेदार आहें, तेव्हां इतक्या सन्मानास मी पात्र नाहीं.” असें महाराज ह्मणत असतां गव्हरनर साहेब ह्मणाले, सेव्यसेवकभावसंबंधानें मी आपणांस पहात नसून आपण सर्वत्र पूज्य आहांत, त्या अर्थी मलाही आपण मान्यच असल्यावरून हें जें मी काय आपणासाठीं करीत आहें तें कांहींच नाहीं. असें ह्मणून त्यांनीं स्वहस्तें महाराजांच्या कंठांत पुष्पहार घालून विडे गजरे अत्तर गुलाब दिले व त्याप्र-

माणेंच इकडे रा० ब० विनायक वासुदेवजी यांजकडून सर्व मंडळीचा पानसुपारीचा उत्तम बेत राहिला. नंतर जाफत उठून सलाम झाले. सारांश, या सतरा दिवसांत पुणें-राजधानींत महाराज हे पेशवेच होऊन जयजयकारानें नांदत आहेत कीं काय ! असा सर्वत्र भास होऊं लागला. असो. मग पुणेकरांचा निरोप घेऊन महाराज स्वस्थानीं जावयास निघाले.

परत आपल्या स्वस्थानीं सटाण्यास जाण्याकरितां महाराज पुण्याहून निघून, मध्यंतरीं नाशिकास आपले अधिकारी मे० आर्स्किन् साहेब बहादूर कलेक्टर यांचे भेटीकरितां गेले. साहेब बहादुरांची भेट होऊन त्यांजबरोबर महाराज शहरांतून मार्गानें चालले असतां त्यांच्या दर्शनासाठीं लोकांची इतकी गर्दी उडाली कीं, पुढें चालण्यास लवकर वाट न मिळून त्यांजवर पेढे—बर्फीची चोहोंकडून वृष्टि होऊं लागली. ती लोकांची दाटी व पाठीवर होत असलेला पेढ्यांचा भडिमार, यांहीं करून साहेब घाबरून जाऊन त्यांनीं महाराजांस "आताचे आतां तुह्मीं येथून निघून सटाण्यास दाखल होऊन पर्वीच्या हिशोबाचा उतारा तुमच्या स्वहस्तें रवाना झाला पाहिजे." असा हुकूम फर्माविल्यावरून महाराज तेथून निघून मुदतीप्रमाणें सटाण्यास आपले कामीं हजर झाले.

पुढे थोडक्याच दिवसांत कलेक्टरसाहेबांची स्वारी फिरस्तींत सटाण्यास गेली असतां, मे०अशबर्नर साहेब बहादूर रेव्हिन्यू कमिशनर यांचीही स्वारी तेथें दाखल झाली. हरदु साहेब सकाळीं तंबूवरून गावांत येत असतां, इकडून रावसाहेबही त्यांचे भेटीकरितां गांवांतून तंबूकडे चालले असून त्यांजसभोंवती हजारों यात्रेकरी लोकांची गर्दी होती. हा समोरील लोकसमुदाय पाहून कमिशनर साहेबांस प्रथम वाटलें कीं, हें गांवगांवचे लोक एकत्र जमून कांहीं मागणें मागावयाकरितां आपणाकडे येत

आहेत; परंतु मागाहून कलेक्टरसाहेबांच्या सांगण्यावरून, ही रावसाहेब यशवंतरावमहादेवांची यात्रा असल्याचें त्यांस कळून आलें; व पुढें ते लोक दूर अंतरावर थबकून जेव्हां रावसाहेब हे साहेबांजवळ एकटेच आले, त्यावेळीं साहेबांचा तो सर्व संशय दूर झाला; व त्यांस मोठा चमत्कार वाटला. आधींच रावसाहेबांविषयीं या कमिशनर साहेबांचें मन पूर्वी खानदेशांत ते कलेकटर असल्या वेळेपासूनच शुद्ध नसून, हल्लींची ही त्यांची यात्रा व थाट अवलोकन करून " यांजकडून सरकारी काम खचित वक्तशीर बरोबर होत नसेल, त्याअर्थी यांस पेनशनांत काढावें. " असें तत्काळ त्यांच्या मनांत पूर्ण भरलें.

या वेळीं लायसेन्स ट्याक्स या कराचें काम चाललें होतें. त्यांत सटाणे तालुक्यांतील अभोणें आणि जायखेडें या दोन पेट्यांवरील महालकऱ्यांच्या कामावर अनुक्रमें पंचावन् आणि एकशें-एक तक्रारीचीं अपिलें झालीं असून खुद्द रावसाहेबांचे हद्दींतील कामासंबंधानें काय तीं सारीं तेरा अपीलें झालीं होतीं. असें असतां एकंदर सटाणें तालुक्याचे माथ्यावर एकशें-एकुणसत्तर अपीलें झाल्याचा अंक लागून कलेकटराकडून रेव्हिन्यु कमिशनराकडे रिपोर्ट झाला. आतां ह्या एकशें-एकुणसत्तर अपीलांच्या एकंदरींत रावसाहेबांचें काम किती चोख व बिनतक्रार झालें होतें हें वाचकांच्या सहज लक्षांत येईलच. परंतु या गोष्टीचा किंचित विचार न होतां हरदु महालकऱ्यांचा दोष रावसाहेबांचेच शिरावर बसून " रावसाहेब यशवंतराव महादेवांस बरोबर काम करितां येत नाहीं व त्यांच्या वयांचीं पंचावन् वर्षेंही भरून गेलीं, तेव्हां यांस पेन्शन द्यावें." अशा अभिप्रायाचा कमिशनराकडून सरकारांत रिपोर्ट झाला; त्या बरहुकुम सरकारांतून मंजुरात मिळून लागलींच रावसाहेबांच्या जागीं दुसऱ्या मामलेदाराची नेमणूक [illegible] झाली [illegible] त्याप्रमाणें

ग्रंथ संग्रह

नेमलेले नवे मामलेदार सटाण्यास दाखल होतांच त्यांस कामाचा चार्ज देऊन रावसाहेब यशवंतराव महादेव हे सरकारी ताबेदारींतून निरंतर मुक्त झाले.

पुढें या पारतंत्र्यमुक्त पुरुषास सरकारांतून पेन्शन घेण्याविषयीं सूचना झाली. त्यावेळीं रावसाहेबांनीं त्यालगतच असें लिहिलें कीं, मी काम करण्यासारखा असतां ज्या दोषांकरून सरकार मला एकदम नौकरींतून अलग करून पेन्शन घेण्याविषयीं ह्मणत आहे, ते दोष एक तर माझ्या पदरांत यथातथ्य घालावे, नाहींपेक्षां निर्दोषपणानें माझे हातून पुन्हां एक महिनाभर मामलेदारीचें काम घ्यावें आणि मग पाहिजे असल्यास मीच होऊन नौकरीचा राजीनामा देऊन पेन्शन घेईन. परंतु “ साप ह्मणून उगीच भुई थोपटणें, या न्यायानेंच जर सरकार मला बळेंच पेन्शन देत आहे, तर तें निरर्थक घेणें हा अन्याय होईल, जाणून पेन्शन घेण्याची माझी बिलकुल इच्छा नाहीं. ” असें लिहून त्यांनीं आपल्या नौकरीची कारकीर्द संपविली. असा असद्द्वेष्टा, निर्लोभी, दृढनिश्चयी आणि निस्पृही पुरुष या जगांत क्वचितच आढळून येईल ! ! !

# प्रकरण तिसरें.

## श्लोक.

( स्रग्धरा. )

स्वस्थानीं वा विदेशीं सुभग-पुरुष तो अन्य कोठेंहि राहो
शोभे; कंठीं शिरीं कीं हृदयिं मनगटीं जेंवि बोटीं हिरा हो
कोठें त्या वाण कैंची न पडुनि सहसा, सिद्धता सर्व राहे
जो तो-तत्पाद सेवा नवसुनि मजला दे ह्मणे ईश्वरा हे ॥

## इच्छागमन स्थिति.

शके १७९५–१८०६ अथवा सन् १८७३–८४ पर्यंत.

शके १७९५ ह्मणजे सन् १८७३ च्या मार्च महिन्यांत रावसाहेब यशवंतराव महाराज आपल्या मामलेदारीच्या सरकारी नौकरींतून अलग होऊन पेन्शन न घेतां घरीं बसले. आतां स्वतःच्या कमाईची एक पैशाची ही खरी प्राप्ति उरली नाहीं; सरकारी अधिकार ही गेला; दिगंतरीं पोहोंचलेल्या नांवलौकिकावरून हजारों याचकजन नित्य धांव घेऊन येत आहेतच; आणि मागें तर जगत्कुटुंबाचा खटला; तेव्हां आजपर्यंत आपली अखंड चालत आलेली नित्यस्थिति यापुढें कशी चालेल ? इत्यादिकां विषयीं त्या वदान्य व जगत्कुटुंबी पुरुषाच्या अंतःकरणांत काडीमात्र चिंतावास न करितां " देवास ती सर्व काळजी आहे. " असें ह्मणून आपल्या नित्यक्रमांत किंचित् अंतर न पडूं देतां त्यांनीं सर्व यथाक्रम स्थिति चालविली. तळ देऊन बसलेल्या गोसांवी बैराग्यांच्या झुंडीस थंडी न लागावी ह्मणून सुद्धां धुन्या लावण्याकरितां लांकडांचीं ढोणें पुरविण्या पर्यंतची ज्या दयाशील पुरुषास काळजी, त्यास या

समयीं दुसऱ्याचें ऋण काढण्याचा वारंवार प्रसंग येऊं लागला. वायद्याची याचक मंडळी सभोंवताली थोपून आपापल्या करुणा भाकीत असतां कोणास लुगडें चोळी' कोणास धोतरबंडी, कोणास मुकटा धाबळी, कोणास सत्रंजी कांबळी, कोणास लोटा कटोरी, आदिकरून अनेक इच्छित वस्तु देण्याची तातडी असल्यामुळें येणाऱ्या यात्रेकऱ्यां पासून नित्य दहावीस रुपयांची उसनवारी करणें त्या पुरुषास भाग पडूं लागलें. भलत्या वेळीं येऊन पुकारीत असलेल्या क्षुधित पांथस्थ अतिथिजनांस कोणास उपवास असल्यामुळें दाणें, गूळ खजूर मिठाई, कोणास डाळें चुरमुरे, कोणास त्वरित होणाऱ्या खिचडी साठीं तांदुळ डाळ, तूप, कोणास हालवायाकडील पक्की रसई, वक्तशीर देवविण्याची तजवीज चालू आहे, त्यांतच कोणी गांजा तमाखूचे परमभक्त आपल्या वासना व्यक्त करीत असतां, त्या पूर्ण होऊन ते उतरल्या जागीं आनंदानें परत जात आहेत. देघळें, धर्मशाळा, मशीदी, यांतून आजारी व व्याधिग्रस्त होऊन पडलेल्या अनाथ लोकांची सकाळ संध्याकाळ खबर घेऊन, त्यांस औषधें देऊन, त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था राखणें नित्य होत आहे. प्रसंगीं अनाथ प्रेतसंस्काराचीही लवे तजवीज लावणें होत असे. सारांश, ॥ श्लोक ॥ " अयंनिजः परो वेति गणना लघुचेतसां ॥ उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकं ॥१॥ ह्याप्रमाणें हा माझा, हा परका अशी गणना या समदृष्ट व महोदार पुरुषाचे ठिकाणीं मुळींच नसून, पृथ्वीच आपलें कुटुंब समजून प्राणिमात्रांची कळकळ बाळगून, त्यांच्यासुखसंतोषार्थ जो तनुमनधनें---करून सतत झिजून झटत असे. अशा त्या साधुवर्य यशवंतराय महाराजांची उत्तरोत्तर अधिकाधिक सर्वत्र वाहवा होत जाऊन तो पुरुष एकदांतरी प्रत्यक्ष पहावा, अशी भरतखंडांतील व्यक्तिमात्रास उत्कंठा प्राप्त झाली.

येवलें येथील प्रसिद्ध भाऊ चिमणासा शेट पाटोदकर यांजकडून कांहीं पैशाची रकम आणावयासाठीं महाराजांच्या आज्ञेवरून त्यांचे कनिष्ठ बंधु रामचंद्र दादा हे सटाण्याहून एके दिवशीं येवलें येथें गेले असतां तत्क्षणीं यशवंतराव महाराज आल्याचा सर्वत्र पुकार होऊन सर्व येवलें त्यांच्या दर्शनास धांवले. " मी महाराज नसून त्यांचा बंधु आहे. " असें ते लोकांस वारंवार सांगत असतां मुखवट्याच्या सारखवटपणामुळें हे महाराजच आहेत अशा खातरीनें जे ते त्यांच्या पायीं लोटून नारळ फोडून बरोबर आणिलेला पेढा बर्फीचा प्रसाद आनंदानें वांटूं लागले. पुढें लवकरच हे महाराज नसून त्यांचे भाऊ आहेत असें कळून येऊन सर्व लोक हिरमुष्टीपणानें कष्टी होऊन घरोघर गेले.

नुसते महाराजांचे बंधु येऊन एक दिवस मुक्कामास होते, त्यांत गांवभर महाराज आल्याची कंडी पिकून सर्व येवलें गजबजलें. ह्यावरून शिष्टांपासून तों कनिष्टांपर्यंत सर्व येवलेकरांची महाराजांच्या ठिकाणीं पूर्ण निष्ठा असल्याचा प्रत्यय येऊन, भाऊ चिमणासा शेट आदिकरून सावकार लोक आणि रावसाहेब प्रल्हाद कृष्ण शहाणे मामलेदारप्रभृति गृहस्थ मंडळी यांच्या मनांत असें आलें कीं, त्या जगद्वंद्य पुण्यश्लोक पुरुषाचे प्रत्यक्ष पाय आपल्या पांढरीस लागले असतां, ती पाय-धूळ आपलें सर्व दैन्य व मनाचें गढूळपण समूळ घालवील, ह्यांत संदेह नाहीं. मग सर्वांच्या विचारें, पाटोदकर स्वतःसटाण्यास जाऊन महाराजांस त्यांच्या आश्रित व परिचारक मंडळीसह सत्कारपूर्वक सन् १८७३ च्या आक्टोंबरच्या आरंभीं येवल्यास घेऊन आले.

## येवलें.

महाराज आल्यामुळें सर्व येवलेकरांचा उत्साह वाढून त्या

यशवंतमाउलीकडे वत्साप्रमाणें धांव घेऊं लागले. त्या संसार-तापपीडित येवलेकरांस ती यशवंतमाउली पावलोंपावली विश्रांतीची सावली होऊन सुख देऊं लागली. ग्रामनिवासी हरव्यवसायी लोक आणि सरकार नौकरमंडळ, अनुक्रमें आपापल्या जरूरीच्या कामाचा आणि कचेरीचा अवश्य वेळ खेरीज करून बाकीचा बहुतेक काळ महाराजांच्या समागमांत घालवूं लागले. फावल्यावेळीं बायका आपल्या मुलांबाळांस बरोबर घेऊन महाराजांच्या दर्शनसुखाचा नित्य अनुभव घेऊं लागल्या. सटाणें हें आपलें ठाणें सोडून महाराज येवल्यास वास्तव्यास असल्याची आवई देशभर पसरून दर्शनेच्छु यात्रेकऱ्यांचे आणि याचकजनांचे लोट सटाण्याचा ओघ सोडून मनमाड स्टेशनापासून वळण घेऊन येवल्यावर नित्य वाहूं लागले. जरतारी, रेशमी आणि सुती ह्या विणकर कामाची येवलें ही जय्यत पेंठ असल्यामुळें मोठमोठे व्यापारी शेट थेट येऊन तिची भेट घेण्यास आधींच तत्पर असत, त्यांतून त्याच ठिकाणीं सांप्रत महाराजांचा निवास असल्यामुळें ते सर्व अत्युत्कंठेनें वरचेवर येऊन एकसमयानें स्वार्थपरमार्थसुखाचा लाभ पावूं लागले. अशावेळीं महाराजांचें निवासमंदीर श्रीडाकुरजीच्या ठाकुरद्वाराचा सदा सुखानंद देऊं लागलें. त्यांचें पूजागार संसारतप्त जनांस थंडगार करूं लागलें. त्यांचें सूपगृह सदां पाकनिष्पत्तीची सिद्धता राखून आल्या ब्राह्मणास आग्रहपूर्वक भोजनानें तृप्ति देऊं लागलें. गांवांत चहूंकडे त्यांच्या औदार्याद्यनेक गुणांच्या गोष्टी चालून जयजयकार शब्द वरचेवर कानीं येऊं लागला. रावसाहेब शहाणे यांची महाराजांच्या ठिकाणीं परमभक्ति जडून ते त्यांच्या सेवाभजनीं लागले. सत्संगतीचा महिमा अवर्णनीय आहे, त्यांची तीव्रता मोडून अंगीं इतकी शांति आली कीं, त्यांस मोठे जरबी व कडक मामलेदार ह्मणून पूर्वी लोक ह्मणत

असत, तेच आतां त्यांस साधु साधु ह्मणून त्यांच्या पायां पडूं लागले. सारांश, घरोघर उत्सव नांदून त्या समयीं येवलें हें बाहेर गांवच्या लोकांस केवळ माहेर होऊन राहिलें.

अशा सुखानंदांत येवलें तीन महिने नांदत असतां सन् १८७३ च्या अखेरीस श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकर यांची स्वारी सहकुटुंब सपरिवार श्रीजेजुरीच्या यात्रेसाठीं इंदुराहून निघून रेलवेमार्गानें मनमाड येथें दाखल होऊन तेथें एक-दिवस स्वारीचा तळ पडला. दुसरे दिवशीं पुढें स्वारी कल्याणमार्गें जाण्याची तयारी असतां त्या रात्रीं श्रीमंतांस कांहीं दृष्टांत झाला, त्यावरून रेलवेनें स्वारी जाण्याची महकुबी होऊन श्रीयशवंतराय महाराजांचें दर्शन घेऊन येवल्यांहून पुढें पायवाटेनें जाण्याचा बेत ठरला व पहांटेस कुच होऊन स्वारी येवल्यास जाण्यास निघाली. ही वार्ता ताबडतोब पहांटेच्या चार घटका रात्रीसच येवलेकरांस लागून रावसाहेब मामलेदार आदिकरून शिष्ट महाजन मंडळी आणि मोठमोठे शेट सावकार, मोठ्या लवाजम्यानें होळकर सरकारांस सावरगांवापर्यंत सामोरे जाऊन त्यांनीं मोठ्या थाटानें स्वारीस येवल्यास नेलें.

येवलें येथें होळकर सरकारच्या स्वारीचा दोन तीन दिवस मुक्काम झाला. त्यांत श्रीमंत आणि महाराज यांच्या दर्शन भेटी होऊन परस्परांस परमानंद झाला. श्रीमंतांनीं अर्पिलेला बहुमोल नजराणा मोठ्या सयुक्तिकपणानें घेण्याचें टाळून शिवाय महाराजांनीं श्रीमंतांस, थोरले व छोटे बाळासाहेब ह्या त्यांच्या दोघां चिरंजीवांस आणि उभयतां राण्यांस योग्यतेचे भरगच्ची उंची पोषाख दिले. ते प्रसाद ह्मणून घेऊन श्रीमंतांनीं महाराजांस विनंति केली कीं, या दासावर निरंतर कृपादृष्टी राहून हे पुण्यचरण एकवार इंदूर राजधानीस लागून माळवा देशास पवित्र क-

रावें. मग महाराजांची आज्ञा घेऊन श्रीमंतांची स्वारी जेजुरीस जाण्यास मार्गस्थ झाली.

पुढें दीड महिन्याच्या अवकाशांत रावसाहेब शहाणे मामलेदार यांची बदली बागलाण तालुक्यास होऊन ते महाराजांस आपल्या बरोबर घेऊन सटाण्यास गेले, तेणेंकरून येवलेकरांवर औदासिन्याभ्रपटलाची छाया एकदम फिरली. असो. सटाण्यास जाऊन सुमारें पंधरा दिवस होत आहेत, तोंच महाराजांचे चुलत बंधु रा० रा० हरिभाऊ भोसेंकर संगमनेर कचेरींतील सबरजिस्टर यांचें पत्र आलें कीं, मीं पूर्वीं दोन तीन पत्रें पाठविलीं त्याप्रमाणें येवल्यांहून परभारें इकडे महाराजांचे आगमन घडेल, अशी मला व सर्व संगमनेरकरांस फार आशा होती. परंतु तसें कां घडलें नाहीं? हें कांहींच समजत नाहीं. असो आतां तरी या आपल्या भावाची विसरसांड आणि संगमनेरकरांचा अव्हेर न करितां होईल तितकें लौकर येण्याचें करून आनंद द्यावा. हें पत्र वाचतांच महाराजांच्या मनानें उचट घेऊन ते लागलीच तिकडे जाण्याच्या तयारीस लागले. जो मनुष्य जगत्कुटुंबी ह्मणून बनला, त्याच्या आश्रयास नेहमी शें पन्नास लोक सहजच असावयाचे. त्याप्रमाणें सर्व तयारी होऊन मंडळीसह महाराज सटाण्याहून निघून शके १७९९ च्या फाल्गुन शुद्ध ११ रोजीं संगमनेरच्या सीमेस तिसरे प्रहरीं दाखल झाले.

## संगमनेर.

मुसलमानी मोहरम महिन्यांतील ताबुताचा हा दिवस होता. फौजदारी सर्व अधिकारी ताबुतांच्या बंदोबस्तास गुंतले असून तमाम गांवकरी लोक ताबूत मिरवणुकीच्या महल्लयांतील दुतर्फा घरांच्या ओट्या माळवदांवरून मजा पहात बसले आहेत; गांवगन्नाचे हजारों लोक गांवांत थडकून जिकडे तिकडे गर्दी झाली

आहे; अशा वेळीं यशवंतराव महादेव सान्निध येऊन ठेपल्याची बातमी गावांत प्रवेशून क्षणांत चोहोंकडे पसरली. मग काय विचारतां? कशाचे ताबूत आणि कशाची मजा!!! ती यशवंत नामध्वनि हिंदुमात्राचे कानीं पडतांच, हैदस धुल्ला या नांवाचा सल्ला करून जिकडे तिकडे माजलेला जो कल्ला, त्यास एकदम इल्ला बसून, थेट ब्राह्मणापासून तों रामोशी भिल्ला पर्यंत सर्वतो मुखीं "जय यशवंतराव महाराजकी जय" हा जयघोष प्रगट होऊन जो तो महाराजांच्या वाटेकडे धांव घेऊं लागला. याप्रमाणेंच ताबुतांच्या बंदोबस्ताची व्यवस्था लावून मामलेदार फौजदार वगैरे कचेरींतील कामगार मंडळी आणि शिष्ट संभावीत ग्रामस्थ लोक महाराजांस गांवांत घेऊन येण्या करितां भजनवाले बाजंत्री, तासेवाले, शिंगाडे, हलके यांसह मोठ्या उत्साहानें सामोरे गेले. अकाळीं मेघवृष्टीनें जसा अल्प काळांत ओढ्यास महापूर लोटून पुनः घटकेनें पहावें, तों तें सर्व पाणी ओसरून जाऊन लागलीच उतारा होतो, त्याप्रमाणेंच ह्या ताबुतांच्या मेळ्याची स्थिति झाली. त्या महल्यांत मुसलमान आणि फकीरी घेऊन आंगावर नाडे वाहिलेले हिंदू एवढेंच मात्र कायते बाकी उरले. असो. सामोरे गेलेल्या लोकांनीं गांवा बाहेर महाराजांचें धुळदर्शन घेऊन महाराजांच्या वाटचालीच्या गाड्या गांवांत चालविल्या. भोंवताली हजारों लोक असून मध्यें अधिकारी वगैरे महाजन मंडळी समागमें महाराज चालले आहेत; पुढें भजनाच्या दिंड्यांतून टाळ, झांज, मृदंग, ढोल,—यांच्या नाद तालावर संतमेळ्यांचीं मोठ्या कडाक्याचीं भजनें चाललीं आहेत; त्या पुढें वाजंत्री आपल्या सनयाच्या जोडांतून धनासरी रागाचे जोड दाखवून चीजा गात असतां ती अलापदारी लोकांचें चित्त आपणाकडे वेधून घेत आहे; त्यापुढें ताशांचा कडकडाट, शिंगाच्या तालयुक्त गर्जना आण हालक्यांच्या टिम-

र्‍यांचा तालतालावरील खणखणाट चालला आहे; चोहों बाजूंनीं लोकमुखांतून "यशवंतराय महाराजकीजय" असा वारंवार जयघोष होत असून वरचेवर गुलाल उधळत आहे; अशा थाटानें मिरवत गाजत महाराजांची स्वारी अस्तमानीं दाडकरांच्या वाड्यास जाऊन पोहोंचली.

अहमदनगर जिल्ह्यांत संगमनेर हा तालुक्याचा गांव प्रवरा आणि म्हाळुंगी ह्या दोहों नद्यांच्या संगमावर असून सुमारें दहा हजार वस्तीचा आहे. येथील हवा निरोगी असून त्या अमृतवाहिनी प्रवराबाईचें पाणी मोठें गोड व पाचक आहे; प्रवरापानाची प्रसिद्धि असल्यावरून येथें बाहेर गांवचे कित्येक रोगी हवापालट करून बरें होऊन जात असल्याची ख्याती आहे. दोन्ही नद्यांचे मधील विस्तीर्ण बेटांत गर्द आंबराई व हवाशीर बगीचे असल्यानें तें उन्हाळ्यांत लोकांस नंदनवनच होत आहे, हा गांव मोठा बागाइती असून या सभोंवतीं मोठी आंबराई आणि मुख्यत्वें करून डाळिंबाचे बगीचे, तसेच केळींचे बाग, आणि पानमळे पुष्कळ आहेत. ब्राह्मणवस्ती तीन चारशें घरांची असून बहुतेक भिक्षुकांस लहान मोठीं राजेबहादराचीं वर्षासनें आहेत. येथें रंगारी लोकांची वस्ती बरीच असून त्यांजकडून म्हाळुंगींच्या तेजस्वी पाण्यावर तयार होत असलेल्या पक्या करारी खारवी रंगाची मोठी आख्या आहे. गुळीच्या रंगावर काळें सूत रंगविण्याचे निराळी लोकांचे येथें कारखाने आहेत. खत्री, साळी, कोष्टी आणि मोमीन यांचे हजार बाराशें माग चालू असून येथें लुगडीं चांगलीं तयार होतात. येथें मारवाडी व्यापाऱ्यांची भरगची वस्ती असून त्यांचीं निव्वळ विलायती कापडांचीं शें दीडशें दुकानें आहेत. किराण्याचे व हरजिनसांचे दुकानदार बहुतेक मारवाडीच आहेत. सावकारीचे व हुंडीचे दुकानदार मारवाडी व गुजराथी आहेत.

सराफा बहुतेक ब्राह्मणांचा आहे. येथें नित्य सकाळ संध्याकाळ भाजीपाला व फळफळावळीची चांगली गुजरी भरत असून शनवारचा बडा बाजार भोंवतालच्या हजार पांचशें गांवांपेक्षां मोठ्या दणक्याचा भरत असून त्यांत ह्या तालुक्यांत विकत असलेली उत्तम बाजरी, व तुरी, आणि राजूर डांगचे जातजातीचे चांगले तांदूळ, तसेच कान्हुरपठारचे गहूं हरभरे येत असून त्यांचे खरीददार पुण्यापर्यंतचे व्यापारी आहेत. गांवांत राम, सांब, देवी, मारुती, नरहरी, विठोबा, मुरलीधर, पंचायतन, बालाजी खंडेराव आदिकरून देवस्थानें असून पुरषोत्तमानंत स्वामींचे अनुक्रमें दोन मठ आहेत. शिवाय गांवा बाहेर प्रवरानदीच्या काठीं केशव तीर्थाच्या घांटा नजीक भवानी बोवा अवलीयांचा मठ असून त्या भोंवती मोठा बगीच्या आहे. अशा त्या संगमनेर ग्रामीं यशवंतराय महाराज प्राप्त झाले.

"सब् शहरीं एक संगमनेरी" या ह्मणीवरून कित्येक लोक संगमनेरकरांस अर्कट लुच्चे समजतात; परंतु हा त्यांचा समज निव्वळ पोरकटपणाचा आहे. कारण "सब् शहरीं एक संगमनेरी ह्मणजे सर्व शहरांतून निदान एक तरी संगमनेरचा मनुष्य आहेच. असा या ह्मणीचा खरा अर्थ आहे. व हीच ह्मण त्यांच्या गुण विद्येची व शहाणपणाची साक्ष देत आहे. इतकें मात्र खरें कीं, इतरांप्रमाणें संगमनेरकर केवळ देवभोळेपणानें डोळेझांक न करितां कोणत्याही गोष्टीचा शहनिशाय केल्यावर मग तो आपला आशय प्रगट करील. परंतु यशवंतराय महाराज या वदान्य व जगमान्य पुरुषा विषयीं कुतर्कजन्य अन्य कल्पना कोणाचे मनांत प्रवेश न करितां थोरापासून तों सामान्य जनापर्यंत सर्व लोक आपल्या दारापुत्र कन्यकांसह त्यांच्या नित्य दर्शनास जाऊन आपलें पाप, ताप, दैन्य घाल-

वून धन्य होऊं लागले. नित्य नवे नवे नवस होऊन पूर्वीचे केलेले नवस फिटूं लागले. रावसाहेब गणेश आप्पाजी जोशी मामलेदार, कृष्णाजी सदाशीव मुसळे फडनीस, तुकाराम राजाराम फौजदार, हरिभाऊ भोसेकर सत्र् रजिस्टर आदिकरून कामगार मंडळी व त्याप्रमाणेंच श्रीमंत राजासाहेब जिनसीवाले आणि मोठमोठे संभावीत शेटसावकार लोक आपला व्यासंग संभाळून सकाळ संध्याकाळ महाराजांच्या दर्शन-संभाषण-सहवास-सुखाचा अनुपमेय लाभ घेऊं लागले. मामलेदार, फौजदार, जिनसीवाले आदिकरून मंडळीच्या पुढारीपणानें खर्चाच्या कामांत केवळ धारवाडी कांटा, असे जे मारवाडी लोक, तेहीं पण मनांत कांकूं न करितां महाराजांप्रीत्यर्थ एक एक दिवस जो लागेल तो खर्च करण्यास मनापासून तयार झाले. मग लागलीच तीन चार महिन्यांच्या मितीवार नांवनिशीच्या यादी तयार होऊन ज्यानें त्यानें महाराजांच्या खर्चाचा आपला एक एक दिवस नेमून घेतला. जोडसनयांच्या आलापयुक्त मधुर स्वरांवर महाराजांच्या द्वारीं नित्य त्रिकाळ चौघडा झडूं लागला. एकमेकांच्या चढाओढीनें नित्य नव्या पक्वान्नांची रेलचेल होऊन महाराजांच्या मंदिरीं रात्रिसमयास मेजवानीच्या थाटाचें दोनअडीचशें ब्राह्मणांचें पात्र उठूं लागलें. महाराजांस नित्य उपोषण असल्यामुळें नित्यशः त्यांचा आणि एकादशीस सर्वांचा निरशनाच्या फराळाचा बेत श्रीमंती थाटाचा होऊं लागला. गांवांत चहूंकडे सर्वतोमुखीं महाराजांच्या कर्तृत्व गुणांच्या गोष्टी निघूं लागल्या.

अशा वेळीं रावसाहेब हरी कोन्हेर मुनसफ हे गृहस्थ मात्र स्वाभिमानपणानें महाराजांस सदा विन्मुख राहून लोकांस तुच्छ करीत असत. परंतु चमत्कार असा घडून आला कीं, मुनसफ यांस अकस्मात पोटशूळ उत्पन्न होऊन ते तीन दिवस धरणीस

खिळले. सर्व उपचार हरले; परंतु गुण ह्मणून कांहीं नाही. शेवटीं त्यांच्या कुटुंबांनीं महाराजांकडे जाऊन प्रार्थना करितां दिलेलें देवाचें तीर्थ आणून पतीस ग्रहण करण्यास दिलें. तें वेतांच कानांत सांगितल्यासारखी गोष्ट होऊन देवाच्या कृपेनें शूळ हळूहळू बंद होत होत दोन तासांत अगदीं नाहींसा होऊन त्यांस चार घटका स्वस्थ झोंप लागली. पुढें क्षुधा लागून त्यांनीं थोडें खाल्यानंतर जिवास विश्रांति वाटून त्यांच्या मनाची सर्व भ्रांति फिटली. महाराजांच्या ह्या अमानुष कर्तृत्वानुभवानें कोन्हेर हे निरहंकृत होत्साते त्यांच्या पूर्ण सेवाभजनीं लागले.

बाजार पेठेंतील श्रीबालाजीच्या दर्शनास जाण्याचा महाराजांनीं नित्य नेम ठेविला होता, शिवाय सणवार, एकादशी, जयंत्यादि दिवशीं त्या त्या देवस्थानांत ते जात असत. महाराजांचें निवास–स्थान आणि बालाजीचें मंदीर यांमध्ये पांचशें दंड ह्मणजे सुमारें अर्धा मैल अंतराचा सर्व रस्ता मागील चार घटका दिवसास लोकांनीं पाण्यानें शिंपून तर्र करावा. त्या रंगार आळींतील आणि बाजार पेठेंतील दुतर्फा घरां समोरील मर्यादेच्या जागा ओसरीप्रमाणें घरवाल्यांनीं हातांनीं सारवून त्या समिवर जोड–रांगोळ्यांचे गुलालमिश्रित रांगोळीचे पट्टे आंखून, आंतील भागीं हस्तकौशल्याच्या नानाप्रकारच्या चित्रविचित्र रांगोळ्या काढून त्या बहुविध रंगांनीं खुलवून मंडित कराव्या. त्या रेखांकित केलेल्या रांगोळ्यांच्या पट्ट्यांवरून एका हारीनें कापुराचे मोठे मोठे खडे मांडून, सोंगट्यांतून उदबत्त्या खोंचून ठेवाव्या. तशाच ओट्यांच्या हद्दीस बांधून ठेविलेल्या चिराखदानाच्या काठ्यांवरून दीपावळी सिद्ध करून ठेवाव्या. अशा त्या सुशोभित सर्व सिद्ध मार्गांतून मागील दोन घटका दिवसास शें पन्नास मंडळीनें वेष्टीत अशी महाराजांची स्वारी श्रीबालाजीस जाऊन

अस्तमानीं परतून येतांना दीपावलीचा चकचकाट, उदबत्यांचा घमघमाट आणि घरघरांच्या हद्दीस महाराज थडकतांच प्रज्वलित होत असलेल्या कापुराचा दखलखाट, ह्यांहीं करून तो सर्व मार्ग सुगंधानें व प्रकाशानें भरून जावा. अशा समारंभ थाटानें वरचेवर जय-ध्वनि होत होत महाराजांची स्वारी दोन घटका रात्रीं स्वस्थानीं नित्य परत जावी.

महाराजांच्या कीर्तिकस्तुरीचा वार्ता-सौगंध चहूंकडे दरवळून दूर दूरचे हजारों लोक संगमनेराकडे धांव घेऊं लागले. दक्षिणेस थेट सोलापुरापासून सर्व पुणें प्रांत, पूर्वेस मोंगलाईपासून सर्व नगरजिल्हा, उत्तरेस खानदेशापासून सर्व गंगथडी आणि पश्चिमेस कोंकणपट्टीपासून नाशिकप्रांत, असे तमाम लोक महाराजांच्या दर्शनास गाड्यां घोड्यांवरून व कोणी पादचारी लोटूं लागले. प्रवरा आणि ह्माळुंगी ह्या नद्यांच्या अफाट व स्वच्छ वाळवंटांत गाड्या घोडीं सुटून यात्रेचा नित्य मोठा तळ पडूं लागला. अशा वेळीं लोकांचे इतकें निष्पाप व निर्विकल्प ( ह्मणजे शुद्ध व एकाकार ) मन होऊन गेलें कीं, त्या खुल्या वाळवंटांत आपला बाडबिस्तारा लावून यात्रेकऱ्यांनीं खुशाल महाराजांच्या दर्शनास गांवांत जाऊन पाहिजे त्यावेळीं परत बिऱ्हाडास जावें, परंतु कोणाचा सुतळीचा तोडा सुद्धां हालूं नये मग बैल, घोडा थोडाच चोरीस जाणार! पोलीसच्या बंदोबस्ताची मुळींच गरज राहिली नाहीं. कदाचित् कोणाची कांहीं चिन्नस अथवा वस्त्र, पात्र नजरचुकीनें बिस्ताऱ्या बाहेर राहिलें, तरी तें यात्रेकऱ्यांस कितीही वेळानें परत गेलें असतां तेथेंच मिळावें. ( या यात्रेंतच एक तद्देशीय परदेशी आणि खत्रीणबाई या दोघां पांगळ्या मनुष्यांस महाराजांच्या दर्शन व तीर्थ संयोगानें पाय येऊन ते आपल्या पायांनीं परत गेले. अशी सर्व प्रसिद्धि आहे. ) एका मागून एक गोसावीबैराग्यांचे अड्डे भवानीबोवांचा

मठासभोंवती लागून त्यांच्या बिदाग्या महाराजांकडून होऊन ते पहिले जात आहेत, तों दुसरे थडकून त्यांच्या धुन्या पेटूं लागल्या. महाराजांच्या दरबारीं आपापल्या गुणांच्या हजऱ्या देऊन अनेक गुणिजन कृतार्थ होत्साते संतोषानें आपल्या हेतुस्थळाचा मार्ग क्रमूं लागले. त्याप्रमाणेंच स्वकामना पूर्ण होऊन नाना याचकजन महाराजांचे गुण गात आनंदानें स्वस्थानीं परत जाऊं लागले.

अशा प्रकारें सुमारें चार महिने त्या ठिकाणीं महाराजांचें वास्तव्य असतां सर्व लोकांस संगमनेर हें केवळ सुखशांतीचें सदन, आनंदाचें भुवन, विश्रांतीचें मंदिर, धर्माचें गृह, औदार्याचें आगर, अद्वैताचें आलय आणि भक्तीचें उत्पत्तिस्थान असें होऊन गेलें. तेथील सर्व समारंभ सोहळा आणि उत्साह वर्णन करावा तितका थोडाच. मग महाराजांची स्वारी सटाण्यास परत जाण्याचीं हळुहळु चिन्हें उमटूं लागून पुढें त्या तयारीचा रंग लौकरच स्पष्ट दिसूं लागला. आपल्या वरील जीवनाचा ओघ परत मुरडून दुसरीकडे वळल्यामुळें संगमनेरकरांच्या मुखश्रीची टवटवी फिक्की पडून महाराजांच्या नक्की निघण्याची पक्की खातरी होऊन त्याप्रमाणें घडून येतांच सर्वत्र म्लानता व निस्तेजता प्राप्त झाली.

संगमनेर सोडून सटाण्याचा वाटचालींत मध्यंतरीं त्यांचा कांहीं दिवस येवलें येथें मुक्काम झाला. त्यांत असें घडून आलें कीं, कोंकणांतील मौजे मेढें तालुका अलिबाग जिल्हा कुलाबा येथील इनामदारीण गंगाभागीरथी ताईबाई शित्री यांनीं आपल्या गांवीं श्रीरामाचें नवें मंदिर बांघून त्यांत देवाची अर्चा यशवंतराय माहाराज या पुण्यपुरुषाच्या हातांनीं करावी, अशा उद्देशानें आगाऊ शोध ठेवून, आपले बंधू निळकंठराव आठवले यांसह त्या बाई, महाराजांस आपल्या मेढें गांवीं घेऊन जाण्यासाठीं

तावडतोब येवल्यास दाखल झाल्या. बाईंनीं महाराजांचें दर्शन घेऊन प्रार्थनापूर्वक आपला येण्याचा सर्व हेतु त्यांस कळविला. महाराजांनीं बाईचें सत्कृत्य आणि धर्मबुद्धि मनांत आणून त्यांस त्यांच्या मनोदयानुरूप तत्काल रुकार दिला. मग दुसरे दिवशीं बरोबरील बहुतेक मंडळीची सटाण्यास रवानगी करून देऊन अवश्य अशा दहा पंध्रा आश्रित व परिचारक जनांसह महाराज त्या बाई समागमें मनमाड स्टेशनावर येऊन रेल मार्गानें कोंकणांत चालते झाले.

( मौजे मेढें तालुका अलिबाग जि० कुलाबा )

यशवंतराय महाराजां सहवर्तमान ताईबाई आपल्या मेढें गांवीं परत दाखल होऊन अर्चेची सर्व सिद्धता झाली. गांवगांवचे विद्वान् शास्त्री वैदिकादि ब्राह्मणांस आणि कित्येक सद्गृहस्थांस पाचारण असल्याप्रमाणें ते सर्व येऊन अवंतरही पुष्कळ ब्राह्मण जमले. मग नेमल्या दिवशीं बाईच्या कृतसंकल्पानुरूप नव्या बांधिलेल्या राममंदिरीं महाराजांच्या हातांनीं देवाची अर्चा होऊन श्रीसीता, राम व लक्ष्मण या त्रिमूर्तीची मारूतीसह स्थापना झाली. अर्चा यथाविधि मोठ्या थाटाची होऊन तीन दिवस मोठें ब्राह्मण संतर्पण झाले. अशा प्रकारें सर्व संकल्पासिद्धि होऊन बाई कृतार्थ झाल्या. याचे नांव कर्तृत्व आणि धर्मबुद्धि ! ! ! नवऱ्याच्या मागें शुद्धाचरण वर्तनानें आपल्या उभय कुळांचा नांव लौकीक राखून स्वभर्तृ-संपादित द्रव्याचा व्यय देवकार्यी करून जिनें जगांत आपलें नांव चिरकाल राखिलें; आणि जिनें यशवंतराय महाराजांचे जगद्वंद्य पुण्यचरण आपल्या ग्रामभूमीस लावून, सर्व कोंकणपट्टीस त्यांचा महल्लाभ संनिध करून दिला; ती ताईबाई शिंत्री धन्य होय. असो. ताईबाईचे मनोरथ पूर्ण होऊन रोहे, अष्टमी, अलीबाग, वगैरे

मिळून त्या राहळांत एक महिना महाराजांचा वास घडून ते मुंबईस गेले. तेथें दीड दोन महिने राहणें होऊन महाराज परत येवल्यास दाखल झाले. जागो जागचे निरनिराळें हवा-पाणी व वाटेचे परिश्रम, यांहीं करून महाराजांची प्रकृति ज्वर वगैरे विकृतीनें बरीच बिघडली. त्यासमयीं महाराजांचें कुटुंब येवल्यास येऊन महिन्या तीन वारांनीं अंमळ बरेपणा झाल्यावर महाराजांस बरोबर घेऊन शके १७९६ च्या आश्विन कृष्णपक्षीं बाई परत सटाण्यास गेल्या. पुढें फाल्गुन अखेर पावेतों महाराजांस बाई आणि रावसाहेब प्रल्हाद कृष्ण शहाणे या उभयतांनीं कोठें बाहेर गांवीं न जाऊं देतां तेथेंच स्वस्थपणें राहविलें.

## ( संस्थान मुल्हेर तालुके बागलाण. )

बागलाण तालुक्यांतील प्रसिद्ध साधु संस्थान मुल्हेर येथील गादीचे अधिकारी हरिभक्तपरायण विष्णुदास पंडित यांनीं शके १७९७ च्या चैत्रमासी साधुसंतांनीं करण्यास उचित असा विष्णुयाग नांवाचा यज्ञ केला. शेंकडों कोसांवरील जागजागचे साधुवृंद, शास्त्रि वैदिकादि ब्रह्मसंमूह, शिष्ट महाजन मंडळी आणि अवंतर मिळून सुमारें ७।८ हजार लोकांचा मुल्हेरीस तळ पडला. या यज्ञसमारंभास अगत्याचें पाचारण करून प्रल्हाद कृष्ण मामलेदार यांचे मार्फत महाराजांस बोवा मुल्हेरीस घेऊन गेले. तो यज्ञसमारंभ १५ दिवस चालला होता. त्यांत महाराजांच्या दर्शनास लोकांची नित्य मोठी झुंड पडून त्यांस फार त्रास होऊं लागल्यामुळें रावसाहेब शहाणे यांनीं एका गर्द छायेच्या झाडाच्या ठेंगण्या आडव्या फांदीवर फळ्या बांधून खुर्चीसारखी प्रशस्त बैठक तयार केली. तिजवर सकाळ संध्याकाळ चार चार घटका महाराजांस बसवून खालून लोकांनीं दर्शन घ्यावें, अशी जरी योजना केली होती

तरी प्रत्येकाच्या स्वल्प हस्तस्पर्शानें महाराजांची पावलें गुरोळी-प्रमाणें फुगून तीं सूज मांड्यापर्यंत चढली. त्यासमयीं लोकांची गर्दी आणि सर्वांच्या संतोषार्थ महाराजांची सहनशीलता या दोन्हीही गोष्टींची पराकाष्ठा झाली! असो. यज्ञपरिसमाप्ति होऊन महाराज परत सटाण्यास गेले. यासमयीं सटाणें येथें बरेच महिने महाराजांचें राहणें होऊन त्यांच्या सेवेंत शहाणे मामलेदार तत्पर असत.

### येवलें व संस्थान विंचुर वगैरे.

पुढें रावसाहेब शहाणे मामलेदार यांची बदली पुन्हां येवल्यास झाल्यामुळें ते त्यांस आपल्याबरोबर घेऊन तेथें गेले. पुढें लवकरच शके १७९८ चा वैशाख मास प्राप्त होऊन श्रीमंत रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब विंचूर संस्थानचे चीफ यांच्या अगत्याच्या पाचारणावरून श्रीनृसिंहजयंत्युत्सवासाठीं महाराजांची स्वारी विंचुरास गेली. श्रीमंतांनीं स्वतः महाराजांची सर्वप्रकारें उत्तम व्यवस्था व बेतवात राखिला होता. मध आहे तेथें माशा आहेतच. ह्याप्रमाणें विंचूर येथेंही महाराजांच्या आंगणीं शेंकडो याचकांची नित्य मागणी होऊन हजारों दर्शनेच्छु लोकांची मस्तकें त्यांच्या चरणीं ठेंगणीं होऊं लागलीं. असो. तो जयंत्युत्सव आटोपून स्वारी लवकरच येवल्यास परत गेली. पुढें एक वर्ष पावेतों सुमारें सटाणें, मनमाड, विंचूर वगैरे ठिकाणीं जाऊन येऊन स्वारी येवल्यास असतां पर्जन्य काळांत अवर्षण पडून दुष्काळ पडल्यामुळें हजारों अन्नार्थी दीन लोक सटाण्यास नित्य लोटत असल्याची वार्ता पत्रद्वारें कळून येऊन ते परदुःखदुःखी महाराज त्यांच्या साह्यार्थ सटाण्यास निघून गेले.

### सटाणें ( दुष्काळ. )

शके १७९९ ह्मणजे सन १८७७ सालीं पर्जन्याचें अवर्षण

होऊन दक्षिणदेशीं किंबहुना सर्व हिंदुस्थानांत दुष्काळाचा मोठा गहजब उडाला, हें सर्वांस माहीत आहेच. क्षुधार्त होऊन घरदाराची आशा न धरतां अन्न अन्न करीत लोक देशभर भटकूं लागले. घरदाराचीच काय! परंतु पोटच्या लेकरांची सुद्धां ममता न राहतां ज्यास जिकडे वाट मिळे तिकडे ते उदरपूर्तिसाठीं धांव घेऊं लागले. भुकेनें व्याकुळ होऊन आई आई ह्मणून खावयास मागून मुलें धाई धाई रडत असतां त्यांची तीळराई इतकीही करुणा न येतां ठायीं ठायीं भीक मागून जें कांहीं थोडे मिळेल तें ती घाईघाईनें आपणच खाऊं लागली. अशा अहःकारप्रसंगीं हजारों अन्नार्थी लोक महाराजांच्या दारीं नित्य उभे राहून दीनस्वरानें अन्नयाचना करीत असतां त्या दयार्द्र पुरुषाची करुणा लोकांच्या दुःख हरणार्थ एकदम पुढें सरसावली. घरांतील सोनें नाणें व बायकोच्या अंगावरील दागिने खर्ची घालून, शिवाय अड्डे लावून तळ देऊन बसलेल्या गोसावी बैराग्यांपासून मोठमोठ्या रकमा कर्जाऊ घेऊन, त्या प्रत्येक क्षुधितास एक भाकर आणि ओगराळेंभर कालवण देण्याची महाराजांनीं सुरुवात करून, जागोजाग मोठमोठ्या ठिकाणीं विनंतिपत्रें पाठविलीं.

## अभंग.

॥ घातलें दुकान । देति आलियासी दान ॥
॥ संत उदार उदार । भरलें अनंत भांडार ॥
॥ मागत्याची पुरे । धणी आणिकासी उरे
॥ तुका ह्मणे पोतें । देवें भरिलें नोहे रितें ॥ १ ॥

सारांश महाराजांनीं पाठविलेलीं विनंतिपत्रें चोंहींकडे शिरसा वंद्य होऊन त्यांजकडून मनीआर्डरी, नोटा आणि हुंड्या या द्वारें द्रव्याचा बराच पुरवठा होत गेल्यामुळें महाराजांच्या त्या

धर्मकृत्यांत खळ ह्मणून कधींच पडला नाहीं. सर्वांस अन्न पोहों-चवून नंतर महाराजांनीं स्नानास उठावें. कधीं कधीं तर पुष्कळ लोक लोटत गेल्यामुळें रात्रीचे बारा वाजतांही महाराज अन्नास मिळत. अशा प्रकारें क्षुधितास अन्नदान नित्य होत असून शिवाय वस्त्रपात्र द्रव्यादि ज्यांस जें अगत्याचें पाहिजे असेल तें त्यांस देऊन संतोषवून वाटेस लावण्याचा क्रम चाल-लाच होता. असे बारा महिने लोटले मग पेस्तरसालीं वक्तशीर चांगली पर्जन्यवृष्टी होत गेल्यामुळें काळ उजाडून सुवत्ता झा-ल्यानें जिकडे तिकडे लोक कामास गुंतून अन्नास लागल्यामुळें सर्व भिकार मोडून महाराजांस जरा विश्रांति मिळाली.

## मनमाड.

पुढें पुणें व मुंबई प्रांतीं वर्ष सहा महिने महाराजांचें फिरणें होऊन "आतां इकडे तिकडे कोठें न जातां स्वस्थपणानें एके ठिकाणीं बसून, सर्वत्र लोकांस आपल्याकडे येण्याजाण्यास सुलभ पडावें," अशा विचारानें मध्यस्थित रेलवे स्टेशन मनमाड येथें येऊन महाराज आपल्या सर्व कुटुंबासमवेत श्रीविठ्ठल मंदिरांत वास्तव्यास राहिले. माळवा, नागपूर, वऱ्हाड, खानदेश, मों-गलाई, व दक्षिणप्रांतांतील हजारों यात्रेकरी तेथें नित्य कोसळून नानाइच्छा धारण करणारे अनेक याचकसमूह उसळूं लागले.

## संस्थान इंदूर.

श्रीमन्महाराज तुकोजीराव होळकर यांणीं, आपल्या इंदूर राजधानीस महाराजांस घेऊन येण्याकरितां आपले मेहुणे स-खाराम बापु गावडे यांस स्वार, शिपाई, हुजरे, खिजमतगार वगैरे तैनातीसह सन १८७६ पासून पाठविलें असून, ते महा-राजांबरोबर सारखे पांच वर्षें राहून, त्यांस इंदुरास घेऊन जा-

ण्याचा नानायत्न करीत होते, परंतु महाराजांस तो पारतंत्र्यवास न रुचून त्यांनीं कोणत्या तरी मिषानें आज उद्यां करून तेथें जाण्याचें टाळिलें होतें. पुढें खुद्द श्रीमंतांची स्वारी इंदुराहून सन १८८१ च्या आरंभीं श्री जेजुरीच्या यात्रेस येऊन स्वदेशीं स्पेशल गाडीनें परत जात असतां मनमाड स्टेशनास ठेपली, आणि त्यांणीं आगाऊ केलेल्या विनंतिसूचनेप्रमाणें तिकडून गांवांतून महाराजही श्रीमंतांचे भेटीस स्टेशनावर आले. परस्परांच्या गाडींतल्या गाडींत दर्शनभेटी होऊन आनंद झाला. मग "आह्मी महाराजांस घेऊन इंदुरास गेलों, मागाहून सर्व मंडळीस घेऊन जाऊं" असा निरोप गावांत घरीं बाईसाहेबांस पाठवून परभारें महाराजांस बरोबर घेऊन श्रीमंत इंदुरास चालते झाले. अशा रीतीनें महाराजांची स्वारी तिघां आश्रितांसह शके १८०२ च्या फाल्गुन शुक्लपक्षीं ह्मणजे तारिख १० मार्च १८८१ रोजीं इंदुरास दाखल झाली. मागून देव आणि देवपूजेचें सामान घेऊन महाराजांचा एक आश्रित ब्राह्मण दुसरे दिवशीं येऊन इंदुरास ठेपला, तोंपावेतो देवपूजा न झाल्यामुळें महाराजांस कडकडीत उपोषण घडलें. असो. मग श्रीमंतांनीं मनमाड येथें तावडतोब आपला खाजगी कारभारी पाठवून आश्रित परिचारकांसह महाराजांची सर्वमंडळी आणविली. होळकर सरकारांनीं आपल्या मुख्य राजवाड्यांतच महाराजांस रहाण्यास जागा दिली. महाराजांस सर्व खाजगी खर्चाकरितां चारशें रुपये शिवाय धर्मादाय खर्चासाठीं दीडशें रुपये आणि नित्य पन्नास पानांचा शिधासरंजाम मिळून एकंदर दरमहा १००० रुपयांची नेमणूक चालू केली. श्रीमंत सरकार श्रीमहाराजांच्या दर्शनास प्रतिदिवशीं येत असत. त्याचप्रमाणें श्रीमती सौभाग्यवती थोरल्या व धाकट्या राजपत्न्यांचा महाराजांच्या दर्शनाचा नित्य नेम असून त्यांत थोरल्या मा साहेब

सौभाग्यवती भागीरथीबाई यांची तर त्यांच्या चरणीं पराकाष्ठेची भक्ति जडली. मागें नुकत्याच गेलेल्या दुष्काळाच्या वेळीं अन्नदानार्थ गोसावी बैरागी वगैरे लोकांकडून कर्जाऊ घेतलेले पंधराहजार रुपये पर्यंतचें सर्व देणें श्रीमंतांनीं फेडून महाराजांस कर्जमुक्त केलें.

सरकारच्या दरबारचे कारभारी दिवाण सरदार अमीर उमराव मुत्सद्दी मानकरी-प्रभृति राजमंडळ, शास्त्री वैदिकादि मोठमोठी शिष्टमंडळी, थोर थोर संभावित व कुलीन गृहस्थ, मोठमोठे धनाढ्य शेटसावकार आणि व्यापारी उदमी वगैरे हरव्यवसाई, आदिकरून सर्व नगरनिवासी चतुर्वर्ण लोकांची महाराजांच्या दर्शनास नित्य सकाळ संध्याकाळ राजवाड्यांत एकसारखी थाप लागून वाड्या बाहेरील प्रशस्त रमणीय खुले पटांगण, रथ शिबिका म्याने घोडे या वहनांनीं दणाणून जावें. नागरिक स्त्रिया आपल्या प्रियांच्या आज्ञा ग्रहण करून पुत्रकन्यकांसहवर्तमान महाराजांच्या स्वस्तिकचरणीं आपलें मस्तक नम्र करून, त्या आनंदघन सुखदमूर्तीच्या दर्शनानें त्यांस संसार कचाटीच्या नानायातनांचा घटकाभर विसर पडून त्या विश्रम पावूं लागल्या. डोकीस मंदील किंवा चिंधी असो, परंतु राजवाड्यांत जाण्यास कोणास बंदी किंवा अटक ह्मणून राहिली नाहीं. मोठमोठे नजर नजराणे व नवस महाराजांच्या हुजूर हजर व्हावे, परंतु त्यांची त्याजवर अल्पही नजर न बसतां त्यांनीं ते तत्काल ज्यांचे त्यांस परत करून त्यांचा धर्म कृत्यांत व्यय करण्यास सांगावें. असें इकडे राजधानींत नित्य मंगल गाजत असतां महाराजांच्या लौकिक-सूर्याचा प्रकाश फांकून माळवा, ग्वाल्हेर, राजपुताना नेमाड इत्यादि इलाख्यांतील रंक राव इंदूर दूर असतांही महाराजांच्या दर्शनाची मोठी हाव धरून त्यांचे नांव गात धांव घेऊन येऊं लागले. महाराज

माळव्यांत गेले, तथापि त्यांस धुंडित याचकांच्या झुंडी त्यांच्यामागें नित्य खंडीभर असून तितक्यांसही तो महोदर वदान्य पुरुष विन्मुख ह्मणून कधीं झालाच नाहीं. अशाप्रकारें सर्व जल्लोषानें महाराजांचें वास्तव्य इंदूरराजधानींत पावणेतीन वर्षें घडलें.

श्रीमंत निजामसरकारची स्वारी सन १८८४ अखेर कलकत्त्यास व्हॉइसराय साहेब यांच्या मुलाखतीस प्रदर्शन निमित्तानें गेली असून समागमें नरेंद्रबहादूर पेषकार होते. त्यांस महाराजांच्या दर्शनाची परम लालसा उत्पन्न झाल्या वरून त्यांणीं स्वारी परतण्याच्या सुमारास महाराजांच्या नांवें प्रार्थनापूर्वक खलितापत्र लिहिलें कीं, महाराजांनीं कृपा करून खांडवे मुक्कामीं येऊन दर्शनाचा लाभ देऊन पुढें मनमाड पावेतों सहवास घडवावा. अशा त्या पत्रांसह श्रीमंत राजश्री रावसाहेब नरशिंगराव विंचूरकर यांस इंदूर येथें महाराजांकडे पाठविलें. महाराजांनीं तो मजकूर श्रीमती सौ० भागीरथीबाईसाहेब होळकर यांस श्रुत करून निघण्यास परवानगी मागितली. मातोश्रीसाहेबांचे महाराजांचे ठिकाणीं अप्रतिम प्रेम असल्यामुळें, हो ह्मणण्यास त्यांस फार कठिण वाटलें. परंतु रावसाहेब विंचूरकर यांणीं "महाराजांस मनमाड पावेतों घेऊन जाऊन परत आठ दहा दिवसांत इंदुरास घेऊन येऊं." अशी खातरी केल्यावरून मा साहेबांनीं मोठ्या कष्टेंकरून त्यांस जाण्यास परवानगी दिली.

## मनमाड, पुणें वगैरे.

तारीख ४ जानेवारी १८८४ रोजीं महाराजांनीं इंदूर सोडून खांडवे मुक्कामीं दाखल होऊन नरेंद्रबहादूर यांची भेट मोठ्या प्रेमगौरवानें घेतली आणि त्यांच्या द्वारें खुद्द निजामसर-

कारच्या मुलाखतीचा योग तत्काळ आणिला. महाराजांनीं त्याभेटींत खुद्द निजामसरकार, नरेंद्रबहादूर, विठ्ठलराव जमादार आणि सरसालरजंग दिवाण साहेब यांचे चिरंजीव या चौघांस योग्यतेनुरूप पोषाख देऊन, विडे, हार, गजरे, तुरे, अत्तर, गुलाब, यांहीं करून सर्वांस सत्कारून, आपल्या भेटीनें आनंद दिला. पुढें नरेंद्रबहादूर यांच्या हेत्वनुरूप त्यांसमागमें महाराज आपल्या दहापांच लोकांनिशीं मनमाड येथें जाऊन दाखल झाले.

नरेंद्रबहादूर यांची स्वारी मनमाडांहून पुढें मार्गस्थ झाल्यावर परत इंदुरास पारतंत्र्यवासामुळें जाण्याचें महाराजांचे मनांत येईना, व तसा लागलाच अनायासें योगही घडून आला.

पुणें येथील स्मालकॉज जज्ज मदनश्रीकृष्णजी यांचें कुटुंब बहुत दिवस अजारी पडून, त्यांची महाराजांचे ठिकाणीं पूर्ण निष्ठा असल्यामुळें त्यांनीं त्यांच्या दर्शनाचा निजध्यास धरून कंठीं प्राण ठेविला. त्यावरून रावबहादूर हे महाराजांस इंदुराहून घेऊन येण्यासाठीं स्वतः निघून मनमाडास येत आहेत, तों महाराज तेथेंच असल्याची आनंददायक खबर त्यांस समजली. मग तसेच गांवांत जाऊन महाराजांची भेट घेऊन त्यांसह ते उलट गाडीनें तावडतोब निघून पुण्यास गेले.

आजच महाराज येतील, अशी बाईच्या ध्यानींमनीं कल्पना नसतां तीच भवतारक पुण्यमूर्ती पतिसह बिछान्याजवळ उभी ठाकलेली अकस्मात डोळ्यांनीं पाहतांच ती आनंदानें सद्गदीत झाली ! प्रेमाचे उद्गार उचंबळून नेत्रांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या. सर्व अंगस्फुरण पावून त्यासरशी, आंगांत शक्ति नसतांही उठून बसली आणि महाराजांचे पाय घट्ट धरून त्यांजवर झोंके खात डोकें टेकून ह्मणाली, आज माझ्या जन्माची खरी सार्थकता होऊन मी सर्वपरी कृतार्थ झाल्यें. सर्व

ऐश्वर्यसुखांत पतिपुत्र संन्निध असतां आपणां सद्गुरूंच्या अलभ्य चरणदर्शनाचा लाभ घडून मला मरण येत आहे, याहून आणखीं काय पाहिजे ! ! आतां माझी कोणतीही आशा उरली नाहीं. असें बोलून पुन्हां बाई आंथरुणावर पडून राहिली. मग महाराजांनीं बाईच्या आंगावरून हात फिरवून ह्मटलें, बाई, भल्यांचें देव असेंच चांगलें करीत असतो. स्वस्थ मनानें त्याचें स्मरण ठेवा ह्मणजे झालें. पुढें थोडक्याच दिवसांनीं बाईनें राम ह्मणून देह ठेविला.

पुणें येथें त्याच संधीस श्री त्र्यंबकेश्वरचे कारभारी श्रीमंत रा० रा० नारायणराव काशिनाथ ऊर्फ तात्या साहेब जोगळेकर आणि नाशीक येथील रा० रा० वामन भाऊ वाड आदिकरून कांहीं मंडळी सहज कांहीं कामाकरितां आलेली असून, त्यांनीं महाराजांच्या दर्शनभेटींत नाशिक त्र्यंबकास येण्याविषयीं विनंति करून त्यांस ते नाशिकास घेऊन गेले. वाड मजकूर यांचे घरीं महाराजांचें उतरणें होऊन पांच सात दिवस मुक्काम झाला. त्यांत नाशिकची यथाविधी तीर्थयात्रा करून सर्व जनस्थानवासी जनांस आपल्या धूळदर्शन भेटीचा लाभ देऊन महाराज तात्या साहेब जोगळेकर यांसमागमें श्रीक्षेत्र त्र्यंबक येथें गेले.

## क्षेत्र त्र्यंबक.

“ कर्मणो गहणोगतिः ” कर्मानें देवादिकांसही पीडावयास सोडिलें नाहीं, मग मनुष्याचा पाड तो किती ! श्रीत्र्यंबकची सर्व तीर्थयात्रा यथास्थितपणें करून महाराज जोगळेकर यांचे वाड्यांत वास्तव्यास होते. नित्यनियमाप्रमाणें एके दिवशीं रात्रीं माडीवर देवपूजा होऊन, श्रीदेवास विष्णुसहस्रनाम एकादशपाठाच्या प्रदक्षिणा मंडळीसह घालीत असतां, मध्यंतरीं भिंत ह्मणून महाराज पाठ टेंकावयास गेले, तों ती भिंत नसून

दारें लोटून घेतलेली चौकाच्या तोंडावरील एक खिडकी होती. तीस त्यांनीं पाठ टेकिल्याबरोबर जोरानें फळ्या उघडून बाहेर झोल जाऊन ते चौकांत पडले. एका क्षणांत ही गोष्ट घडल्यामुळें त्यांस सांवरून धरण्यास कोणास अवकाश न सांपडून एकच ओरड होऊन सर्व लोक घाबरेपणानें माडीवरून खाली चौकांत गेले. काळ आला होता परंतु वेळ आली नव्हती, हीच गोष्ट खरी. कंबरेवर सोबकून त्या आघातानें महाराजांस निचेष्टता प्राप्त झाली. मग जोगळेंकरांनी घरगुती शेकशेगडी वगैरे उपाय सुरू करून तत्काल बिवलकरादि प्रसिद्ध वैद्यांस तावडतोब घेऊन येण्यास नाशिकास रातोरात गाड्या पिटविल्या. आणि इंदुराहून मंडळीसह बाईसाहेबांनीं त्वरित निघून येण्याविषयीं त्यांस नाशिकाहून तार पाठविण्याची योजना केली. इकडे चार घटिकांनीं महाराज चांगलें शुद्धीवर आले परंतु कंबर ठेंचल्यामुळें त्यांस इकडे तिकडे हालवेना. दुसरे दिवशीं दुपारपर्यंत नाशिकाहून वैद्य ठेपून त्यांचे उपचार सुरू झाले. इंदुराहून लवकरच मंडळीसह बाईसाहेब येऊन दाखल झाल्या. अशाप्रकारें जोगळेकरांच्या खबरदारीच्या देखरेखीनें सर्व व्यवस्था नीट नेटकी लागून ईश्वरकृपेनें महाराजांच्या प्रकृतीस दिवसानुदिवस आराम पडत चालला. सुमारें महिन्या दीड महिन्यांत पुष्कळ बरेपणा होऊन दुसऱ्याच्या आश्रयानें घरांतल्या घरांत हिंडूं फिरूं लागलें, परंतु अखेरकमरेंत ढिलेपणाची कसर आणि जिव्हेस वातविकृतीनें भाषणांत शब्दाचा विसर एवढें कायम राहून बाकी सर्व विकृती मोडून प्रकृती बरी झाली. मग महाराजांनीं विचार केला कीं आतां कोठें इकडे तिकडे न हालतां स्वस्थ एके ठिकाणीं श्रीगंगारघुवीर चरणीं जनस्थानीं राहून परमेश्वर निभवील त्याप्रकारें आपल्या आयुष्याची काळक्रमणा करावी. नंतर श्रीत्र्यंबक-

राजांचें दर्शन, क्षेत्रस्थविप्रांचा आशीर्वाद आणि जोगळेकरांचा निरोप घेऊन शके १८०६ चे चैत्रमासीं महाराज नाशिकास जाऊन राहिले.

[stamp]

---

# प्रकरण चवथें.

## श्लोक.

( शार्दुल विक्रीडित. )

यन्निष्ठा परमेश्वरींच असुनी, लोकोपकाराकडे
जो अर्पी धन देह चित्त, पडतां कांहीं तया सांकडें,
त्याचें संकट तें निवारुनि हरि स्वांगें, तया सौख्य दे.
तत्सत्कीर्तिहि वाढवूनि करवी वंद्यें जगा तत्पदें ॥ १ ॥

महाराजांच्या अस्तित्वांत जागोजागीं घडलेल्या
विशेष गोष्टी.

## एरंडोल.

महाराज हे एरंडोलास मामलेदार असतां, कोणे एके दिवशीं माध्यान्हकालाचे सुमारास, एक पादचारी क्षुधित पांथस्थ ब्राह्मण आपल्या स्त्रीसहवर्तमान त्यांच्या घरीं प्राप्त झाला. उभ-

यतां स्त्रीपुरुषांस पाहून महाराजांनीं परमानंदानें त्यांस आपलें बिऱ्हाड ओटीवर लावण्यास सांगून " घरांत भोजनाची सिद्धता आहे, लौकर स्नान करावें. " ह्मणून कळविलें. तिकडे नियमाप्रमाणें पाणक्यानें स्नानाचे जागीं पाणी उपसून हाक मारतांच, त्या ब्राह्मणानें स्नान करून धावळी नेसून संध्याविधि थोडक्यांत उरकिला, तों महाराजांनीं त्यास पात्रावर नेऊन बसविलें. त्याप्रमाणेंच त्या विप्रस्त्रीनें आंग धुऊन, जवळ कांहीं मुकटा वगैरे सोंळें अथवा वाळवून नेसण्यासारखें दुसरें लुगडें नसल्यामुळें, ती तें आंगावरचेंच लुगडें वर खालीं करून पिळून नेसून, तशीच ओलीती पानावर येऊन बसली. हें महाराजांनीं पाहून तीस नेसावयास देण्यासाठीं घरांत जाऊन पहातात, तों मुकटे वगैरे सर्व सोंवळीं बायकांकडे अडलेलीं असल्याचें त्यांच्या नजरेस आलें. तेव्हां त्या परदुःख दुःखी पुरुषानें तत्काळ गुपचुप घरांतील बस्ता सोडून त्यांत असलेला बायकोचा जरिकांठी पीतांबर काढून त्या ब्राह्मणस्त्रीस हळूच हाक मारून, " बाई हा नेसा, ओलेत्या बसूं नका. " असें ह्मणून तो त्या बाईच्या हातीं दिला. मग भोजनोत्तर घडी करून तो पीतांबर ती स्त्री महाराजापाशीं नेऊन देत असतां तीस महाराज ह्मणाले कीं, " मातुश्री, तुह्मांस सोवळें नाहीं, ह्मणून मीं हा तुह्मांस दिला; तरी याचा उपयोग करीत जावा. " असें बोलून, शिवाय तीस दुसरें एक लुगडें व त्या ब्राह्मणास दहा रुपये दक्षिणा देऊन त्या उभयतांची रवानगी करून देत असतां, तीं दोघें मोठा आनंद पावून दुसरें दिवशीं महाराजांस आशीर्वाद देत देत मार्गस्थ झालीं. काय हें औदार्य ! ! आणि काय ही दया ! ! ! " परदुःखेन दुःखिता विरला " असें जें सुभाषितकाराचें प्रसिद्ध वचन आहे, तोच हा एक विरला पुरुष होय. मग त्याच्या धन्यतेचा डंका सर्वत्र वाजेल यांत आश्चर्य काय !

## अमळनेर.

रावसाहेब यशवंतराय महादेव खानदेशांतील अमळनेर तालुक्यास सुमारें तीन चार वर्षें मामलेदार असतां, त्यांच्या दातृत्वकीर्तीचा डंका वारंवार कानीं येत गेल्यामुळें सन् १८६३ सालीं त्यांच्या द्वेष करणाऱ्या कित्येक वरिष्ट अधिकाऱ्यांस त्यांजविषयीं मत्सर भाव उत्पन्न होऊन, त्यांनीं त्या सत्पुरुषाची छलना करून त्यास विपत्तींत पाडिलें. तथापि तो सत्वधीर पुरुष बिलकुल न डगमगतां, त्याच्या पूर्ण ईश्वरीनिष्ठेनें व सत्याचरणानें, त्याजवर कोसळून आलेलें सर्व काहूर ईश्वर-प्रेरित झंझ्यावाताच्या योगानें वितळून जाऊन, महाराज हे पूर्व सौख्यस्थितीस प्राप्त झाले. ह्याविषयींचा सविस्तर उल्लेख या खालीं करीत आहें.

" देवभक्तींत, आल्या गेल्या ब्राह्मण वगैरे याचकसमुदायास दान धर्म करण्याचे कामीं व त्यांच्या तरतुदीच्या खटपटींत, मामलेदार यांचा सारा वेळ मोडत असल्यामुळें, व तसाच सर्व लोकांवर दया करण्याचा ह्यांचा स्वभाव असल्यामुळें, यांस सरकारी काम करण्यास पाहिजे तसा वेळ न सांपडून, महत्वाचीं कामें दिरिंगाईवर तुंबून राहून लोकांस वक्तशीर न्याय मिळत नाहीं. शिवाय त्यांस तालुक्यांत कायद्याविरुद्ध लोकांचें कर्जही पुष्कळ झालें आहे." इत्यादि अनेक प्रकारचे गिल्हे थेट जिल्ह्याजे मुख्य अधिकाऱ्यांचे कानांपर्यंत पोंचविल्यामुळें, त्यांजवरील कर्जाची चौकशी सुरू झाली. त्या चौकशींत पेठ पारोळें येथील सावकारलोकांनीं "आह्मीं मामलेदार यांस कर्जाऊ पैसा केवळ आमच्या खुषीनें दिला असून त्याचा व्यय मामलेदार यांजकडून धर्मकृत्याकडे झाला असल्यामुळें, आमचा तो पैसा त्यांजकडून परत होई पर्यंत तो आमचाच धर्म झाला,

असें आह्मी समजतों. कदाचित् पुढें तो पैसा आमचा आह्मांस त्यांजकडून परत आला तर मग तो धर्म त्यांचा झाला असें आह्मीं समजूं" असे स्पष्ट जबाब दिल्यावरून तें काम तर फिकें पडलें. परंतु अशाच कित्येक क्षुल्लक गोष्टींवरून रावसाहेब यांस निष्कारण अतीशय त्रास झाल्यामुळें, त्यांचे मनास परम उद्वेग प्राप्त होऊन, त्यासमयीं त्यास आपल्या सरकारी नोकरीचा एकदम राजीनामा देणें भाग पडलें. परंतु हा राजिनामा व्यर्थ दिल्याबद्दल वगैरेची सूचना कित्येक सद्गृहस्थांकडून त्यांस तत्काळ मिळाल्या वरून, त्यांनीं मे० एलिस सा० ब० रेव्हिन्युकमीशनर उत्तर प्रांत यांचे हुजूर एक इंग्रजी अर्ज लागलींच रवाना केला. त्यांतील आशय कीं, माझे मनास तशीच कांहीं उद्विग्नता प्राप्त झाल्यामुळें मी इकडे जिल्ह्यास राजीनामा देऊन चुकलों, परंतु आपण प्रापंचिक, तेव्हां आपल्या हातून ही गोष्ट बरोबर घडली नाहीं; असें मागाहून विचारांतीं ध्यानांत येऊन खेद वाटत आहे. आतां जिल्ह्याकडून सदरहू राजीनाम्याचें प्रकरण आपलेकडे येईलच, परंतु या संबंधानें हुजुरास माझी खरी स्थिति जाहीर करण्यास मी समक्ष लौकरच निघून येण्याचें करीत आहें, करितां तेथपर्यंत माझा राजीनामा मंजूर न होण्याविषयीं ही माझी विनंति आहे. व तशाच आशयाचें एक खासगी पत्र मे० म्यान्सफील्ड साहेब ब० सिंधचे कमीशनर यांजकडे पाठविलें.

रावसाहेब यशवंतराव महादेव यांजवर असा दुर्धर प्रसंग गुदरून ते पुनः आपली नोकरी मिळविण्याच्या खटपटीस लौकरच जाणार, अशी वार्ता तालुक्यांत तत्काल पसरतांच सर्वांस फार वाईट वाटून जागोजागचे संभावित लोक त्यांचे भेटीस आले, त्यांत पारोळकर मंडळीही आली होती. "आपल्या मागें आपल्या सर्व कुटुंबाची व आपल्या चालत आलेल्या नि-

त्यक्रमाची सर्वप्रकारें बेबुदी राखूं; आपण कोणतीही फिकीर ठेवूं नये; यश मिळून पुन्हां आपण आपल्या कामावर लवकरच दाखल व्हाल असें देव करील. " इत्यादि पारोळकरांचें मोठें उभारणीचें आश्वासनवचन ऐकून रावसाहेब यांनीं तीच आपल्या कार्यसिद्धीची शकुनगांठ बांधिली. मग एक दोन दिवसांत निघण्याची सर्व तयारी झाल्यावर तीर्थरूप मातुश्रीसह ब्राह्मणांचे आशीर्वाद आणि सर्व मंडळींचा निरोप घेऊन श्रीनरहरि-स्मरणानें तारीख १७ माहे आकटंबर सन् १८६२ ईसवी रोजीं सुमुहूर्तावर रावसाहेब रेव्हिन्यूच्या स्वारींत जाण्यास निघाले. बरोबर दोघे धाकटे बंधु, एक ब्राह्मण व काळू नांवाचा शिपाई असे चौघेजण घेतले. मग लवकरच चाळिसगांवास पोंचून पुढें रेल-मार्गानें मुंबईस दाखल झाले. तेथें गोविंद हरि ऊर्फ गोविंद आप्पा वाळवेकर या नांवाचे प्रसिद्ध लिंगाईत व्यापारी रहात असत, त्यांचे घरीं रावसाहेब हे एका ओघीच्या पत्रावरून उतरावयास गेले. तेही रावसाहेबांची कीर्ति बहुत दिवस ऐकत असून, त्यांस त्या समयीं त्यांच्या मित्राकडून रावसाहेब आपले घरीं उतरावयास येणार, वगैरे बद्दल अगाऊ सूचना-पत्र आलेलेंच होतें, त्यावरून ते त्यांच्या येण्याची मार्गप्रतीक्षा करीत होते. इतक्यांत आप्पांस रावसाहेब आल्याचें वर्तमान समजतांच ते झटकन उठून मोठ्या आनंदानें सामोरे गेले. मग परस्पर प्रेमालिंगन होऊन वाळवेकरांनीं रावसाहेबांचा हात धरून त्यांस मोठ्या आदबीनें दिवाणखान्यांतील सिद्ध असलेल्या बिछायतीवर नेऊन उभयतां बंधूंसह बसविलें. घरांत अगोदर सर्व व्यवस्था लावून ठेविलीच होती, त्याप्रमाणें भोजनाची सर्व सिद्धता होत आहे, तों रावसाहेबांची स्नानसंध्या पूजा आटोपून भोजन झालें.

मुंबईत रावसाहेबांचा तीन दिवस मुक्काम झाल्यांत गोविंद

आप्पांस रावसाहेबांची सर्व स्थिति व येण्याचें कारण कळून येऊन फार वाईट वाटलें. आणि ह्मणाले, समयीं पैशाची कांहीं जरूर पडल्यास पत्रानें आज्ञा व्हावी, मी सेवेस तयार आहें. रावसाहेबांनींही त्यांचे मोठे आभार मानून, त्यांजपाशीं उभयतां बंधूंस ठेवून, आपल्या दोघां नौकरांसह रेव्हिन्यूच्या स्वारींत घोघो बंदरीं जाण्यास जहाजावर पाय ठेविला. त्या जलपर्यटनांत मध्यंतरीं जरी मोठें तुफान होऊन समुद्र एकदोन दिवस खवळला होता, तरी ईश्वरकृपेनें त्या सर्व अरिष्टांतून निभाऊन रावसाहेब हे आपल्या नौकरांसह सातवे दिवशीं अस्तमानाचे सुमारास घोघो बंदरास सुखरूप जाऊन पोहोंचले.

या समयीं रा० ब० शंभूप्रसाद भाई हे रेव्हिन्यूचे दप्तरदार होते. भाईसाहेब हे मोठे थोर, कुलीन व परोपकारी गृहस्थ होते. त्यांनीं रावसाहेब आल्याचें पाहून तत्क्षणीं आनंदानें पुढें सरून त्यांची मोठ्या प्रेमगौरवानें भेट घेऊन आपल्या गादीवर नेऊन बसविलें. व आपल्या नजीकच्या एका सोईच्या घरांत त्यांस उतरावयास जागा देऊन घोघोचे मामलेदार यांजकडून तत्काळ त्यांची सर्व व्यवस्था लाऊन दिली. मग रावसाहेबांची स्नानसंध्या पुजा आटोपून भोजन झाल्यावर त्या रात्रीं निवांत वेळीं चार घटका परस्परांच्या गोष्टी होऊन रावसाहेबांस निजावयास सांगून भाईसाहेब आपले बिऱ्हाडीं निजावयास गेले.

दुसरे दिवशीं कचेरीच्या वेळीं तंबूवर रावसाहेब जाऊन त्यांनीं आपण भेटीस आल्याची वर्दी साहेबांस देवविली. त्यासरसेंच साहेब बहादुरांनीं त्यांस आंत घेऊन येण्या विषयीं जमादार यांस फर्माऊन आपणही उठून तंबूच्या दारापर्यंत गेले, तोंच रावसाहेब जवळ दाखल होऊन त्यांनीं साहेब बहादुरांस

सलाम केला. तो घेऊन त्यांस आंत नेऊन आपल्या नजीकच त्यांस बसावयास खुर्ची देऊन साहेब बसले. मग साहेबांनीं रावसाहेबांस प्रथम कुशल–प्रश्न विचारून " तुह्मांस एकदम राजीनामा देण्यासारखी कोणाकडून कोणती तसदी पोंचून तुमचे मनास इतका त्रास उत्पन्न झाला ? " अशी विचारणी करितांच त्या सत्वधीर पुरुषानें कोणाचें कांहीं वैगुण्य व दोष बिलकूल न दाखवितां " केवळ या कामाचा दोषी सर्व माझा मीच आहें. मला असलेलें कर्ज चार महिन्यांत फेडण्याविषयीं जिल्ह्याचा हुकूम झाला असतां मजकडून तसें घडलें नाहीं. यास्तव माझ्या कर्जाची तपासणी होऊन चौकशी झाली; यामुळें मनास फार वाईट वाटून उतावळीनें मी राजीनामा दिला. त्या अविचाराचें हें फळ मी भोगीत आहें. परंतु ह्या प्राप्तझालेल्या अनिष्ट दशेंतून मुक्त होण्यासाठीं ईश्वरी प्रेरणेनें या पायांजवळ मी आलों आहें. " रावसाहेब यशवंतराव महादेव यांच्या स्वभाव, गुण, रीति, स्थिति, वर्तनादिकांची माहिती भाईसाहेब दप्तरदार यांस बरीच असून, त्यांच्या द्वारें ती मे० एलिस साहेब ब० यांस कळली होती. शिवाय मे० म्यान्स्फील्ड साहेब ब० यांजकडून कराचीहून रावसाहेबांच्या सज्जनत्वाच्या प्रशंसेचें डेमि पत्र नुकतेंच आलेलें होतें, त्यावरून त्यांच्या सर्व चांगुलपणाविषयीं या साहेबांची पूर्वीच खात्री झाली होती; तशांत त्या सुपुरुषाच्या प्रस्तुतच्या प्रत्यक्ष भेटिभाषणांत त्यांची आनंदवृत्ति, शांति, गांभीर्य, भाषणप्रौढि, नम्रता, निरभिमान व परनिंदापहार हे गुण स्पष्ट निदर्शनास येऊन, रावसाहेबांविषयीं साहेबांची तत्काल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. आणि कोणातरी द्वेषी, हेवेखोर मनुष्याच्या प्रादुर्भावानें या पुरुषास ही आपत्ति प्राप्त झाली आहे, असा साहेबांचा निग्रह होऊन त्यांस रावसाहेबांच्या कल्याणाची लागलीच इच्छा प्राप्त झाली.

हा काल पावेतों राजीनाम्यासंबंधानें जिल्ह्याकडून कांहीं लिहून आलें नव्हतें, ह्मणून रेव्हिन्यू साहेबांनीं रावसाहेबांचा एक अर्ज घेऊन त्या लगत जिल्ह्यास अशी विचारणा केली कीं, रावसाहेब यशवंतराव महादेव यांस त्यांच्या जागीं पुनः तुह्मी नेमूं शकाल किंवा नाहीं? त्यावरून त्या लगत जिल्ह्याचा जबाब असा आला की, रावसाहेब ह्यांनीं आपण होऊन राजीनामा खुषीनें दिला, तेव्हां त्या बाबतींत जास्त विचाराची जरूर न राहून आह्मीं त्यांची जागा शाहाद्याचे मामलेदारास बढतीनें देऊन भरली, यामुळें आतां आमचा तसें करण्यास नाइलाज आहे. नंतर साहेबांनीं त्या प्रकरणालगत पुन्हां जिल्ह्यास लिहिलें कीं, तुमच्या मनाचा जो विचार झाला आहे तेणें करून रावसाहेबांच्या आजवर मिळविलेल्या निष्कलंक लौकिकाची व्यर्थ हानि होत आहे, हें ध्यानीं आणून त्यांस त्यांची मूळची जागा द्यावी, असा आमचा पूर्ण उद्देश आहे. प्रामाणिकपणा, निर्लोभता, निरभिमान, इत्यादि अनेक अद्वितीय गुणांवरून ज्या पुरुषास मोठ मोठे साहेब—लोक सन्मान देऊन चहातात, त्याजविषयीं तुमची इतकी निष्ठुरता नसावी; असें आह्मांस वाटतें. इतक्यावर तुम्हीं त्यांस मूळची मामलेदारीची जागा देत नसल्यास, इकडून त्यांस शाहाद्याची रिकामी असलेली जागा देण्यांत आली आहे. मग साहेब ब० यांनीं रावसाहेबांस, “तुम्हांस तुमची जागा देण्याविषयीं इकडून प्रकरण जिल्ह्यास गेलें आहे, तरी तुह्मी आतां खानदेशांत परत जाऊन कलेक्टरांस भेटून आपलें काम मागावें, ह्मणजे त्यांजकडून तुम्हांस हुकूम मिळेल.” असें सांगून जाण्याविषयीं निरोप दिला. हा हुकूम झाल्यावेळीं रेव्हिन्यू साहेबांची स्वारी गुजराथ प्रांतीं असून तेथून नजीकच डाकूर क्षेत्र होतें. रावसाहेब प्रथम तेथें जाऊन तेथील डाकूरनाथजी-

ची दर्शनयात्रा करून तसेंच पुढें अमदाबाद मार्गें लौकरच मुंबईस दाखल झाले.

कार्यसिद्धि होऊन सुमारें अडीच तीन महिन्यांनीं रावसाहेब रेविन्यूच्या स्वारींतून सुखरूप परत आल्याचे समजून उभयतां बंधूंसह गोविंद आप्पांस मोठा आनंद जाहला. मुंबईंत दोन दिवस मुक्काम झाल्यांत रावसाहेब आपल्या फिरस्तींतील कच्ची हकीकत गोविंद आप्पास कळवीत असतां तींत ओघानें आपल्या कर्जाची गोष्ट आणून म्हणाले कीं, आतां मात्र कदाचित् मला पैशाची गरज लागेल असें वाटतें. परंतु ती फिकीर पूर्वींच्या आपल्या वचनावरून मला मुळींच वाटत नाहीं. तेव्हां गोविंदआप्पानीं "मी अर्ध्यारात्री आपल्या आज्ञेंत हजर आहे." अशी द्विरुक्ति दिली. मग तिसरे दिवशीं मुंबई सोडून खानदेशकलेक्टरची स्वारी भुसावळेस होती, तेथें रेलवेनें बंधु वगैरेसह रावसाहेब जाऊन पोहोंचले.

दुसरे दिवशीं रावसाहेबांनीं मे० कलेकटर साहेब ब० यांची भेट घेतली. रेव्हिन्यूसाहेबांच्या हुकुमाप्रमाणें रावसाहेब यशवंतराव महादेव यांस त्यांची मूळची अमळनेरची जागा द्यावी, असें कलेकटराचे मनात येऊन त्यांनीं "तुह्मीं कर्जमुक्त झाल्याची आमची खातरी करून द्या, ह्मणजे लागलीच तुम्हांस कामीं दाखल होण्याचा हुकूम देऊं." असें फर्माविलें. मग अवधि न करितां काळू शिपायासह त्याच रात्रीं मेलगाडीनें निघून मुंबईस गोविंद आप्पाकडे जाऊन त्यांस रावसाहेबांनीं झालेली हकीकत कळविली. मग रावसाहेबांची स्नानसंध्या पूजा होऊन एकादशी निर्शनाचा फराळ होत आहे, तों चार घटका रात्र झाली. त्यावर रात्रौ निवांत वेळीं गोविंद आप्पांनीं, आपला पातीदार गंगाराम बलदेव शेट दुकान भडगांव जिल्हा खानदेश, हल्लीं यात्रे निमित्त मुकाम माहिजी, यास पत्र लिहून

तें रावसाहेबांचे स्वाधीन केलें, आणि कळविलें कीं, या पत्रावरहुकूम पांच हजार रुपये शेट मजकूर अपल्यास पत्र दर्शनीं देतील. नंतर थोडी निद्रा होऊन, पहाटेस साधनद्वादशीची तयारी झाल्या प्रमाणें भोजनोत्तर गोविंद आप्पांनीं रावसाहेबांची माहिजीस रवानगी करून दिली.

इकडून रावसाहेब माहिजीस दाखल झाले. व तिकडून भुसावळेहून त्यांचे उभयतां बंधू, ब्राम्हणासह येथें येऊन त्यांस मिळाले. माहिजीस बलदेवशेटजीनीं रावसाहेबांचा चांगला आदर-सन्मान ठेवून, गोविंदआप्पांच्या पत्रावरहुकूम पैशाची सर्व रक्कम तत्काल त्यांचे पदरीं घातली. मग तेथून सर्व मंडळीसह रावसाहेब अमळनेरास दाखल होऊन त्यांनीं तीर्थरूप मातुश्रींच्या चरणीं मस्तक ठेविला. आपल्या मागें अमळनेरकर व पारोळकर मंडळींनीं घरची सर्व उत्तम व्यवस्था ठेविली, याबद्दल रावसाहेबांस परम संतोष वाटून त्यांनीं सर्वांचे फार आभार मानले.

पुढें पंधरा तीन वारांत रावसाहेबांनीं आपल्या कर्जाची फेड करून, सावकारांच्या पावत्यांसह मे० कलेकटर साहेबांचे स्वारींत जाऊन, भेटींत कर्जमुक्त झाल्याच्या पावत्या साहेबांपुढें हजर केल्या. परंतु " कालचक्र जोंपर्यंत वक्र आहे, तोंपर्यंत अमृतपान करणारा शक्रही कित्येक गोते खाऊन, त्यास तक्रही दुर्लभ होतें, हें मुक्रर आहे " या वचनाचा अनुभव यासमयीं रावसाहेबांस पुरा दिसून आला. " तुम्हीं कर्जमुक्त होऊन आलां, म्हणजे लागलीच तुम्हांस अमळनेरच्या मामलेदारीचा हुकूम मिळेल " असें निर्मळमनानें, मे० कलेकटर साहेबांनीं रावसाहेबांस दिलेलें पूर्वीचें वचन वाचकांस आठवत असेलच. परंतु ते कलेकटर साहेबांचें असलेलें शुद्ध मन, कोणा कलिपुरुषरूपी काकशद्धस्पर्शानें विटाळलें गेल्यामुळें, त्या पवित्र पुरुषा-

च्या कार्यांत व्यत्यय येऊन तसाच तत्क्षणीं प्रत्ययही आला. " एकाचें कर्ज काढून दुसऱ्याचें फेडिलें, तेव्हां ऋणमुक्तता झाली, असें म्हणतां येत नाहीं. " असा कलिपुरुषांनीं साहेबांचे मनांत विकल्प भरवून दिल्यामुळें साहेबांनीं ती गोष्ट विचारावर ठेऊन, " तुम्हांस काय तो मागाहून हुकूम मिळेल " असें तोंडीं कळवून रावसाहेबांस निरोप दिला.

आपले विषयीं साहेबांचें मन पुनः अमुक कारणानें फिरलें, असें जरी रावसाहेबांस पूर्णपणें समजून आलें, तथापि त्याविषयीं बिलकुल खेद किंवा हळहळ न करितां ते परत अमळनेरास येऊन आपल्या नित्यक्रमांत आनंदानें स्वस्थ राहिले. अशी कांहीं दिवस वाट पाहून आतां हुकूम येण्याची आशा बाळगणें व्यर्थ आहे, असें जाणून आपले वाली जे मे० एलिस साहेब ब० रेव्हिन्यू कमिशनर यांची स्वारी यावेळीं विगतपुरीस असल्याचें समजून त्यांच्या भेटीस ते ताबडतोब निघोन गेले.

रेव्हिन्यू साहेबांची भेट होऊन पुढें त्यांच्या स्वारी बरोबरच रावसाहेब कोंकणप्रदेशीं माथेरानास गेले. अशा विपरीत प्रसंगीं रावसाहेबांवर एलिस साहेबांची पूर्ण कृपादृष्टि राहून, त्यांस ते तुष्टि देण्यासाठीं नित्य कांहीं गोष्टी, चमत्कार बोलून वारंवार ह्मणत कीं, " रावसाहेब तुह्मी बिलकूल कष्टि होऊं नका." साहेबांच्या या खऱ्या कळवळ्याच्या भाषणानें व रा० ब० भाईसाहेब दप्तरदार यांच्या सुखसहवासानें, रावसाहेबांस त्या प्रवासांत गृहनिवासाचा भास होऊं लागला. पुढें एके दिवशीं साहेबांनीं रावसाहेबांस कळविलें कीं, पर्जन्य-काळ नजीक ठेपल्यामुळें आतां आमची कचेरी पुणें एथें एक दोन दिवसांत जाणार, तेव्हां तुह्मी मंडळीबरोबरच तेथें जावें, आह्मी मागाहून लवकरच येतों. त्याप्रमाणें रावसाहेब हे पुण्यास निघून गेले.

अशा वेळीं दुर्दैवाचा तेढा झालेला वेढा सुटून मोकळा झाला. मग त्या ईश्वरएकनिष्ठ पुरुषाची अनिष्ट दशा अवशिष्ट कोठून राहील? अनुकूळ काळ, विषासही अमृत करील; दगडही समुद्रांत तरवील; दिवस असतांही सूर्यास लपवून अंधःकार पाडील; रेड्याकडूनही वेद बोलवील; सारांश कधींच न घडणारें तें कार्य सिद्ध करून देण्यास अनुकूळ काळ समर्थ असल्याची साक्ष वेद पुराणें देत आहेत. त्याप्रमाणेंच रावसाहेब यशवंतराव महादेवांच्या मनोदयानुरूप कार्यसिद्धीचा योग चोहोंकडून या समयीं जमून आला तो असाः—बऱ्याच दिवसांपासून दप्तरीं घोळत पडून राहिलेलें रावसाहेबांचें चालू प्रकरण, आगोटीच्या आरंभीं खानदेशांतून रेव्हिन्यूचे आफिसास येऊन थडकलें. व त्याच समयीं माथेरानाहून मे० एलिस साहेबही पुण्यास येऊन दाखल झाले. त्याचप्रमाणें कांहीं सरकारी कमेटीच्या निमित्त मे० म्यान्स्फील्ड साहेब ब० कराचीचे कमिशवर आणि मे० आशबनर साहेब ब० खानदेशाचे कलेक्टर या उभयतांच्या स्वाऱ्याही पुण्यास येऊन ठेपल्या. अशा ह्या त्रिवेणि संगमामध्यें पुण्य क्षेत्रीं जे पुरुष न्हाले, त्या पुरुषांस अधोगति कोठून प्राप्त होईल? त्या त्रिवर्ग साहेबांच्या एकत्रतेत विचार ठरून, अशबनर साहेबांनीं त्यां उभयतां साहेबांसमक्ष रावसाहेब यशवंतराव महादेवांस आदरानें कळविलें कीं, आणखी पंधरा दिवसांचे सुमारास तुह्मी धुळ्यांस येऊन आह्मांस भेटा, ह्मणजे तुह्मांस शहाद्याचे मामलेदारीचा लागलाच हुकूम देऊं. मग रावसाहेबांनीं त्रिवर्ग साहेब बहादुरांचा मोठे आभार मानून निरोप घेतला.

रावसाहेब पुण्याहून निघून प्रथम आपल्या वतनदारीच्या भोसें गांवीं गेले. तेथें त्यांनीं भाऊबंद, आप्त, सोयरेधायरे, इष्टमित्र, या सर्वांच्या आनंदानें भेटी घेऊन त्यांनीं एक दिवस

आपल्या घरीं त्या सर्वांच्या पंक्तीचा लाभ घेतला. रावसाहेब हे निर्वैर असल्यामुळें, या झालेल्या कार्यसिद्धीनें त्यांच्या भाऊबंदांस तर सर्वांपेक्षां जास्त आनंद वाटला. कारण, आपल्या कुलांत हा एक कुलदीपक पुरुष निपजून त्याणें आपल्या सर्वांचीं घराणीं प्रकाशित करून या कुग्राम भोंसे गांवची चोहोंकडे ख्याति करून दिली. नंतर पुढें श्री पंढरीची यात्रा करून रावसाहेब कुरडूच्या वाडीस अगगाडींत बसून चाळिसगांव मार्गें धुळ्यास जाऊन दाखल झाले, तों मे० कलेक्कटर साहेबांची स्वारी पुण्याहून नुक्तीच धुळ्यास येऊन दाखल झाली होती. मग रावसाहेबांनीं साहेब बहादुरांची भेट घेतांच विलंब न लागतां शहाद्याचे मामलतीचा हुकूम त्यांचे पदरांत पडला.

## शहादें.

कोण्या एका वैराग्यधारी ब्रह्मणानें सर्व तीर्थयात्रा केल्यानंतर गंगोत्रीच्या बारा कावडी श्रीरामेश्वरास घालण्याचा संकल्प करून तो निघाला. पुढें त्या ब्राह्मणानें गंगेची कावड नित्य खांद्यावर वाहून, त्या रामनाथ क्षेत्रीं प्रत्येक वर्षी महा शिवरात्रीस श्रीरामेश्वरास गंगाभिषेक करीत असावा. अशा क्रमानें अकरा वर्षांत अकरा कावडी श्रीमहादेवास त्यानें अर्पण करून, पुढें तो आपल्या संकल्पानुरूप बारावी कावड भरून आणीत असतां मार्गांत त्यास शीतज्वरानें गांठिल्यामुळें दिवसानुदिवस क्षीणतेनें अधिकाधिक थकत जाऊन, शेवटीं तो खानदेशच्या सरहद्दीवरील सातपुड्यांतील शेंदवें गांवीं चावडींत बेमार होऊन पडला. गांव कुग्राम, केवळ थोडक्याशा भिल्लवस्तीचा; आंगीं त्रिपुरज्वर सारखा खिळून राहिल्यानें जागचे जागीं हालण्याची ही शक्ति उरली नाहीं; त्या पडक्याशा चावडींत भरभर वाहणारा डोंगरी गार वारा चोहोंकडून घुसत आहे;

कै. म. म. द. वा. पोतदार, ग्रंथ संग्रह

जवळ आंथरण्या पांघरण्यास काय ती एक झिरझिरीत वोंगडी व फाटकीशी घावळी; तेव्हां तेथें औषध, पथ्यपाणी, पडदा वगैरेची त्याची तरतूद कोठून लागणार ? अशा त्या घोर रात्रीस तो ब्राह्मण उशाशीं कावड लावून आंधेरांत एकटाच म्लान होऊन पडला असतां त्याच्या मनांत नाना विचारांचे तरंग उद्भवून अंतरंग दुभंग होऊन गेलें. इतक्यांत तें श्रीरामेश्वरज्योतिर्लिंग डोळ्यांपुढें उभें राहून दुःखानें गहिंवरून ह्मणतो, 'भो मृडानीपते मृत्युंजया, मी मृत्यूची मुळींच परवा करीत नाहीं. परंतु हे विधुमौले गंगाधरा प्रभो, अहोरात्र जपून ही म्यां खांद्यावर वाहून आणलेली बारावी गंगा, तुझ्या अंगसंगास पात्र न होतां, या दुराचारी मत्तमातंगांच्या हस्तस्पर्शास योग्य होऊं पहात आहे ! शिवाय या ब्राह्मणदेहास शेवटीं या शबरांचे हात लागून हा श्वान गृध्रांचें भक्ष्य होणार ! येवढ्याचेंच मजा परम दुःख होत आहे ! ! हर हर ! ! ! "विवाहमर्थमन्नं च तथा जननमरणयोः ॥ कंठे बध्वा दृढं सूत्रं यत्रस्थं तत्र नीयते ॥ १ ॥ " या प्रमाणानें मी या माझ्या मृत्युभूमीस माझ्याच पायानें चालून आलों. ब्रह्मलिखित भोगणें कधीं कोणास टळावयाचें नाहीं.' असें ह्मणून त्या दुःखविवंचनांनीं व्याप्त असतां त्यास जरा झोंपेची गुंगी लागली. तों स्वप्नांत कपाळीं ठळक शुभ्र आडवें गंध; आंगावर स्वच्छ धवल वस्त्रें; हातांत जलभरीत पळीपंचपात्री व पायांत खडावा; असा कोणीएक वयोवृद्ध, तेजःपुंज, गौरकांत शुचिष्मंत ब्राह्मण येऊन हाक मारून ह्मणतो, "अरे हे तीर्थयात्रेकऱ्या ब्राह्मणा, असा तूं म्लान व दुःख–कष्टी होऊन कां पडला आहेस ? चल ऊठ, येथून जवळच खानदेशांत यशवंतराव महादेव नामेंकरून विख्यात एक साधुपुरुष अधिकारावर नांदत आहे, तो मीच आहें, असें मानून त्याचें दर्शन घेऊन शंकाभिमानरहित होत्साता त्यास त्या

भागीरथीचें स्नान घाल, ह्मणजे मला तुझी बारावी सेवा पावली." असें बोलून तो निघून जात आहे, तों एकदम दचकून हा कावडीवाला जागा होऊन आश्चर्य करून आपल्याशीं ह्मणतो, 'हा आतां येऊन गेलेला ब्राह्मण कोण असावा बरें! अरे हीं भ्रांति कशास? तो प्रत्यक्ष श्रीउमामहेश्वर रामनाथच, यांत कांहीं संशय नाहीं. अहाहा! काय ती तेजःपुंजता! काय तें दिव्य मनोहर रूप! काय ती वाणी!' किती ती मधुर तशीच धीर देणारी वाणी! असें ह्मणत आहे, तों घामानें आंग शिंदावून त्यास झोंप लागली. तों पहांटेसच जागृत होऊन त्याच्या जीवास जरा हुषारी वाटली. मग तसाच हळूहळू मार्गक्रमून जवळ जवळ मुकाम करींत ब्राह्मण-वस्तीच्या शिरपूर गांवीं पोंचून तेथील ब्रह्मटेकावरील विठ्ठलमंदिरांत आपली कावड लावून उतरला. हींव तापाची पाळी आळमटाळीनें येतच होती, परंतु त्या मंदिरांत कोणी कृष्णाजी सदाशीव मैत्राणी ब्राह्मण पोलीसचे जमादार रहात असत, त्या परोपकारी गृहस्थानें त्या पांथस्थ आजारी ब्राह्मणाची औषधपथ्यपाण्याची तजवीज ठेविल्यामूळें त्या ब्राह्मणाची बेमारी दिवसानुदिवस कमी होत होत दोन अडीच महिन्यांत त्याची प्रकृति चक्क झाली. मशारनिल्हे जमादारांचे कृतोपकार स्मरून, मग तो ब्राह्मण शहादें येथें यशवंतराव महाराजांचे दर्शनास जाण्यास मार्गस्थ होऊन तेथें माघकृष्णपक्षीं जाऊन पोहोंचला. त्या ब्राह्मणानें महाराजांचें दर्शन घेऊन, आपल्यास श्रीरामेश्वराचा झालेला दृष्टांत निवेदन करून, "माझे हस्तें ही जान्हवीस्नानाची सेवा घेऊन मला कृतार्थ करावें." अशी प्रार्थना केली त्यावर महाराज ह्मणाले, अहो भूदेवा, तुमची काय मनोभावना असेल ती खरी, परंतु मी तर एक यःकश्चित् अज्ञान मनुष्य आपल्या पायाचा किंकर असतां मला देवाची उपमा देणें ह्मणजे मुंगीस गज

ऱ्हणण्याप्रमाणें होत आहे. आतां आपली इच्छाच आहे, तर आपल्या मनोदयास मी सादर आहें. हें महाराजांचें अभिमानरहित मोठ्या लीनतेचें भाषण ऐकून आणि याचककामकल्पतरू अशी ती महाराजांची शांतचित्त सानंद मूर्ति अवलोकन करून, हा प्रत्यक्ष श्रीशिवच या पुरुषव्यक्तिरूपानें या भूतलीं वास करीत असल्याचा त्याचा दृढ निश्चय झाला.

नंतर आपल्या संकल्पानुरूप ह्या ब्राह्मणानें महाशिवरात्रीच्या दिवशीं प्रातःकालीं गांवांतील चार भिक्षुक व गृहस्थ मंडळीस पाचारून, तेथील गोमती नदीच्या तीरीं, यशवंतराव महाराजांस समंत्र यथाविधि भागिरथ्योंदकाचा अभिषेक केला व दुसरे दिवशीं तत्प्रीत्यर्थ यथाशक्त्या ब्राह्मणसंतर्पण केलें. मग त्या परान्न-वर्ज-व्रत ब्राह्मणानें दुसरे दिवशीं महाराजांच्या पंक्तीचा प्रसाद घेऊन आपल्या बहुत वर्षांच्यातीर्थाटणव्रताची परिसमाप्ति केली, आणि आपल्या जन्माच्या खऱ्या सार्थकतेनें महाराजांच्या चरणीं मस्तक ठेवून मोठ्या धन्यतेनें तो ब्राह्मण आपल्या करवीर क्षेत्रास गमन करिता झाला.

## शिंदखेडें गोष्ट पहिली.

### नवस.

अमळनेर येथील मामलेदारीच्या कारकीर्दींत सन १८६२–६३ इसवी वर्षीं सरकारी नौकरींतून अलग होऊन महाराजांस दहा महिने पावेतों घरीं बसावयाचा प्रसंग येऊन, जेव्हां कर्जमुक्त होण्याविषयीं त्यांस सुभे खानदेशचा हुकूम झाला, त्यावेळीं मुंबई येथील व्यापारी गोविंद आप्पा वाळवेकर, ह्या उदार पुरुषानें महाराजांस ऋणमुक्ततेसाठीं पांच हजार रुपये बिन्व्याजी उसनवार दिले. असें याच प्रकरणांत पूर्वी अमळनेर सदराखालीं सांगितलेलें वाचकांस आठवत असेलच. त्या

गोविंद आप्पांचा खानदेश वगैरे ठिकाणीं मुख्यत्वेंकरून कपाशीचा रोजगार असून, त्यांनीं महाराजांस हें कर्ज दिलें, तेथपासून पुढें सतत तीन वर्षें त्यांच्या व्यापारांत त्यांस सारखा फायदाच होत गेल्यामुळें मोठी भरभराटी झाली. परंतु पुढें दोन साल त्या व्यापारांत त्यांस इतकी बूड आली कीं, पूर्वीं तीन साल झालेला नफा जिरून मुद्दलास बरीच घस बसली तेणेंकरून गोविंद आप्पा गांगरून त्यांस कांहीं सुचेनासें झालें. "आजपर्यंत मोठ्या नांवलौकिकानें मजेंत दिवस गेले, परंतु आतां बरीगत नसून यापुढें अब्रू व पत राहणें कठीण दिसत आहे." अशा चिंता-व्यथेनें गोविंद आप्पा रात्रीं पलंगावर तळमळत पडले असतां त्यांस एकाएकीं स्मरण झालें कीं यशवंतराय महाराजांस हजारों लोक नवस करीत असून त्यांस ते पावत आहेत, त्याअर्थीं मलाही ह्या संकटार्णवांत तीच पद--नौका तारक होईल, ह्यांत संशय नाहीं. मग तत्काल उठून, महाराजांच्या त्या सुखानंदमूर्तीचें ध्यान करून, अनन्यभावानें नमस्कार करीत होत्साते ते ह्मणाले कीं, हे यशवंतराया, सालमजकुरीं मी आपल्या व्यापारांत यशवंत होऊन जर पूर्वस्थितीस प्राप्त झालों, तर मी आपल्यास उसनवार दिलेले पांचहजार रुपयांपैकीं वसूल वजा जातां आजमित्तीस जें बाकी घेणें निघेल, तें सर्व नवस ह्मणून आपल्या चरणीं अर्पण करीन. असें बोलून स्वस्थपणानें निद्रिस्थ झाले.

मग आपल्या व्यापारांत यशस्वी होण्यास यशवंतराव महाराजांचें नांव घेऊन, हिमतीनें गोविंद आप्पांनीं आपलें सर्व भांडवल खर्चीं घालून हजारों खंडी कापूस खरेदी करून त्याच्या जागोजागी वखारी घालून ठेविल्या. पुढें कपाशीच्या चणचणीचें धोरण बांधून विकरीची जलदी न करितां आगळा भाव मिळेल अशा खातरीनें कांहीं दिवस ते मार्गप्रती-

क्षा करीत स्वस्थ बसले. व त्याप्रमाणेंच ईश्वर कृपेनें त्यांचें तें धोरण पुढें इंग्लंडास अमेरिकेकडून कापसाचा पुरवठा न झाल्यामुळें म्यान्चेस्टरच्या तारांवर तारा लोटून, माघ फाल्गुनावर कपाशीस असा कांहीं तेजीचा भाव आला कीं, गोविंद आप्पांस मूळखेरदीवर चौपटीचा पैसा उत्पन्न झाला. तेणेंकरून मागील तीन सालचें सर्व नुकसान भरून येऊन निव्वळ वीस हजार रुपये नफा राहिल्यामुळें गोविंदआप्पांस परमावधीचा आनंद झाला.

चालू सालच्या व्यापारांत प्रथम मोठीशी हिमत नसतां पुढें अकस्मात पुष्कळ नफा राहिल्याचें समजून येऊन गोविंदआप्पा आनंदभरानें गद्दींवरून ह्मणाले, अहाहा!! ज्याच्या केवळ स्मरणमात्रेंकरून आज हा असा आनंदाचा दिवस मला प्राप्त झाला आणि ज्याच्या निव्वळ पादकमलाच्या कृपेनें आज मी हें सौख्यफळ भोगीत आहें, त्या महाभाग्यशाली साधुवर्य यशवंतराव महादेवाविषयीं कोणी आशंका करीत असल्यास त्या अभाग्याचें तें अज्ञान समाजावयाचें. असो. गोविंदआप्पांनीं आपण केलेल्या नवसाच्या पूर्णतेसाठीं महाराजांच्या खात्याचा हिशेब पाहून, बाकी येणें राहिलेले चार हजार रुपये त्यांचें नांवें जमा करून तितकीच रक्कम धर्मदायखातें ह्मणून नांवें लिहिली अशा रीतीनें महाराजांकडे घेणें बाकी पूज्य करून गोविंआपांनीं तत्काल मोठ्या प्रेमगौरवानें पत्र लिहून तें पावतीसह महाराजांच्या शेवेशीं शिंदखेडें येथें डांकमार्गें मुंबईहून रवाना केलें. त्यांतील आशय येणें प्रमाणें.

### पद.

( गड्यानो क्षणभंगुर संसार. या चालीवर. )

नवस घ्या यशवंताराया, नवसघ्या० ॥ धृ० ॥ सेवक गोविंद बाळेकर, वंदितसे पायां ॥ १ ॥ नवस० ॥ होयभवतपद-नौका

मजला दुःखाब्धि तराया ॥ २ ॥ नवस० ॥ होय नफा व्यापारीं बहु, हीं अघटित तव माया ॥ ३ ॥ नवस० ॥ पावुनि घ्या ह्या चार हजारां नवसाच्या रुपयां ॥ ४ ॥ नवस० ॥ पूर्ण करा भक्तकाम, मागे केसरी सुवरा या ॥ ५ ॥ नवस० ॥

## शिंदखेडें गोष्ट दुसरी.

### अद्भुत चमत्कार.

सन १८६९ चे मे महिन्याच्या आरंभीं शिंदखेड्याहून महाराजांची बदली सटाण्यास झाली, त्यावेळीं घरीं बऱ्याच दिवसांपासून तिष्ठून राहिलेल्या ब्राह्मणादिकरून याचकांच्या संभावना व बिदाग्यांसाठीं पांचशें रुपयांची त्यांस फारच गरज लागली. मग नजिकच अर्ध्याकोसावर पाटणगांवीं सतराचौधरी नामें एक संभावित पाटील असे, त्याजकडे जाऊन त्यांनीं सदर रकमेची त्याजपाशीं मागणी करून ह्मटलें. " चौधरी, या समयीं नाहीं ह्मणूं नका. हे मी तुमचे रुपये धुळ्याहून परत करीन; इतक्यावर तेथें सोय नच जमल्यास येटून पाठवीन. " महाराजांच्या ह्या वचनाबरोबर सतरा पाटलानें घरची अडचण होती तरी, आढे—वेढे न घेतां त्यांस रुपये देऊन सांगितलें कीं, ही माझी रक्कम धुळ्याहून पाठविल्यास बरे होईल. पुढें महाराजांचे ह्मटलें थेट सटाण्यास पोहोंचवून देण्यासाठीं तालुक्यांतील पुष्कळ लोकांनीं आपापल्या घरच्या गाड्या दिल्या, त्यातच ह्या सतरा—पाटलानें गाडीसह आपल्या धोंडू नांवाच्या पुतण्यास महाराजांबरोबर पाठविलें.

इकडे सातवे दिवशीं मोठ्या पहांटेस कोणी एक परदेशी जातीचा शिपाई त्या पाटण गांवीं सतरा—पाटलाच्या घरास ठेपून दारास थाप देऊन हाक मारून ह्मणाला,

**शिपाई**—सतरापटेल, दार खोलो.

सतरापाटील—कोण आहे?

शिपाई—आप दरवाजा खोलके बाहार आव्, फेर मैं कौन् हूं ये कहूंगा.

(मग सतरा-पाटील दार उघडून बाहेर डोकावीत आहे

इतक्यांत त्यांस पाहून रामराम करून)

शिपाई—आप सतरा-पटेल हो, के दुसरे कोई हो?

स० पा०—होय, मीच आहे. तुह्मी कोण, कोठून, काय कामाकरितां आलां आहां?

शि०—जसवंतराव महाराजनें आपके पांचसव रुपये पोहोच्यानेंके वास्ते आपके तरफ मेरेकूं धुलियासे भिजाय हय. ये मोहोरबंद थैली देखकर खोलके पांचसव रुपये आपके हाथसे मोजलिये हौर रुपये मिलेबद्दल पावती लिखके राखींये, जबतक मय भगवान् चौधरीके घरसे जाके आतां हूं.

असें बोलून ती मोहोरबंद थैली पाटलाचे हातीं देऊन शिपाई निघून गेला. मग पाटलानें त्या थैलींतील रुपये मोजून पहातां बरोबर पांचशें भरलें, ते लागलीच रोजखर्च्यांत महाराजांच्या नांवें जमा करून घेऊन, पावतीपत्र लिहून ठेवून तो शिपायाची वाट पाहत बसला. आतां परत येतों असें ह्मणून शिपाई गेला, तो चार घटका दिवस आला तरी अजून कां परत येत नाहीं! असें ह्मणून सतरा-पाटलानें आपल्या मुलास सांगितलें कीं, झुगऱ्या जा. भगवानचौधरीच्या घरून शिपायास बोलावून आणून त्यास तूप साखरेचा सिधासरंजाम काढून दे, ह्मणजे तो स्वैंपाक करून जेवून जाईल. मग झुगरूनें भगवानचौधरीच्या घरीं जाऊन शिपायाची पुसतपास करितां चौधरी ह्मणाला, कोण, कुठला शिपाई? मजकडे सकाळपासून कोणी आलें नाहीं व मला कांहीं ठाऊक नाहीं. मग तें वृत्त

घरीं चुलत्यास कळवून झुगरूनें गांवांतही पुष्कळ शोध केला, परंतु कोठेंच त्याचा थांग लागेना. अशा रीतीनें अस्तमान होत आला तरी शिपायाचा ठिकाण नाहीं; हें जाणून सतरा-पाटलास मोठा आचंबा वाटला. पुढें ती रात्र लोटून दिवस उगवला, तोही गेला, तथापि शिपाई दिसला नाहीं. मग निरुपाय होऊन सटाण्याहून आपला पुतण्या आल्यावर काय तें खरें सर्व समजेल, ह्मणून तो स्वस्थ बसला.

पुढें पांच चार दिवसांनीं पुतण्या घरीं सुखरूप येऊन पोंहोंचल्यावर सतरास आनंद होऊन त्यानें विचारिलें कीं, धोंड्या, सटाण्याकडील कशीकाय खबरबात आहे? हें गाडींत काय भरून आणिलें आहे? अरे, इकडील चमत्कार ऐक. सहा दिवसां पूर्वीं कोणीएक परदेशी शिपाई मोठ्या झुंजरका मजकडे येऊन, " महाराजांनीं हे तुमचे पांचशें रुपये धुळ्याहून पाठविले आहेत. हें घ्या आणि रुपये पावल्याची पावती लिहून ठेवा. मी गांवांतून थोडें काम आहे, तें करून मागल्या पायीं येतों. " असे सांगून मला रुपये देऊन गेला तो गेलाच. पुन्हां ह्मणून त्याचें दर्शन नाहीं. बरें, रुपयांच्या बाबतींत महाराजांचें पत्र मला पाहिजे होतें तेंही नाहीं. तेव्हां सर्वच हें मला विस्मया सारखें झालें आहे. तर तुला हें कांहीं माहीत असल्यास सांग. अरे, त्या शिपायाचें रूप तरी तुला काय सांगूं!! त्याचा तो मनोहर चेहरा, झोंकदार पोषाख आणि ऐटदार भाषण ह्यांहीं करून मी भुलून जाऊन त्यास घरांत आणून क्षणभर बसा, असें देखील ह्मणण्याचें मला भान उरलें नाहीं. उभ्याउभ्याच तो रुपये देऊन चालता झाला.

## पद.

( जाऊंनकोरे विषयाटविची वाट कठिण मोठी या लावणीच्या चालीवर )

पितृव्याच्या ऐकुनि वचना बोलतसे धोंडू. काका देवचितो

न शिपाई त्यास नका धुंडूं ॥ धृ० ॥ दोन दिवस रायांचा असतां धुळ्यास मुक्काम ॥ न जमे मिसल धनाची वचनीं राखाया नेम ॥ गेलों पुढती सटाण्यास, परि तें तर परधाम ॥ वळणा खेरिज कोण एकदम देतो मग दाम ॥ १ ॥ तांदूळ, गूळ मिळोनिही शंभर रुपयांची रक्कम ॥ मात्र देउनी रायें कथिलें मज शब्दानुपम ॥ चाल ॥

॥ सांग तूं चौधरि सत्रास ॥
॥ नच करा लव माझा त्रास ॥
॥ सत्वरें धन तुमचें खास ॥

पाठविन, मी परंतु माझा लोभ नका सांडू ॥ रायपदाब्जावरी केसरी—अलि लागतसे हिंडूं ॥ १ ॥ पि० ॥

हे पुतण्याचे समंजसपणाचे बोल ऐकून चौधरी गहिंवरून ह्मणाला, हे देवा, मी महापापी कीं, तूं माझ्या दाराशीं येऊन मी तुझ्याशीं नीट बोललों पण नाहीं. धिःकार असो माझ्या ह्या जिण्यास ! ! धुळ्याहूनच रक्कम परत करावी ह्मणून मी महाराजांस निक्षून बोललों, त्या अर्थी माझ्या ह्या जिभेस आणि धनास आग लागो ! ! असें बोलून सतरापाटील वारंवार कष्टी होत गेला. ही वार्ता तत्काल चोहोंकडे लोकांत पसरून जो तो महाराजांची ख्याति गावूं लागला. शिंदखेडें येथील इनामदार इंद्रशिंग राउळ आणि त्या भागाचे रा० ब० विनायक दिवाकर शारंगपाणी डिस्त्रिक्ट डेप्युटी ह्या उभयतां गृहस्थांस, ही गप्प आहे असें वाटून ते तत्क्षणीं मुद्दाम पाटगांवीं जाऊन सत्रापाटलास भेटलें. सत्रानें घडलेली सर्व हकीकत सांगून जमाखर्चही दाखविला. त्यावरून त्या हर्दु गृहस्थांची भ्रांति फिटून सर्व कुतर्क विलयास गेले. पुढें या गोष्टी धुळें येथील खानदेशवैभवपत्रांतही डंका गाजून सर्वांच्या शंका दूर झाल्या. असो- नंतर कांहीं दिवसांनीं सत्रा-

पाटील मुद्दाम महाराजांच्या दर्शनासाठीं सटाण्यास जाऊन त्यानें आपल्याकडे फाजील आलेले शंभर रुपये महाराजांच्या चरणीं अर्पण केले. परंतु महाराजांनीं ते न घेतां त्यांचा धर्मकृत्यांत व्यय करण्याचें सांगून त्यास मार्गस्त केलें.

या गोष्टीचा अद्यापहीं कित्येकांस संशय असल्याचें ऐकण्यांत येत आहे परंतु त्यांनीं असा विचार करावा कीं लटकेंच सांगून आपलें एकदम पांचशे रुपयांचें नुकसान करून घेईल, असा आजकालांत कोणी धनाढ्यही आढळून येणार नाहीं मग सत्रापाटील तर, एकसामान्य शेतीवाला असतां दुसऱ्याची बडज्याव करून आपणास सर्वस्वीं बुडवून घेईल, असें ह्मणतां येत नाहीं. दुसरें, "या कलीमध्यें अशी गोष्ट होणें असंभाव्य आहे." असेंही कित्येकांचें ह्मणणें आहे. तर त्याजवर माझें उत्तर एवढेंच कीं, या कलिमध्यें परमेश्वरानें अतिशूद्रांचें रूप धरून डोकीवर धान्यविक्रीच्या असंख्य द्रव्याचें पोतें वाहून, बेदर येथील यवन बादशाहाच्या दरबारांत तो पैसा भरणा करून आपला भक्त दामाजी यांचें संकट निवारण केलें.ही गोष्ट जर आपण तथ्य मानून मोठ्या भक्तीनें वारंवार तीं कीर्तनें ऐकत आहोंत, तर मग या जगद्वंद्य साधुवर्य यशतंवराय महादेवाबद्दल कुशंका घेणारे लोक आपण दुराग्रही व नास्तिक आहोंत अशाविषयींची मात्र लोकांस ओळख करून देत आहेत, याहून दुसरें कांहीं दिसत नाहीं. प्रभु भक्तांचा अभिमानी, सारथी, ऋणी असल्याची साक्ष वेदपुराणें जागोजाग देत आहेत याहून आणखी जास्त पुरावा तो काय पाहिजे.

## मनमाड.

## निर्लोभता.

सन १८७९ सालीं महाराज मनमाड येथें श्रीविठ्ठल मंदिरांत बरेच दिवस वास्तव्यास असतां एके दिवशीं माळवा प्रांतांतील

कोणी एक श्रीमंत मारवाडी आपली बायको आणि तीन चार वर्षांचा मुलगा यांस बरोबर घेऊन सेवकजनासहवर्तमान महाराजांच्या दर्शनास आला. त्या शेटजीनें आपल्या मुलास महाराजांच्या पायांवर घालून मांडीवर बसविलें मग त्यानें बायकोसह त्यांच्या चरणी दंडवत घालून दीड हजार रुपयांचे दोन तोडे शिपायांजवळून घेऊन त्यांज पुढें ठेविले, आणि प्रार्थना करून ह्मटलें, महाराज, आपल्या नवसानें हें मला पुत्रफल प्राप्त झालें, ही आपल्या पूर्ण कृपेची देणगी होय. तर पुढें ठेविलेल्या ह्या नवसाचा आपण अंगिकार करावा. तेव्हां महाराज स्मित होऊन नम्रतेनें ह्मणाले, शेटजीबाबा, तुह्मां सर्वांप्रमाणेंच मी एक मनुष्य असतां माझा नवस तो कशाचा !! त्या श्रीलक्ष्मीनारायणाचा हा सर्व कृपाप्रसाद आहे, तर हें सर्व द्रव्य परत घेऊन जाऊन, ह्याचा व्यय एखाद्या सत्कार्याकडे करा ह्मणजे झाले. तुमचा हा गोजिरवाणा मुलगा अखंड सुखी असो; असें ह्मणून त्यांनीं त्या मुलाच्या अंगावरून हात फिरविला, हें महाराजांचें निर्लोभ व निरभिमानपणाचें भाषण ऐकून शेटजी थक्क होऊन ह्मणाला, मी हा पैसा परत नेण्याच्या बुद्धीनें मुळींच येथें आणिला नाहीं. यास्तव या दासावर कृपा होऊन ह्याचा महाराजांकडून स्वीकार झालाच पाहिजे. असा त्याचा आग्रह जाणून महाराज त्या द्रव्यास हस्तस्पर्श करून ह्मणाले, शेट, हें द्रव्य माझें आहे, असें जर तुह्मीं ह्मणत आहां, तर हें उचलून श्रीविठ्ठलरखुमाईच्या पायांवर नेऊन ओता. ही महाराजांची आज्ञा होतांच किंचित् विलंब न करितां आपल्या सेवकजनांसह तो शेटजी मंदिराच्या गाभाऱ्यांत जाऊन, त्यानें सिंहासनस्थित श्रीपांडुरंगरुक्मिणिचरणीं तें पंधराशें रुपये "पुंडरीकवरदा-हरिविठ्ठल" अशा गजरानें एकदम ओतून दोन्हीं तोडे मोकळे केले.

तो शेट देवाचे पायांवर रुपये ओतण्यास जात असता त्याच्या बरोबर महाराजांचे शेंकडों यात्रेकरी देवळाचे गाभाऱ्यांत घुसून एकच गर्दी झाली. रुपये ओतण्याचा मात्र अवकाश, तोंच आव्याच्या लुटी प्रमाणें एकदम त्या द्रव्याची लूट होऊन ज्याचे त्याचे आंगशक्ती प्रमाणें कोणास पुष्कळ, कोणास थोडें, असें द्रव्य लाभलें. कित्येकांस तर नुसते धरमधक्के बसून धामाधूमपणानें आपलीं धोतरें पागोटीं, सावरीत बाहेर पडावें लागलें. सारांश, दहा पांच पळांत तें सर्व धन खलास होऊन कोणी आनंदानें, कोणी कण्हत कुंथत असे सर्व लोक बाहेर पडून गाभारा मोकळा झाला. या लुटींत काने कोपरे झाडून झटकून पुजाऱ्याच्या हातीं सरासरी पंचविस तीस रुपये लागलें.

गरज लागल्यास प्रंसगीं महाराज एक पावली सुद्धां एखाद्या वाटेच्या वाटसरापासून उसनी मागून घेत, परंतु नवस, नजर नजराणा अथवा देणगी या मिषानें कोणी त्यांजपुढें द्रव्य आणून ढीग केला, तर त्यास नुसता हस्तस्पर्श करण्यासही त्यांचा आत्मा किंचितही भुकेला न होतां हरप्रयत्नानें तें सारें द्रव्य त्याच घटकेला परत करून ते तें एखाद्या धर्मकृत्याकडे लावण्यास सांगत असत, असा नित्यानुभव असे.

---

# प्रकरण पांचवें.

श्लोक ( द्रुतविलंबित वृत्त. )

बहिण कीं जननी पर-कामिनी ।
वमनसा पयसा परका मनीं ॥
निरभिमानपणें लवला जगा ॥
पर—कुटाळकिला बसला उगा ॥ १ ॥

समसमान जया लघु थोर ते।
मग न तद्गृहिं कां प्रभु तो रते? ॥
हृदयिं शांति विराग दया क्षमा।
करिल त्यावरि कां न दयाक्ष मा! ॥ २ ॥

असति पृष्टिस शंभरशीं झटें।
तरि परोपकृतीस सुखें झटे ॥
झिजतसे पर-दुःखनिवारणीं ।
प्लवाचि सद्गुरु तो भवतारणीं ॥ ३ ॥

## सर्व सामान्य स्थितीचें विवेचन

यशवंतराय महाराजांच्या सर्व सामान्य स्थितीचा एकंदरीनें विचार केला असतां, आजपर्यंत जे जे पुराणप्रसिद्ध महापुरुष आणि जगविख्यात साधुजन होऊन गेले त्यांच्या मालिकेंतच तो जगद्वंद्य महाभाग्यशाली पुरुष गोंवण्यास योग्य आहे, इतकेंच नव्हे; तर त्या मालिकेच्या मेरुस्थानापन्न होण्यास तो सपात्र आहे. असें ह्या प्रकरणाच्या शेवटील तात्पर्यावरून सहज लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

रूप. श्लोक ( चामर. )

मूर्ति उंच ठेंगणी न, कृष्ण गौरवर्णशी;
अंबुजाक्षदृष्टि नासिकीं तशी शुकीं जशी;
मंदहास्य वक्त्र, तें विलोकुनी निवें मन;
पंढरींत पांडुरंग त्या परीच तो जन; ॥ १ ॥

## स्वभाव गुण लक्षण कर्तुत्व

श्लोक ( शिखरिणी )

पर-च्छिद्रा झांकी प्रकट करुनी चांगुलपणा;
प्रमोदें अन्याच्या सरसुनि करी वर्धन गुणां;
परोत्कर्षें हर्षे; बहु परहितीं तोषचि जया;
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भवभया ॥ १ ॥
दयार्द्रे चित्तें जो सहज परदुःखें विकळतो;
स्वभावें सर्वांशीं अकपटचि गंगा निवळ तो;
रसाळा वाणीनें ह्मणत सकलां आप्तसम 'या';
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ २ ॥
विपत्कालीं धैर्ये अनुदिनिं सुखें वास करितो,
प्रवर्ते सद्धर्मे; नृपपाणें सहिष्णुत्व वरितो;
धरी जो सद्विद्यारत असुनि सर्वत्र विनया;
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ३ ॥
पर-स्त्रीतें मानी जननि; पर-निंदेस्तव मुका;
न इच्छी अन्यायें पर-धन फुका देखिल रुका;
असूया, यत्क्रोध, प्रबल मदही जाय विलया;
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ४ ॥
जया कोणी दुःख श्रम जरि दिला तापहि बहू,
स्वभावें सौजन्यें सुपुरुष जसा इक्षु हुबहू;

पिळा घाणीं, अग्नी वरति कढवा, गोडचि रया;
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ५ ॥
उगाळा कांडाही परिमलचि दे चंदन तरी;
तशा रीतीं लोंकीं निज सुजनता साधु वितरी;
करी अद्रोहत्वें सुजन-कुजनीं जो सम दया;
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ६ ॥
क्षमा शांति स्वांगीं धरुनि, वचनिं एक दृढता;
उदारत्वें वेंची स्वधन पर-कार्या पर-हिता;
पदीं कोणी येतां शरण, तरि दे शीघ्र अभया;
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ७ ॥
स्वसंयोगें दे जो सुजन-कुजनां आत्म-समता;
सुदुग्धत्वा क्षीरीं उदक जणु पावे मिसळता;
सदंघ्रीं त्या पावे नमन करुनि केसरि जया;
महात्मा तो तापत्रय हरुनि, वारी भव-भया ॥ ८ ॥

अशा लोकोत्तर गुण-लक्षणांनीं युक्त अशी यशवंतराय महाराज ही कोटींतली एक मोठी कोटीच होऊन गेली. त्या अद्वितीय पुरुषाच्या स्वभाव-गुण-कृति-वर्तन संबंधानें जितकें वर्णन करावें, तितकें थोडेंच आहे. परंतु कांहीं मुख्य मुख्य गोष्टींचें विवेचन याखालीं थोडक्यांत करीत आहें.

प्रकृति—वर्तन सत्वगुणी, खाणेंपिणें तमोगुणी आणि भोगविलास रजोगुणी, अशी ज्याची सत्वतमरजोगुणात्मक त्रिविधा प्रकृति असे. अक्रोधता, शांति, दया आणि क्षमा, ह्या मुख्य चार गुणांनीं ज्याची सत्व-गुणशीलता लोकांत वारंवार व्यक्त होई. भोजनांत तेलकट, तिखट, आंबट पदार्थ असण्याची ज्यास मोठी आवड असे, त्यांतून तिखटाची तर मोठीच भक्ति होती. नित्यशः ज्याच्या घरच्या भाज्या व फोडणीचें वरण

इतकें तिखट असे कीं, एका घांसाबरोबर अथवा फुरक्यासरशा कोंकणस्थांच्या पंचगंगा लोटाव्या. उन्हाळ्यांत तृषा शमनार्थ कोणी सकाळीं साखरपाणी घेतात, परंतु तिखट पाण्यानेंच ज्याची तहान भागत असे. निरशनाच्या फराळास थोडे भुईमुगाचे दाणे आणि तिखटाचा गोळा, इतकें असलें ह्मणजे पुरे. या खानपानभक्तिवरून ज्याची तमोगुणी प्रकृति असल्याचा भास व्हावा. स्वच्छ वस्त्रें पात्रें, नरम बिछाईत, तांबूल भक्षण, सुवासिक पुष्प हार, सौगंधिक तैलें, उदबत्त्या, रोषनाई, गायन इत्यादिकांची ज्यास मनापासून प्रीति असे. ह्या भोगोपचारांवरून रजो-गुण-स्वभावाची प्रकटता होत असावी.

**समाधानवृत्ति**—संपत् विपत्, सुख दुःख, लाभालाभ, जयाजय इत्यादि प्राप्तस्थितींत ज्या साधुवर्यांची मुखचर्या सूर्यासारखी सदा सारखी राहून ज्याची चित्तवृति पारखी ह्मणून कोणास कधीं दिसलीच नाहीं. पोटीं संतति नाहीं, ह्मणून ओठीं उद्गार न निघून खिन्नतेचा स्पर्शही ज्याच्या अंतःकरणास कधींच झाला नाहीं. ह्या ऐहिक भंगुर संततीपेक्षां चिरस्थायिनी जी सत्कीर्तिरूप पारलौकिक संतति, ती ह्या जगांत निरंतर कायम रहावी; येवढीच ज्यास खरी अपेक्षा होती. शिवाय बंधूंचा परिवार, तींच आपलीं मुलें जाणून त्यांची सर्व स्थिति चालविण्यांतच ज्यास सर्वदा आनंद असे.

**औदार्यवभूतदया**—कोणी कसाही याचक कोणत्याही वेळीं येऊन कसेंही मागणें करो, परंतु ज्याच्या मुखांतून कधीं "नकार" ह्मणून निघालाच नाहीं. फार तर काय! उन्हाळ्यांत एके दिवशीं दुपारीं कचेरींत जात असतां, भर रस्त्यांत कोणी फकीर समोर येऊन "महाराज जूते विना धूपसें पाव जल रहे हय" असें ह्मणत असतां, ज्यानें तत्काल आपल्या पायांतील जोडा त्यास काढून देऊन तसेंच पुढें पाय पोळत

कचेरींत जाणें केलें. त्या प्रमाणेंच एकदा कचेरीच्या तयारींत असतां कोणी एक ब्राह्मण स्त्री फाटक्या धुडक्यानें सरासरी अंग वेष्टून ज्याच्या पुढें काकुळतवाणी येऊन ह्मणाली, " लुगड्या वांचून ही काया झांकण्यासही मी विप्रजाया असमर्था आहें " ह्या तिच्या करुणा-शब्दा बरोबर ज्यानें आपल्या बायकोचें वाळत घातलेलें नवें करकरीत लुगडें दांड्यां-वरून ओढून तीस देऊन संतोषवून वाटेस लाविलें. असे ज्याचे उदारपणाचे चटके चटकेचे निरनिराळे चटकेदार चुटके किती ह्मणून सांगावे ! चवथ्या प्रकरणांतील एरंडोल सदरा खालची पहिली गोष्टच ज्याच्या औदार्याची खरी साक्ष देऊन पुरी खातरी करून देईल. समोर येऊन मागणारासच देणें होत होतें, येवढेंच नव्हे. तर नित्य एक दोन वेळां गांवांतील स्वतः ज्यानें देवळें, मशीदी वगैरे पांथस्थ उतारू उतरण्याच्या ठिकाणीं शोध घेऊन क्षुधितांस अन्न, उघड्यास वस्त्र, थकलेल्यांस बसण्या करितां तट्ट देऊन, व्याधिग्रस्तांची औषध-पथ्य-पाण्याची तजवीज राखावी. अनाथ-प्रेतसंस्कार करण्याच्या कामीं प्रसंगीं ज्याचें सदय हृदय महोदार-पणानें पुढें सरसावून धांवे. अशा प्रकारें ज्याच्या हातून किती दानधर्म झाला असेल याची गणती करण्यास कोणतीही कीर्दखतावणी पुरणार नाहीं.

गांवगन्ना गाडींत बसून जातानां गाडी हाकणारास घोडे बैलांस पळविण्याकरितां चाबूक अथवा छडी न मारूं देतां नुसत्या हाता-तोंडाच्या इषारतीनें गाडी चालूं द्यावी. एकेसमयीं उन्हाळ्यांत बेमार होऊन रस्त्यांत तळमळत पडलेलें एक गाढव दृष्टीस पडतांच त्याजवर तत्काल ज्यानें छायेसाठीं एक लहानशी झोंपडी बांधवून त्याच्या चाऱ्यापाण्याची नित्य व्यवस्था ठेविली. शेवटीं तें गाढव मरतांना ज्यानें घरून थोडी भागीरथी आणवून त्याच्या तोंडांत घातली व पुढें पदरच्या खर्चानें त्यास मुठमाती

देवविली. अशा ज्याच्या भूतमात्राच्या कळवळ्याच्या गोष्टी किती ह्मणून सांगाव्या !

**क्षमाशांति**—गोसावी, बैरागी, फकीर, नानकशाई वगैरे लोक अतिथ्याईपणानें तागाकरून, गागावून, मागावयास पुढें आले असतां अथवा त्यांतून कोणी क्रोधानें हवें तें वडवडून सोटा मारण्यासही आंगावर आले असतां ज्यानें किंचित्‌ही न रागावतां हृदयप्रांतीं शांतिच वाहून, त्या सर्वांस लीनतेनें स्थिर करून गांज्या-भांग-आफु-तमाखुसुद्धां सर्व तर्तूदीनें त्यांचीं मागणीं थोड्या बहुतानें पुरीं करावी.

**निर्मोहत्व**—दारावंधु, बंधुपरिवार, आप्तस्वकीय, सोयरे धायरे इष्टमित्र, आश्रितपरिचारक, यांसहवर्तमान जगतत्कुटुंबी होऊन सतत नांदत असतां, त्यांत श्रीजनकराजा प्रमाणें अलिप्त राहिल्यामुळें ज्याची केवळ विदेहस्थिति बनून गेली होती. कामापुरते सृष्टव्यवहार आचरून त्यांपासून जो सदां अतृप्ण राहिला. कामक्रोधादि षड्रिपूंचा विवेकखड्गानें परिहार केल्यामुळें जो मनोनिग्रही झाला. आणि नासिकाग्रीं नेत्रदृष्टि सदां स्थिर केल्यामुळें ज्यास सहजानंद—समाधीचा योग अनायासें प्राप्त झाला. घटकाभर गोड दिसून पुढें मनास दुःखाचा चटका देणारा जो प्रपंचमायेचा लटका पसारा, त्याचा सुविचारानें तटका तोडून, ज्यानें परोपकारी आपला देह लटकावून, प्रभुनामामृताचा घुटका ग्रहण करून' या भूमंडळावर आपल्या सत्कीर्तिचा पटका फटकारून जनास आपला चटका लावून जन्ममरण-व्यावृतींतून आपली अखंड सुटका करून घेतली.

**व्रत नेम धर्माचरण**—एकपत्नी हेंच ज्याचें मुख्य व्रत असून एकादशी, प्रदोष, चतुर्थी, जयंत्या हे व्रतोपवास असत शिवाय वर्षास चातुर्मास्य नक्तव्रत आचरून त्याचें पारणोद्यापन गांवांतील सर्व ज्ञातींस मुक्तद्वार भोजन दिल्यानंतर होत होतें.

श्रीनरहरि हें कुलदैवत असल्यामुळें प्रतिवर्षी वैशाखमासीं ज्याच्या मंदिरीं नृ-सिंहोत्साह मोठ्या थाटाचा सात दिवस होत असे. शिवाय श्रीरामनवमी, जन्माष्टमी, हनुमान्जयंती हे उत्साह होत असत. त्रिकाळ स्नानसंध्या, सकाळ संध्याकाळ देवपुजा, श्रीमद्भागवत-श्रवण, गवयाचें गाणें याप्रमाणें ज्याचा नित्यक्रम असे. जरी कडकडीत विष्णूपासना होती, तरी श्रीशिवाच्या दर्शनाचा ज्याचा नित्यनेम असे. सारांश, हरिहरांविषयीं ज्याची अभेदभक्ति होती.

**अधिकार वर्तन**—अहंकाराचा वाराही ज्याच्या मनास कालत्रयीं न स्पर्शतां, अंमलदारीचा तोरा लहान थोरांसही कधीं दिसून आला नाहीं. अधिकार-मदानें धुंद होऊन लोकांस गुरकावणें, धमकी देणें, जरब दाखविणें अथवा आपल्या गुरमींत डुलऱ्यास मर्मी बोलून शिव्यादिकरून अनिर्वाच्य शब्दांचा उपयोग करणें, हें ज्याच्या स्वप्नींही कधीं वसलें नाहीं. सर्वदां मधुर व प्रिय अशीच ज्याची वाणी सर्वांच्या कानीं पडत गेली. गांवगन्नाचे पाटील कुळकर्णी वगैरे ताबेदार लोकांस सरकारी कामांत हुकुम देतांना देखील, "रहीम नजर करण्यांत आली आहे, दंड करण्यांत येईल," इत्यादि हुकुमी जरबी शब्द लिहिण्यांत बिलकूल न येण्याविषयीं ज्याची नेहमीं मोठी जपणूक असे. कारकुनानें लिहून सह्या करितां आणिलेले हुकुम वगैरे कागद प्रत्येक वाचून पाहून त्यांत कांहीं मनाविरुद्ध अथवा धमकी वगैरेचे शब्द आढळून आल्यास ते तर काढावयाचे आणि कारकुनासही वाईट न वाटलें पाहिजे, यास्तव ज्यानें त्या हुकुमांत कोठें तरी बळेंच एखाद्या अर्ध्या ओळीचा शोध घालून आजाणपणाचा भाव दाखवून रेती ह्मणून शाईची दौत ओतून चपापावें. मग अर्थात तो कागद नासला जाणून दुसरा हुकूम स्वतः मना प्रमाणें लिहून सही

करावी. या प्रमाणें वेळोवेळीं समयोचित् अशा नाना युक्ति उपायांनीं कोणाचें मन न दुखवितां स्वकार्य साधीत असावें. हाता खालच्या कारकुन लोकांस ज्याची कारकीर्द धर्मराज्य वाटावी. कचेरींत वक्तशीर येण्याची हजेरी ज्याच्या दरबा. रांत मुळींच माहीत नसें. कारकुनाच्या खोटी मुळें जरूरीचीं लहान मोठीं कामें ज्यानें स्वतः निकालास लावून वेळेवर कामा पुरती बारनिशीही करून द्यावी. परंतू कोणास रागें भरूं नयें. प्याद्या शिपायांसही' तुह्मी दमलांत असे ममताळु शब्द ज्याच्या अमलांत वारंवार ऐकूं येत असत. फिर्याद समोर येऊन चौकशींत कायद्या—प्रमाणें गुन्ह्याची शाबिती झाल्यास, गुन्हेगारास होतां होईल तों कैदेची शिक्षा न देतां दंड तरी अल्प स्वल्पच करावा. तोही देण्यास त्यास ताकद नसल्यास ज्या दयार्द्र पुरुषानें तो दंडाचा पैसा आपण पदरून सरकारांत भरीत असावा. अशी जरी प्रजेवर सतत कृपेची नजर होती, तरी ज्यानें केलेला कोणताही फैसला हायकोर्टापर्यंत पसंतीचा एक मासलाच होत गेला. हद्दीं हद्दीचे जिल्यास जाणारे कैदी ज्याच्या ठाणें कचेरींत मुक्कामास आले असतां त्यांस, घरून चांगलें वहाडणें पोहोंचवून यथेच्छ जेऊं घालावें व पुढें पदरच्या खर्चानें भाड्याच्या गाडींतून त्यांस रवाना करून द्यावें. मामलेदार ह्मणून कोणी भाजी—पाला, फळ—फळावळ वगैरे पदार्थ नजर आणून दिले असतां त्यांस जेवावयास घालून त्यांस त्याच्या मालाच्या किमतीहून जास्त पैसा बळेंच देऊन वाटेस लावावें. मग त्या ठिकाणीं लांच—लुचपत कितपत प्रवेश करील, हें स्पष्ट करणें नलगे.

**ओळख व स्मरण**—हीं दोन्हीं इतकीं जबरदस्त असत कीं, पूर्वीचा थोडा परिचित मनुष्य पुढें १०—५ वर्षांनीं जरी पाहण्यांत आला, तरी त्यांस ज्यानें तत्काळ ओळखून नांव घेउन या ह्मणावें. त्या प्रमाणेंच शेंकडों सावकारांची हजारों रुपये

घेव देव असतां त्यासर्वांचा जमाखर्च ज्याचे ऱ्हदयांत लिहिलेलाच असे; असें ह्मणावयास कांहीं हरकत नाहीं. कारण, कोणी सावकार चोपडया घेऊन हिशोबास आला असतां त्यास ज्यानें "तुमची बाकी ७७३ रुपये ११ आणे राहिली आहे." असें एकदम सांगावें व पुढें त्या बरहुकुमच हिशोबाच्या रुजवातींत मेळ पडावा.

**गृहदर्शन**—द्वारीं सदावर्त, पाणपोई मंदिरीं ब्राह्मण संतर्पण दानधर्म, पुराण व हरि गुणानुवादचर्चाश्रवण, जयंत्यादि देवोत्साह, दीपोत्सव, नानामाल्यगंध, कथाकीर्तन, संगीत गायन, नानावाद्य-वादन दर्शनार्थ लोकागमन इत्यादि प्रकारचा राजैश्वर्य—तुल्य नित्यानंद अष्ट सिद्धिसह ज्याच्या मंदिरीं तत्परतेनें राबत असल्यामुळें सर्वांस सुख विश्रांति होऊन तेथून हलूंच नये असें वाटावें.

**भार्या दर्शन**—ज्यानें आपल्या कुंटुंबिनीच्या संतोषार्थ आज एखादा नवा डागिणा घडावा आणि उद्यां याचक जनांच्या तर्तुदि साठीं तो परत मागून घ्यावा; त्या प्रमाणेंच बायकोचीं लुगडीं द्वारीं मागावयास आलेल्या अनाथ स्त्रियांची काया झांकती करण्यास भलत्याच वेळीं देऊन टाकावीं; येणें-करून त्या गृहिणीकडे पाहिलें असतां, आज सर्वांगावर पादांगुली पासून शिरीं कचभारां-पर्यंत सारखे लहडलेले डागिणे; आणि उद्यां नाकांत लहानसें सुंकलें व गळ्यांत मंगळसूत्र मात्र एकलें, इतकेंच कायतें दिसावें. तसेंच आज नेसावयास आबरेशमी बऱ्हाणपुरी शालु अथवा येवली फुटाणी, आणि, उद्यां विलायती कीलवाणी पातळ आलवाणी. अशी स्थिति ज्याच्या उदारपणाच्या अति धौतालपणानें तीस वारंवार प्राप्त व्हावी, त्यामुळें त्या बाई कधीं लक्ष्मीरूप आणि कधीं पार्वतीरूप दिसून याव्या.

**लोकमत**—ज्याची ती अविच्छिन्न इंद्रिय-निग्रहता, अप्रतिमशांति, लोकोत्तर भूतदया, अनुपम औदार्य आणि अद्वितीय

लीनता, हीं पाहून बाल असो वा वृद्ध असो, स्त्री असो वा पुरुष असो, प्राचीन भोळ्या समजुतीचा असो वा नवीन सुधारलेल्या मताचा असो, कोणी कसाही असला तरी त्याची महाराजांविषयीं पूज्य बुद्धि झाल्या वांचून रहात नसे. कोणी कितीही नास्तिक, निंदक व दोषैकदृष्टि असला तरी त्यानें तें महाराजांचे अदांभिक, निर्लोभी, लीन, उदार व सदय असें आचरण पाहिलें कीं त्याचे मनांत स्वकीय कुबुद्धिविषयीं अनुताप होऊन त्यानें लज्जित व्हावें ! अशा अबाधित गुणांमुळें जो महात्मा पुरुष सर्वांस प्रिय होऊन ज्याचा द्वेष करण्याची वासनाच कोणास होत नव्हती, यास्तव ज्यास अजातशत्रु ह्मणून लोक ह्मणत असत. सारांश, प्राचीनकाळीं जे जे महान्पुरुष होऊन गेले ते ते कोणत्या तरी एक एक दोन दोन इत्यादि नियमित गुणांनीं जगद्विख्यातीस येऊन पुराणांतरीं कीर्तिरूपानें अजरामर होऊन राहिले. परंतु त्यांच्या त्यांच्या आंगच्या लोकोत्तर सर्व गुणांची मूस ओतून, यशवंतराय महाराज हा एक अप्रतिम पुतळा परमेश्वरानें या भूतळावर उत्पन्न करून, त्या एकट्यासच त्या सर्व महापुरुषांच्या उपमा साजविल्या. पहा, एकपत्नीव्रत नियमानें साक्षात् रामचंद्रच; मनोनिग्रह-गुणानें प्रत्यक्ष गांगेय; अक्रोध, शांति, क्षमा ह्या गुणत्रयानें मूर्तिमान मुनि वसिष्ठ; दया, धर्म, धैर्य सहनशील आणि निर्वैरत्व या गुणपंचकानें केवळ धर्मराज; निर्मोहत्व गुणानें प्रति जनक राजा; औदार्य गुणानें दुसरा कर्णच; श्रीनृसिंहोपासना गुणानें शुद्ध राजा चंद्रहास आणि मातृपितृ-भक्ति गुणानें निपट श्रावण अथवा पुंडरीक. तस्मात् असा धन्य पुरुष या उर्वीतलावर पूर्वी अन्य कदाचित् झाला असेल व पुढें ही क्वचितच होईल.

# प्रकरण सहावें.

श्लोक (स्रग्धरावृत्त)

यत्पश्चात्कीर्ति ज्याची क्षितिंत सुकृतिची सर्व गाजून राहे॥ अस्तित्वीं तेंचि मृत्युत्तर विभव जगीं सर्व गाजे नरा हे॥ जाणावा एक तो सत्पुरुष सुभग कीं भाग्यवान् साधु लोकीं; आहे जीवंत तो या क्षितिवरति सदां कीर्ति-रूपें विलोकीं॥१॥

शके १८०६—१८०९.

## जनस्थानक्षेत्रनिवास.

मागें तिसऱ्या प्रकरणाचे शेवटीं सांगितल्या प्रमाणें शके १८०६च्या चैत्र मासीं महाराज त्र्यंबकाहून नाशिकास कायम राहण्याच्या उद्देशानें येऊन आदितवार पेठेंत जनप्पा लिंगाइताच्या वाड्यांत राहिले. क्षेत्र संबंधानें आधींच नाशिकास नित्य थोडीबहुत यात्रा नेहमीं येत असून तिथिपर्वणी, संक्रांति, अर्धोदय, महोदय, ग्रहणादि महायोगपर्वदिवशीं शेंकडों कोसांवरील हजारों यात्रेकरी तेथें यावयाचे, त्याच प्रसिद्ध गोदाक्षेत्रीं महाराज निवासास असल्याची वदंता चहूकडे वायुवेगाप्रमाणें हसरून अधिकाधिक यात्रा तेथें वाहूं लागली. गंगाभेट, तीर्थविधि, देवब्राह्मण, पंचवटींतील श्रीरामदर्शन, अशा एकंदर तीर्थयात्रेंतलाच महाराजांचें दर्शन, हा एक भाग होऊन राहिला. असे श्रावण अखेर पांच महिने लोटून भाद्रपद मासीं सिंहेचा गुरु होऊन सिंहस्थाचें साल सुरू झालें.

हिमालय पर्वतापासून तहत रामेश्वरापर्यंत भरतखंडवासी सर्व हिंदुलोकांत नाशिक त्र्यंबकास जाण्याची चळवळ सुरु झाली. ध्वजारोपणपर्व साधावयास गंगोत्री, हरिद्वार, बद्रिकेदार, काश्मीर, भूतान, नेपाळ, पंजाब, अयोध्या, मथुरा, गोकुळवृंदावन इत्यादि उत्तर भागच्या ठिकठिकाणाहून बहुपंथी, नानायोगधारी अनेक नेमधर्मी अशा श्रीवैभवमंडित तेजःपुंज बैरागी गोसाव्यांचीं मोठमोठीं थेंडें आपआपल्या अनुयायी मेळ्यासह नाशिकास आगाऊ धडकून त्यांचे नानापंथ दर्शक दिव्य झेंडे उभारले जाऊन त्यांचे झेंडे फडकूं लागले. संन्यासी, जोगी, कानफाटे, नानकशाई आदिकरून सर्व-संगपरित्यागी जनांचे समुदाय लोटले. बंभोलानाथ, चटक सीताराम, नारायण अलख, हर गोविंद इत्यादि शद्बांचा ध्वनि जिकडे तिकडे उमटूं लागला. त्याच प्रमाणें आपल्या पापहरणार्थ चाऱ्हीवर्णांचा भरणा चारी दिशांकडून होऊं लागला. पंचवटीच्या पलिकडील तपोवनापासून काळ्या मारुतिपर्यंतचें दीडकोसाचें सर्व खुलें मैदान, पंचवटी, नाशिकांतील सर्व देवळें, मोठमोठ्या धर्मशाळा, मठ आणि उपाध्यायांनीं यजमानासाठीं मोकळें करून ठेविलेले प्रशस्त मजलेदार वाडे व घरें यात्रेकऱ्यांनीं गच्चभरून जाऊन चुटीं पर्यंत खुली ह्मणून जागा राहिली नाहीं. शहरांतील तमाम रस्ते लोकमय होऊन गेले. उत्तेरस सुंदरनारायणापासून दक्षिणेस थेट नावेच्या उताऱ्यापर्यंत श्री गोदावरीचें उभय तीर पुरुषस्त्रियांनीं फुलून जाऊन गजबजून राहिले. अशी यात्रेची धूम उडून एकंदर लोक महाराजांच्या दर्शनोत्तर घामाघूम होऊन त्यांच्या वाड्याबाहेर पडण्याचा एक सारखा क्रम चालू झाला. महाराजांच्या वाड्या बाहेरील सडकेवर पेढे बर्फी, नारळ सुपारी, तुळशी फुलें, कुंकू बुक्का, उदबत्ति कापूर, यांचीं दुकानें बसलीं. बैरागी गोसावी, जोगी, संन्यासी, आदिकरून अठरा पगड

जातींच्या यात्रेकऱ्यां पैकीं हजारों लोक याचकवृत्तिनें आपआपलीं मागणीं करीत असतां कित्येकांस शिरापुरी करितां मैदा घी शक्कर, कोणांस खिचडीकरितां डाळ तांदुळ तूप, वगैरे पक्के शिधे देण्याचें काम वाण्याच्या पांच चार दुकानातून सारखें चाललें. धोतरें व पातळें वांटितांना कापडाचीं ठाणांचीं ठाणें फाटलीं जाऊन दिंडांचीं दिंडें मोकळीं होऊं लागलीं. पावसानें ओलेचिंब होऊन खुडखुडत आलेल्या लोकांस घोंगड्या व छत्र्या वांटणें चाललें. कित्येकांस रेलवेचें भाडें देऊन कित्येकांच्या तीर्थयात्रा महाराजांनीं करून दिल्या. अशा प्रकारें शेंकडोंचें शेंकडों सवाल पुरे करितांना महाराजांचें हवाल काय पुसावे! परंतु तितक्यांसही न किंदरून हुश्श न ह्मणतां "दमधरा, देतों, रागावूं नका." इत्यादि गोड शद्बांनीं सर्वांस थोपवून धरून थोड्याबहुतांत सर्वांच्या वासना पूर्ण कराव्या. अशा वेळीं सार्वभौम राजाची अनंतगंगाजळी (खजिना) ओंजळी एवढी होईल, मग महाराजांची लहानशी बटवी सर्वांच्या हुंड्या कशी पटवील! याचें मोठें आश्चर्य वाटतें. परंतु तें केवळ अज्ञान होय. ज्यानें आपला देह सर्वपरी परोपकारीं वेंचिला. त्याचा श्रीहरि विकला जाऊन कसा सहाकारी होणार नाहीं? "संत उदार उदार भरलें अनंत भांडार." ह्या तुकोबाच्या वाक्याप्रमाणें महाराजांची इच्छारूप कामधेनु सदा दुभती राहिली.

राजेरजवाडे, जाहागीरदार, इनामदार, पिढीजात मोठमोठे गर्भश्रीमान् गृहस्थ आणि पेढीवाले धनाढ्य सावकार व व्यापारी आदिकरून चारी मुलखांतील सारी नरनारी मंडळी महाराजांच्या दरबारीं सकाळ दुपारीं खेटून त्यांची अमोलिक अंघ्रि-धूलिका शिरीं वाहून आपआपल्या नगरीं परत जाऊं लागली. अशाप्रकारें महाराजांच्या निवासमंदिरीं श्रीलक्ष्मीरमणाच्या पूर्ण

कृपेनें लोकांचा नित्य रमणा गाजून कन्यागुरुसंक्रमणाचा योग प्राप्त झाला.

महाराजांच्या दारीं सांजसकाळ चौघडा ऐकूं येऊन मंदिरांत प्रवेश करण्या बरोबर, जिकडे तिकडे लोक कांहीं तरी कामाच्या धांदलींत आहेत; पुढील चौकांतील विहिरीच्या राहाटाचा खडखडाट व मोठमोठ्या भांड्यांचा खणखणाट कानीं पडत आहे; सदां चूल ढणढणाट पेटलेली राहून तिजवर १०।१५ घागरींचा पाण्याचा हांडा सणसणाट उसळून राहिला आहे आणि स्वयंपाक घरांतल्या विस्तवानें नेहमीं धसधसलेल्या चुलीवरून अन्नसिद्धता होत आहे; ओसरीवर केळींचीं पानें कापून अथवा पळसादि करून पानांच्या द्रोण पत्रावळी लावण्यांत कित्येक निमग्न आहेत; कित्येक पुष्पांचे हारगजरे गुंफण्यांत तत्पर आहेत; माडीवर बैठकीच्या बिच्छायतीवर कित्येक शिष्ट भिक्षुक मंडळी व संभावित गृहस्थ लोक बसलेले असून ज्यांच्या दर्शनास गांव गांवच्या लोकांची रीघ लागून, याचक जनांचें ज्यां भोंवतीं चहूंकडे कडें पडलें आहे; इत्यादि प्रकार पाहून पाहणारास प्रथम हें कोण्या मोठ्या राजाचें लग्नच ह्या वाड्यांत येऊन उतरलें आहे कीं काय! असें वाटावें. नवीन नवीन येणाऱ्या पुराणिकांचीं पुराणें, हरिदासांचीं कीर्तनें, गवयांचीं गाणीं आणि नानावाद्य कारांचीं वाजवणीं, यांतून कांहीं नित्य ज्यांच्या मंदिरीं नाहीं' असा एकही दिवस कधीं लोटलाच नाहीं. ब्राह्मणभोजन, विद्वान भिक्षुकांच्या संभावना, गुणिजनांच्या बिदाग्या आणि याचकांस होणारा दान धर्म, हीं ज्यांच्या घरीं अखंड चालूच होतीं. असा नित्य दंगल झडून ज्यांच्या भुवनीं सदां मंगल गाजून राहिलें होतें. अस्तु.

मागें तिसऱ्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें दक्षिण प्रांतीं महाराज इंदुराहून निघून आल्यावर श्रीमन्महाराज तुकोजीराव

होळकर सरकार यांनीं त्यांची दरमहा २०० रुपयांची नेमणुक चालू करून शिवाय आपल्या राषतींचे २ पट्टेवाले, १ हुजऱ्या, १ मशालजी, १ शागीर्द, १ आचारी, १ पाणक्या आणि २ कुणबिणी, अशा ९ मनुष्यांची तैनात त्यांच्या खिजमतीस दिली. शिवाय हैदराबाद, ग्वाल्हेर आणि बडोदें येथूनही समय विशेषीं द्रव्य साह्य होत होतें. या खेरीज जागोजागचे मोठमोठे सावकार महाराजांचे खरे ऋणी असून ते त्यांच्या आज्ञेस सदां तत्पर असल्यानें त्यांस कोणतीही कधीं अडचण पडली नाहीं. त्र्यंबकेश्वरीं माडीवरून पडून कंबरेस इजा झाल्या दिवसापासून म राज जरी शरपंजरीं पडून राहिले होते तरी जगाचा भार आपल्या शिरीं वाहून त्याचा ते सर्व कारभार आपल्या बैठकीच्या गादीवरून करीत होते. त्यांच्या कोणत्याही एका शब्दाबरोबर "जी" ह्मणून तें कार्य तत्काल करण्यास थोरथोर अधिकारी, मोठमोठे श्रीमान् गृहस्थ आणि महा कृपण पुरुष पण तेही मोठ्या आनंदानें तत्पर असत. अशी सर्व स्थिति यथास्थित चालली असतां शके १८०९ चा चैत्रमास उजाडून सर्वजिन्नाम संवत्सर चालू झाला.

त्यावेळीं महाराजांच्या आश्रयास सतत वीस वर्षें असलेले रोजकीर्दीकडील कारकून रा. रा. माधव नारायण देशपांडे हे आपल्या वतनदारीच्या कांहीं कामासाठीं गावीं जाण्यास कांहीं महिन्यांची परवानगी मागूं लागल्यावरून त्यांस महाराज ह्मणाले, माधवराव तुह्मी इतके दिवस संग्रहास आहांत, तेव्हां आतां ७/८ महिन्यासाठीं मला अंतर देऊन जाऊं नका. महाराजांच्या ह्या वचनाबरोबर मंडळीच्या पोटांत एकदम धस्स होऊन, त्यांस त्यांचा मृत्युकाळ अगाऊ कळून आल्याविषयीं सर्वांची खात्री झाली. काळ हा मोठा दुर्निवार आहे! सुष्ट दुष्ट, रंक, राव आणि बालवृद्ध हीं ज्याजवळ आवडनिवड न-

सून ज्याच्या त्याच्या आयुष्यमर्यादेची खरी सवड येतांच जो त्रासरहित आजपर्यंत जगाचा ऱ्हास करीत आला, त्या त्रवतर काळाची दृष्टि सृष्टि नियमास अनुसरून महाराजांकडे या वेळे पासून हळू हळू वळूं लागली, दिवसानुदिवस शक्ति क्षीण होऊन, पायांस बऱ्याच वर्षांपासून असलेली सूज वर मांड्या-पर्यंत धांवली. वायुरोधानें जिव्हा जास्त अडखळून, कोणास कांहीं विचारणें किंवा सांगणें बरोबर होईना. अशा आसन्न-स्थितींतही महाराजांचा नित्यवर्तनक्रम अविबाध सारखा चालून कार्तिकमास प्राप्त होऊन दिपवाळी झाली. तेव्हां महाराजांनीं आपल्याजवळ असलेले संबंधी व सहवासी या सर्वांस कोणी कोठेंही परगांवीं कसेंही काम असल्यास तूर्त जाऊं नये, अशी पूर्ण सूचना दिली. पुढें लवकरच एके दिवशीं महाराजांनीं नारा-यणराव पुतण्याच्या हातून, " भेटीची फार उत्कंठा लागली आहे तरी पत्रदर्शनीं निघून यावे " अशा अर्थाचीं दोन पत्रें लिहवून तीं आबा आणि बळीरामपंत ह्या आपल्या कायम अ-सलेल्या उभयतां कनिष्ठ बंधूंस अनुक्रमें भोसें आणि खरगुण-बत्तीस येथें तावडतोब रवाना करविलीं. कोणत्याही कामाची कधींच मोठीशी जलदी नसतां तेच दिवशीं एकदम पत्रें लिहि-ण्याची इतकी त्वरा झाल्यामुळें पूर्वीं चैत्रमासीं महाराजांच्या बोललेल्या प्रमाणास तें जास्त दृढीकरण होऊन घरांतील सर्व मंडळी चपापून गेली.

पूर्वीं पत्र गेल्याप्रमाणें महाराजांचे बंधु आबा हे भोंशाहून निघून नाशिक येथें मार्गशीर्ष शुद्ध ११ रोजीं येऊन दाखल झाले. परस्पर बंधूंच्या भेटीं प्रेमानंदानें होऊन महाराजांनीं त्याच रात्रीं नवीन आलेल्या कोण्या सातारकर हरदासाचें मोठ्या थाटानें कीर्तन करविलें. पुढें शुद्ध १४ पासून महारा-जांची प्रकृति ज्वरविकृतीनें बिघडली. वैद्याचे परिक्षेंत चिकि-

त्सा होऊन तो विषमज्वर असल्याची सिद्धता ठरली. त्यावरून महाराजांच्या बिछान्यासभोंवती वायुप्रतिबंधनार्थ मोठ्या घेराचा पडदा दिला होता. अशा दुखण्याच्या स्थितींतही त्यांच्या दर्शनास लोक यथाक्रम येतच असून, शिवाय त्यांच्या ह्या दुखण्याच्या वदंतेनें गांवगांवचेही पुष्कळ लोक लोटून फारच गर्दी होऊं लागली. त्यांचे निवारण आश्रितमंडळी करीत असतां, महाराजांनीं "कोणास अगदीं मनाई न करितां सर्वांस नेहमींप्रमाणें आंत येऊं देतजा." असें त्यांस वरचेवर कळवीत असावें. सर्वांस दर्शन घडावें, ह्मणून त्या अंधेरांत सतत मेणबत्यांचा प्रकाश महाराजांनीं राखविला होता. त्या ज्वरांत पहिल्या दिवसापासून अन्नद्वेष झाल्यामुळें कांहींच न खातां महाराज फक्त गंगोदकपान करून राहिले होते. स्मृतिबरोबर असून बोलणें हळु हळु होत होतें "संन्यास घेण्याचें मनांत असल्यास कळवावें" असें बंधु व त्यांच्या ठिकाणीं रत असलेली ग्रामस्थ शिष्ट महाजन मंडळी विचारीत असतां महाराज म्हणाले चतुर्थाश्रमानें पुनर्जन्म घडत नाहीं, त्या अर्थी त्याची मला इच्छा नाहीं. अशा स्थितींत मार्गशीर्ष कृष्ण १० उगवली.

## महाराजांचें परलोकनिर्याण.

आंगीं ज्वराची तगमग, पोटांत अन्नाचा लवलेश नाहीं, येणें करून दिवसानुदिवस शरीरीं अधिकाधिक ग्लानि येत जाऊन अति क्षीणतेमुळें त्या कृष्ण दशमीच्या दिवशीं बोलणें वर्ज्य होऊन सर्वकाम खुणांनीं चाललें होतें. त्यांच्या त्या दिवसाच्या एकंदर स्थितिलक्षणांवरून केव्हां काय परिणाम होईल, ह्याचा भरंवसा न वाटून महाराजां भोंवतीं वैद्य आणि थोर थोर ग्रामस्थ मंडळीचा येऊन जाऊन सारखा पहारा होता. जो तनुमनधनेंकरून अखंड परोपकार रत झाला, त्या पुण्यपुरुषास

या समयीं दानधर्माची विशेष आवश्यकता होतीच असें जरी नव्हतें, तरी महाराजांनीं शेंदोनशें ब्राम्हणांस मोठी दक्षणा देऊन त्यांचें तीर्थ ग्रहण केलें. पुढें उत्तर रात्रीं त्रिदोषात्मक प्रकृति घडून आसन्न स्थिती प्राप्त होऊन एकादशी उजाडतां अरुणोदयीं मंडळींनीं महाराजांस माडी वरून खालीं आणून शुद्धासनावर निजविलें. बंधु आबा यांनीं आपल्या मांडीचें महाराजांस उसें देऊन, सगांग श्रीनरहरीचें तीर्थ पाजून मुखांत व कानांत तुळशी घातल्या. समोर ब्राह्मण श्रीभगवत्‌गीता व विष्णुसहस्रनाम यांचे पाठ करीत बसले आहेत; जवळ बंधु, आप्तवर्ग व आश्रित परिचारक मंडळी बसलेली आहे; आसपास सभोंवतीं जनस्थानवासी कित्येक संभावित थोर थोर गृहस्थ आतां हे पाय निरंतर अंतरणार जाणून खिन्न वदन होऊन स्थित आहेत; अशा स्थितींत उजाडून ६ वाजले, तों श्रीहरिभक्तिपरायण, साधु मंडल शिरोभूषण, महामंगल रूप, अत्यंत परोपकारक, अपार कृपा सागर, सकल सद्गुण निधान, श्रीमद्यशवंत राय महाराज यांनीं या मृत्युलोकींचें अवतारकृत्य आटोपून मार्गशीर्ष कृष्ण ११ रविवार शके १८०९ सर्वजिन्नाम संवत्सर ( तारीख १७ माहे डिसेंबर सन १८८७ इ. ) या पुण्यदिवशीं आपल्या वयाचे ७२ वे वर्षी प्रातःकाळीं नाशिक क्षेत्रीं श्री गोदावरीतीरीं स्वकीय मर्त्य देहाचें विसर्जन करून ते श्रीवैकुंठलोकाप्रत गेले.

बंधु, बंधुपरिवार, स्वकीय, आप्त, आश्रित परिचारक यांची ज्या मंदिरांत जागोजाग नित्य प्रभातकाळीं हरिनाम घोषाची टाळी चालून पुण्यश्लोक—भूपावळींच्या प्रातःस्मरामीचा गजर व्हावयाचा, त्या आनंदभुवनांत महाराजांची कुडी प्राणानिराळी होतांच त्या सर्वांची एकदम दुःखाची दीर्घ किंकाळी

फुटून एकच हाहाःकार होऊन गेला ! फार काय सांगावें ! अल्प सहवासानेंही परकामनुष्य मनास वियोगदुःखाचा चरका लाऊन जातो, तर मग ज्यानें पोटच्या मुलाप्रमाणें प्रीतिममतेनें सर्वांचें निरंतर संगोपन केलें, त्यावंधु, पितृव्य—पितामह श्वशुर—धन्याची निष्प्राणता त्यांस कशी दुःसह दुःख देणार नाहीं ! ! " ज्याच्या आश्रयाखालीं सर्व मान मान्यता, प्रतिष्ठा, अलौलिकपणा सर्वत्र होत असे, त्या ठिकाणीं आतां आपणांस कोण विचारणार ! आणि ज्याच्या प्रतिपाळानें सर्व सोय राहून हवी तशी मिजास आजपर्यंत राहिली, त्या आपली सर्व मान्य यथास्थित स्थिति यापुढें कशी चालेल ! " इत्यादि त्यांचे दुःखोद्गार प्रकट होऊं लागले. तत्रापि तीं सर्व उडतीं पांखरें असल्यामुळें थोडक्याच दिवसांत चहूंकडे चार निःशंक उडून जाऊन त्यांच्या उद्योगधंद्यांत त्यांस महाराजांच्या वियोगदुःखाचा लवकरच विसर पडेल, यांत संशय नाहीं. परंतु ज्याच्याशीं जिचें लग्न लागून समजुतीच्या १९ व्या वर्षापासून सतत ५१ वर्षे ज्याच्या पायाशीं जिचा पाय एकसारखा होता; आणि ज्या कल्पतरूच्या पूर्ण छायेखालीं जी निरंतर मग्न राहून कल्पित मनोरथसिद्धि तत्काळ पावत असे; आणि ब्राह्मणभोजन पंक्तींत सढळ हातांनीं वाढीत असतां जी धर्मराजाच्या राजसूय यज्ञांत ब्रह्मसमुदायास तृप्ति देणाऱ्या साक्षात् द्रौपदीप्रमाणें दिसत होती; आणि जी आपल्या दिव्य भाळीं सदा ढळढळीत लाविलेल्या भव्य अशा सौभाग्य कुंकुम तिलकानें सदा मंगल कार्यीं विराजवती होत असे; आणि पतिछंदानुवर्तिनी होत्साती त्या जगत्पित्याच्या बरोबरच जी आपण जगन्माता होऊन सर्वत्र वंदनीया झाली; त्या सुदती सतीची रती प्रतिकूल होऊन पतीच्या पंचत्वामुळें एका क्षणांत या क्षितींत तिची काया मातीमोल होऊन ती सांधी कोंपऱ्याची जन्माची

धन झाली ! ! ! अशा दुर्धर प्रसंगाच्या तिच्या त्या दुर्निवार अक्षय वियोगदुःखाचें वर्णन करण्यास ही माझी लेखणी पुढें सरसावत नसून परभारें त्याची कल्पना करण्याविषयीं तीं वाचकांस सुचवीत आहे. बाई सर्व देहभान नाहींसें होऊन धरणीवर पडली. घरांतील इतर स्त्रियांनीं तीस सांवरून धरून "बाईसाहेब, आजपर्यंत जें काय साधिलें, त्याचा खरा विचार करण्याची हीच वेळ आहे" असें ह्मणत असतां दुःखाचा सुस्कारा टाकून बाई ह्मणाली, विचार तो कसचा. करा तयारी. मी पतिमहाराजांबरोबर सहगमन करणार. असें बोलून तत्काळ आवेशानें उठली. हा बाईचा आविर्भाव व मनाची पूर्ण धांव पाहून कांहीं समंजस मंडळी पुढें सरसावून ह्मणाली, मातोश्री, हा तुह्मीं सती जाण्याचा योजिलेला डाव उत्तम आहे, परंतु या इंग्रजी राज्यांत त्याचें नांव देखील काढितां येत नाहीं; असा कायद्याचा प्रतिबंध आहे. त्यावरून बाई सर्वपरी निरुपाय होऊन दुर्दैवानें तिच्या नशिबाच्या ओघास त्यासमयीं जें काय आलें; त्यासर्वांस ती सादर झाली.

शहरांत लोक नुकतेच निजून उठताहेत; कोणी मुखमार्जन करून गंगास्नानास जात आहेत; कित्येक स्नानविधि आटोपुन गंगेवरून परतले आहेत; कित्येक आपल्या कामधंद्याच्या उद्योगास जाण्याच्या बेतांत आहेत; त्याचप्रमाणें कित्येक नागरिक स्त्रिया दारापुढें सडारांगोळी घालीत आहेत; कित्येक चुलपोतेऱ्याच्या तजविजींत आहेत; कित्येक वेणीफणी उरकून गंगेस आंग धुण्यास जाण्या करितां लुगडीं गवाळीं बांधीत आहेत; जागोजाग विद्यार्थ्यांचें वेदपठण व इंग्रजी भाषाघोष होत आहेत; कित्येक मुलें बुकें पाट्यांच्या धोपट्या बगलेंत मारून, थंडीनें खुडखुडत आपआपल्या शाळांस जात आहेत; अशा त्या सुखशांतसमयास महाराजांचें निर्या-

ण झाल्याची महादुःखदायक वार्ता शहरांत हालोहाल पसरून, जे ते चपापून हातचें काम तसेंच टाकून त्या परम कल्याण व मंगलकारक मूर्तीचें शेवटील दर्शन घेण्याच्या परम उत्कंठेनें त्यांच्या वाड्याकडे धांव घेत सुटले. सरासरी एका घटकेंत अतिशयीत लोकांची रेल लोटून वाड्यांत आणि बाहेरील लांबीच्या रस्त्यांत एकच ठेल होऊन गेली. तेणेंकरून महाराजांच्या कलेवरास अग्निसंस्कारार्थ नेण्याची तयारी करण्यास देखील मोठी अडचण पडली. गर्दीच्या बंदोबस्तार्थ आपल्या शिबंदी व पोलिसांच्या गाठीसह रा० सा० विष्णु रघुनाथ केळकर मामलेदार व फौजदार वगैरे सरकारी अधिकारी येऊन वरचेवर पीछेहाट करीत असतां त्यांस न जुमानून अठरा ज्ञातींचे लोटचे लोट महाराजांच्या पादवंदनार्थ पुनः पुनः लोटूं लागले. जसें तसें महाराजांचे देहास महावस्त्र व पुष्पमाला यांनीं मंडित करून तो अग्निसंस्कारार्थ उचलून चालविला. त्या वेळीं "जय यशवंतराय महाराजकी जय," असा एकदम हजारों लोकांचा एकत्र दीर्घ घोष होऊन सर्व रविवार पेठ दणाणून गेली. महाराजांच्या त्या स्वारी पुढें संत लोकांच्या निरनिराळ्या सपताक दिंड्यांतून टाळ, झांझा, खंजिऱ्या, मृदंग, ढोल या वाद्यांच्या तालगजरावर मोठ्या कडाक्याचीं भजनें चाललीं; वाजंत्र्यांच्या ताफ्या ताफ्यांतून, जोड सनयांच्या भैरवी, बिलावर, तोडी, सारंग या रागरागिण्यांच्या सुस्वर आलाफदारीच्या, चिजांवरून तालयुक्त चौघडे झडूं लागले; पुढें ताशेमर्फे, करणे, तुताऱ्या, शिंगें, टिमक्या, बेन्डबाजे इत्यादि वाद्यांचा मेळ्यामेळ्यानें गजर चालून, सर्वांपुढें पगारावांचून नगारा सरसावून दुमदुम शब्दानें त्यागर्दींत अगारा अगारा प्रत महाराजांची शेवटली वर्दी देत चालला. अशा इतरांच्या प्रसंगास लोक अत्यंत अशुभ व अमंगल समजतात. कोणी दुरून पाहण्यास देखील धजत नाहींत, मग स्पर्शाची तर गोष्टच नको!

पण या महाराजांच्या प्रसंगी तर सर्वच उलट झालें! हजारों लोक त्यांचे स्वारीबरोबर मोठ्या उत्साहानें चालले त्या वेळीं त्या स्वारीचा देखावा अशुभ न वाटतां केवळ मंगलकार्याचीच ही थाटाची मिरवणूक आहे, असें दिसूं लागलें. हलवायांखेरीज शहरांतील इतर सर्व व्यापारउदीम धंद्याचीं दुकानें बंद राहिलीं. स्वारी पुलावरील वाड्यापुढें येत आहे, तों सेजा मर्द भाऊवाणी या बाईनें तितक्या अवकाशांत केळीचें अष्टखांबी मखर बांधून आणून तें माणसें लावून महाराजांवर धरविलें. मार्गांत ही स्वारी चालत असतां त्यांचे देहावर तुळशी व फुलें यांची वृष्टि होऊं लागली. कोणी एक उदार भाव्यानें बऱ्याच रुपयांच्या चवल्या पावल्या आणि शिवाय प्रत्येक सराफानें आपल्या शक्त्यनुरूप ९।१० रुपयांचा खुर्दा महाराजांवर उधळिला. महाराजांवर पेढे बर्फींच्या वृष्टीची तर परम सीमाच झाली! "यापुढें पुनश्च ह्मणून महाराजांचें आपल्याकडे कृपावलोकन होऊन त्यांचा उदार हस्तस्पर्श आपल्यास कालत्रयीं होणार नाहीं. तस्मात् या समयींच आपल्या प्रेमदात्याची एकवार कडकडून शेवटली भेट घ्यावी." अशाच हेतूनें कीं काय, पेढे बर्फी यांनीं हलवायांच्या दुकानांदुकानांतून भराभर खालीं उड्या घेऊन मोठ्या आवेशानें वर उसळून महाराजांच्या अंगसंगास तीं उभयतां पात्र झालीं! फार काय सांगावें! खालीं वेंचणाऱ्या हलक्या प्रतीच्या कित्येक लोकांस त्या मिठाईची ओझींच होऊन गेलीं. अशा प्रकारें ही थाटाची स्वारी स्मशानभूमीस न नेतां श्रीगोदावरीच्या मध्यभागीं पांची देवळें आणि रामकूंड यांच्या दरम्यान सरकार मार्फत योजलेल्या शिलामय योग्यस्थळीं नेली. या प्रसंगी श्रीगोदेवर वार्षिक रामनवमीचे यात्रेपेक्षांही अधिक लोकसमाज जमला होता. मग ती महाराजांची महानिद्रानिमग्न सन्मूर्ति रामकुंडावर एका मोठ्या लांकडी चौरंगावर ठेविली.

इतक्यांत आदितवार पेठेंतील रा. लखुनाना मराठे यांनीं घरीं शिल्लक असलेला, १ मण मैलागिरी चंदन आणि आनंदी तांबोळीण या बाईनें १० मण उंची चंदन महाराजांच्या दहनक्रियेस चितास्थानीं आणून अर्पण केला. त्या प्रमाणेंच तेथें चंदन, कापूर, गुगुळ, ऊद, नारळ या दाह्य पदार्थ विक्रीच्या बसलेल्या दूकानांतून जो तो लहान मोठें चंदनाचें खोड वगैरे विकत घेऊन तेथें आणून टाकूं लागला. अशा रीतीनें एकंदर सव्वाखंडी चंदन १ मण कापूर १ मण ऊद व गुगुळ आणि तुळशीचीं काष्ठें वगैरे अर्ध्या घटकेंत जमून ! आणखीहि लागे ल तो चंदन पुरविण्यास जो तो उभाच असल्यानें त्या ठिकाणीं प्रवेश करण्यास शुभांस मुळींच मुभा न मिळतां त्या चंदनादि सौगंधिक द्रव्यानें चिता रचणें चाललें. इकडे त्या चौरंगावर महाराजांच्या पादयुगुलीं आपलीं मस्तकें ठेऊन, जो तो कृतार्थ होऊं लागला. ह्या अवसरांत, ज्याच्या नांवची नाशीक येथें प्रसिद्ध तालीम असून तिचा जो वस्ताद आणि म्युनसीपालिटींतील क्लार्क, व ज्यानें आपल्या तालीमबाजपणाच्या ऐटींत नाशीक येथें ४ वर्षांत महाराजांचें कधीं दर्शन घेतलें नसून त्यांस जो साधारण मनुष्याप्रमाणें लेखित असे, असा जो कानकुब्ज ब्राह्मण रा. रा. मोहनमास्तर तें दिवशीं सहज ती मौज पाहण्यासाठीं ह्मणून रामकुंडावर आपल्या बळवंतराव चापेकर नावाच्या मित्राबरोबर आला. तें महाराजांचें चाललेलें पादवंदन; चितास्थानीं तो पडलेला खंडोगणती चंदन आणि ज्या भोंवतीं वाळवंटांत नानाधर्मी लोकांचें ऐक्यबंधन होऊन त्यांचें महाराजांच्या गुणानुवादाविषयीं तें चाललेलें प्रेमस्फुंदन; इत्यादि मनास थक्क करून तत्काळ उपरति देणारा तो अपूर्व देखावा पाहून मोहन मास्तरची गुंगी उडून जिवास अनुताप होऊन ह्मणाले, अहाहा ! ज्या एका कुडी करितां ७।८ हजार लहान मोठ्या लोकांची

तहान भूक हरून इतकी उडी पडली आहे, त्या महान् पुरुषाच्या दर्शनसंयोगास मी बुडी देऊन आजपर्यंत अंतरलों, तस्मात् मजसारखा भाग्यहीन दुसरा कोणीच नाहीं. असो. "झालें तें गेलें, परंतु आतां तरी शेवटची ही पायधूळ माझें समूळ अज्ञान झाडो." असें ह्मणून मोहनमास्तर यांनीं अनन्य भावानें महाराजांच्या पायीं आपलें डोकें ठेविलें. ललाटीं तो पादस्पर्श होतांच मनाची सर्व भ्रांति फिटून जीवास परम विश्रांति वाटून पुन्हां ते आपल्याशीं ह्मणाले, आजपासून नाच, बैठक, तमाशा सोडून महाराजांच्या भावी होणाऱ्या एखाद्या स्मारक कृत्याकडे आणि त्यांच्या सांवत्सरिक उत्साहाच्या कामीं हा देह व मिळेल तें द्रव्य लावावयाचें. अशा भाषणानें त्यांनीं महाराजांचे पायीं हात ठेऊन शपथ घेतली. असो. पुढें महाराजांस रामकुंडांत नेऊन निष्प्रतिबंध स्नान घालीत असतां, त्यांच्या ओघाखालीं हजारों लोकांच्या एकदम उड्या पडून व कित्येक दंपत्यें गंगेंतशिरून, अवभृत स्नानातुल्य न्हाऊन सर्वांनीं महाराजांचें पादतीर्थ ग्रहण केलें. पुढें तो पुण्य देह चितेवर ठेवून चंदन कर्पुरादि सौगंधिक द्रव्यांनीं आच्छादित असतां तें शेवटचें मुखदर्शन घेऊन लोक ह्मणूं लागले, हरहर ! या लक्षाच्या पालनवाल्याची आतां रक्षा होणार काय ! ही सन्मूर्ती आतां पुन्हा लक्षावयास कोठून मिळणार ! असा शांतचित्त, दयायुक्त महादाता या भूमंडळीं पाहतां दात्यांच्या मंडळींतही आढळून येणार नाहीं ! असो. पुढें बंधू आबा यांच्या हस्तें चितेस मंत्राग्नि देणें होऊन हां हां ह्मणतां थोड्या अवकाशांत त्या क्रव्यादाग्नीची ज्वाला आकाशांत लोटली, तरीही चंदनाचीं खोडें व नारळ चितेंत आणून टाकणें लोकांचें चाललेंच होतें. तो चिताधूम वाऱ्या सरसा धूम चोहोंकडे लोटून नाशिक पंचवटी मधील सर्व गंगातटाक सुगंधमय होऊन

गेलें. पुढें कपाळमोक्ष होतांच मंडळी चोहोंकडे फुटून गंगास्नान करून घरोघर गेली. चितेच्या संरक्षणार्थ पोलिसचा पाहरा बसवून शेंपन्नास पुढारी मंडळी येऊन जाऊन बसलीच होती. ही पुरुषांची गर्दी मोडल्यानंतर तिसऱ्या प्रहरीं तमाम नगरवासिनी स्त्रियांची महाराजांच्या चितादर्शनास रांग लागून, ज्यांनीं त्यांनीं चंदनांचीं खोडें व नारळ चितेंत आणून टाकून नमस्कार प्रदक्षणा घालून घरीं जावें. असा एकसारखा क्रम अस्तमान होऊन अंधार पडेपर्यंत चालला होता. त्या समयीं तेथें जोगळेकर, मुठे, वाड, हडपसरकर, सबरजिस्टर, बिवलकर, चांदवडकर, परभूणें, झामरे शास्त्रीप्रभृति महाराज भक्तिपरायण पुढारी मंडळी महाराजांचें सर्व उत्तरकार्य थाटानें तडीस लावण्या विषयींचा कांहीं विचार करीत असतां तेथें मोहन मास्तर येऊन त्यांनीं महाराजांच्या पादुका स्थापन करण्याविषयींचा आपला हेतु त्या सर्वांस दर्शविला. मंडळीनें फार बरें आहे. आमचे कडून या कामीं कांहीं मनाई नाहीं." असें ह्मटल्यावर मोहन मास्तर फिरून ह्मणाले, "कांहीं मनाई नाहीं" असे आज तुह्मी सर्वजण ह्मणतां, परंतु उद्यां कदाचित् कोणी एखादा श्रीमान् गृहस्थ येऊन तो या ठिकाणीं महाराजांची मोठी छत्री बांधण्यास व तींत त्यांच्या रत्नजडितसुवर्ण पादुका स्थापन करण्यासही उभा राहील, तथापि पादुका स्थापण्याच्या माझ्या हक्कास बिलकूल धक्का न बसतां, त्या छत्रींत माझ्या हातचा तो शिक्का कायम राहण्याविषयीं मंडळी मला पक्का भरंवसा देत असल्यास, माझ्या मनानें जें काय करणें योजिलें आहे, तें मी शक्त्यनुसार करण्यास तयार आहें. मंडळीस ती गोष्ट कर्तव्यच होती, तशांतून अशा सत्कृत्याकडे जो कधींच न वळणारा तो मोहन मास्तर अनायासें आपण होऊन, मोठ्या ऊभारणीनें

त्या कामीं सरसावत आहे, त्या अर्थी ही ईश्वरी प्रेरणाच जाणून मंडळीनें तत्काल त्यास तसें वचन दिलें.

मग काय? लागली मोहन मास्तरची तब्बेत, केला दिवे लावण्याचा बेत; बांधली कंबर, तों धांवले शिष्य शंभर; आणिले वेळु पेळु पंत्या तेल, चिराखदान बांधण्याची झाली ठेल; हातो हातीं झाल्या वाती; मग त्याच पावलीं, सभोंवतीं हजार पंती लावली; झाली रोषणाईची बहार, तों आला अर्कांचा सुमार; मग घाइतल्या घाईंत घातली त्या खडकावर बिछाईत; अशी सर्व तयारी होत आहे, तों पंचवटींतील हरिभक्तिपरायण गणेशशास्त्री पेठे हे हरदास पाचारणाप्रमाणें कीर्तनासाठीं तेथें येऊन थडकले. तंबुरी पखवाज लागून कीर्तन सुरू झालें. शास्त्रिबोवा आधींच तोंडचे फटकळ, त्यांत समोर मंडळी पुष्कळ पाहून प्रथम त्यांनीं मनुष्याच्या सर्व खटपटी व अहंपणा निष्फळ आहे, असा वेदांत विषय प्रतिपादन करून मग महाराजांच्या गुणकर्तृत्वमहिम्याची चर्चा चालविली. मधून मधून टाळी देऊन त्यांच्या नांवाचा दीर्घजयघोष मंडळीकडून करवावा. अशा प्रकारें मोठ्या थाटाची तीन वाजेपावेतों कथा होऊन मंडळी उठली. महाराजांचा हा पहिला उत्तर दिवस मोठ्या समारंभाचा जाऊन दुसरा दिवस उगवला.

# प्रकरण सातवें.

॥ श्लोक ॥ ( अमृतध्वनी )

ज्याची जशी सुकृति, त्याला तसें सुफळ लाभावयास उफळें । चित्तीं विचार कर, येतील कां अमृतवल्लीस तीं कटु फळें ॥ ज्याच्या चिताभुवनिं चाले गृहाहुनिहि उत्साह नित्य सरसा ॥ तें वंद्य केसरिस कल्याणसद्म यशवंतांघ्रिपद्म शिरसा ॥ १ ॥

## महाराजांचा उत्तरकार्य समारंभ.

येथपर्यंत ह्या कथानाटकांतील मुख्य नायक यशवंतराव महाराज ह्यांच्या जनम-स्थिति-निधना विषयींचा पूर्ण इतिहास सांगून ग्रंथकर्त्याचें खरें काम आटोपलें. परंतु ज्याच्या दर्शन संभाषण समागमासाठीं आज तीन तपें ( ३६ वर्षे ) सर्व भरतभूमि हादरून जाऊन लक्षावधि लोक मोठ्या उत्कंठेनें ज्याकडे धांव घेऊन नांव गात येत असत आणि ज्याच्या नांवाचा जयघोष लहान लहान मुलांच्या खेळांतही वारंवार सर्वत्र होत असावा; अशा त्या भाग्यसंपन्न पुण्यात्मा जगद्गुरूच्या पश्चात् प्रथमचा दिवस जरी त्याच्या अस्तित्वाप्रमाणेंच सर्व थाटाचा निभला, तरी पुढें "तेरड्याचा रंग तीन दिवस" ह्या ह्मणाप्रमाणें त्या थाटाचा रंग पुढें फिका पडून, त्याच्या नांवाचा शिक्का मोडून, त्यास एकदम धुका लागला कीं काय? अथवा पुढें कांहीं विशेष गोष्टी घडून येऊन त्याचें नांव चिरकाल जगांत कायम राहण्यास त्याच्या संबंधानें लोकांत कांहीं हालचाल चालू आहे कीं नाहीं? आणि त्याच्या-

मागें त्याच्या गृहकुटुंबिनीची काय व्यस्था लागली! हें पाहून त्याविषयीं आपला अभिप्राय प्रकट करणें हें ग्रंथकर्त्याचें कर्तव्य जाणून थोडक्यांत त्याचें विवेचन करीत आहें.

महाराजांच्या उत्तरकार्याचा दुसरा दिवस उजाडून चितारक्षा रक्षणार्थ पोलीसचा पहारा असून त्या खडकावर पुढारी मंडळी बसलेली आहे, अशा समयास सकाळीं सात वाजतां दोन सुतारमेस्त्री, दहावीस मजूर आणि तालमींतील पांच पंचवीस शिष्य ह्यां सहवर्तमान बल्या, वांसे, बांबू, कनाती, जाजमें, दोरण्या वगैरे सामान घेऊन मोहनमास्तर तेथें दाखल झाले. मग लागलींच त्यांनीं जागा आंखून घेऊन महाराजांच्या दहन स्थानावर मंडप घालण्याची सुरुवात केली. जेथें शंभरांचा हात लागला, तें काम पुरे होण्यास अवकाश तो किती? शें सवाशें मंडळी बसण्या सारखा पूर्व पश्चिम लांबीचा एक द्वारी सुंदर प्रशस्त मंडप उभारणें होऊन दुपारपर्यंत वरील छत, झालर, हांड्या, झुंबर, वालशेटसह तो पूर्ण तयार झाला. पुढें तिसऱ्या प्रहरीं ग्रामस्थ व परग्रामस्थ पुरुष, स्त्रिया, मुलें महाराजांच्या स्थानदर्शनास येऊं लागलीं. आणि नमस्कार करून प्रत्येक जण ती चितारक्षा, सर्व व्याधि दूर करून कल्याण करणारा पवित्र अंगारा समजून, आपल्या ललाटीं लावून थोडी तोंडांत टाकून प्रदक्षणा घालून ती रक्षा मूठ पसा उचलून पुड्या बांधून नेऊं लागले. असा संध्याकाळपर्यंत क्रम चालल्यामुळें तथील बहुतेक रक्षा खलास झाली. अस्तमान होतांच मोहन मास्तरांकडून मंडपांत मेणबत्यांची रोषनाई होऊन झुंबर वालशेटसह पंचवीस तीस हांडी चमकूं लागली. वाजंत्र्यांच्या सुस्वर बाजावर चौघडा झडूं लागला. पुढें दहा वाजतां मंडळी जमून अघल्या रात्रींप्रमाणेंच पेठेशास्त्रिबुवा यांचें कीर्तन झालें. तिसरें दिवशीं सकाळीं रक्षा सावडणें होऊन महाराजांच्या अस्थि य-

थामंत्र रामकुंडांतील अस्थिविलय-तीर्थांत सोडून, त्या दहनस्थानीं मोहन मास्तरानीं लागलींच तुर्तातूर्त लहनसा चिरेबंदी चबुतरा बांधवून महाराजांच्या पादुका चालू कामापुरत्या स्थापन केल्या. त्यांची पूजा करून चबुतरा सुवासिक पुष्पांनीं डवरवून नंदादीप स्थापिला. दर्शनास येणारे लोक पादुकांपुढें जें द्रव्य ठेवीत, त्याजवर गोसावी बैराग्यादि अतिथींस व अपंग जनांस शिधे देणें चालविलें.

इकडे महाराजांच्या पुढारी निःसीम भक्तमंडळींत, त्यांच्या संबंधानें अन्नसमाराधनेचा विचार चालू झाला. नाशिक येथें सर्व ज्ञातींस भोजन द्यावें, असा पूर्वीं एकदोन वेळां महाराजांचा उद्गार निघाला होता. त्यावरून मोठा अन्नकोट करून सर्व ज्ञातींस मुक्तद्वार भोजन द्यावें, अशा इराद्यानें मंडळींनीं शहरांत सार्वजानिक भिक्षा सुरू केली. लोकांवर या भिक्षेचा शब्द टाकण्याचा मात्र अवकाश, तों जो तो आनंदानें स्वशक्त्युनुरूप कांहीं कांकूं न करितां द्रव्य साह्य देत चालला. जहागीरदार थोर थोर संभावित गृहस्थ, तमाम नौकर लोक, आदिकरून ब्राह्मण मंडळींत यादी होऊन, आणि ( खाटीक खेरीजकरून ) अवंतर अठरा ज्ञातींच्या समुच्चय वर्गण्या पंचामार्फत जमा हो-ऊन, एकंदर सुमारें पंधराशें रुपये पर्यंत रकम महाराजांच्या कार्यानिमित्त जमा झाली. शिवाय गांवांतून घरघरून थोडे थोडे करितां निवडक डाळ, तांदुळ, गहूं यांच्या राशीच्या राशी महाराजांच्या मंडपद्वारीं जमल्या. ही वार्ता दूरवर हा-लोहाल पसरून गांवांगांवांहून धान्याचीं पोतीं गुळाच्या भेल्या, आणि घरघराऊ तुपाचीं भांडीं व डबे लोटत चालले. हाच धान्य तूप गूळ वगैरेचा अर्ध्यावर पुरवठा लोकांकडून होऊन मंडळी कडूनही जमलेल्या वर्गणींतून बेबुदीच्या सर्व सामानाची खरेदी झाली अशा प्रकारें वीस हजार पात्रांपुरत्या शिरापुरी

भोजनाच्या सामानाची महाराजांच्या दहा दिवसांत पूर्ण तयारी झाली. पुढें आसपासच्या बागायती गांवांहून पाले-भाज्या व फळभाज्या येऊं लागून व तशाच मंडळी कडूनही विकत घेणें होऊन दोन दिवसांत त्यांचे ढीगचे ढीग पडले.

## उत्तरकार्यविधि.

इकडे महाराजांच्या निर्याणानंतर तिसरे दिवशीं त्यांचे कनिष्ठ बंधू बळीरामदादा हे खरगुणाहून आणि पांचवे दिवशीं पुतणे पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्याचे मामलेदार अनंत आबाजी हे येऊन दाखल झाले. महाराजांचे १३ दिवसां पर्यंतचें सर्व क्रियाकर्मांतर कनिष्ठबंधु आबा यांचे हातें सर्व दानधर्मासह यथासांगपणें झालें. एकंदर उत्तरकार्यानिमित्य १००० रुपये खर्च लागला, असें समजतें.

इकडे पादुकोत्साह मंडपांत बारा दिवस पर्यंत नित्य सकाळ संध्याकाळ चौघडा, पादुकापूजन, पुष्पांचा व अगरबत्यांचा घमघमाट, रोषणाई, दर्शनास लोकांची गर्दी, गवई व वाद्यकार यांचीं गाणीं, साधुसंतांचीं भजनें, हरदासाचें कीर्तन, आदीकरून सारखा थाट चालून अहोरात्रींत शेंपन्नास मनुष्य त्या मंडपांत नाहीं अशी कोणतीच घटका आढळून येईना. महाराजांचे तेरावे दिवशीं शुक्रवारीं अस्तमानीं त्यांच्या पादुकामिरवणूकीचा छबीना काढावा, असा महाराजांचे पुढारी भाविक मंडळीचा दोन चार दिवसांपासून विचार चालला होता. परंतु पालखीचा मेळ कोठें बसेना ह्मणून मंडळी मोठ्या विवंचनेंत पडली. परंतु ज्या महात्म्या पुरुषाची कधींच कोठें कांहीं न्यूनता पडली नाहीं, त्याची एवढीच उणींव परमेश्वर कसा पडूं देईल ? काय चमत्कार पहा ! ध्यानीं मनीं व स्वप्नींही नसून त्याच दिवशीं प्रा-

तःकाळीं मंडळी मंडपाबाहेर खडकावर बसली असून " आतां पालखीचें काय करावें ? " अशा चिंतेंत असतां समोरून एक पालखी मंडपाकडे येत असल्याचें दृष्टीस पडून मंडळीं आश्चर्यभरित झाली. इतक्यांत भोयांनीं ती पालखी मंडपद्वारीं आणून थडकविली तिचा मालक बरोबर असून त्यानें मंडळीस राम राम करून विनंती केली कीं, महाराजांच्या दरबारांत खप होईल जाणून ही पालखी सांवतवाडीहून मुद्दाम घेऊन तावडतोब येथें हा मी तसाच आलों आहें. हिची किंमत अडीचशें रुपये आहे, इतक्यावर मंडळी जें देईल त्यांत महाराजांचें कार्य जाणून माझा संतोष आहे. ती रेशमी आणि जरतारी गोंडे बिछाईत वगैरे सर्व सरंजामानें सज्ज नवी करकरीत अवचित आलेली पालखी पाहून मंडळीनें ती महाराजांचे मालकीसाठीं एकशें पांसष्ट रुपयांस ठरवून घेतली. आणि लागलीच तितकी रक्कम आपसांत वसूल करून पालखीवाल्याच्या पदरांत घातली.

### थाटाचा छबीना.

मनोदयानुरूप पालखी मिळाल्याचा आनंद होऊन सर्व तयारी करून मंडळीनें सायंकाळीं त्या पालखींत महाराजांच्या पादुका घालून मोठ्या थाटाची शहरांतून दिंडी काढिली. पालखीपुढें विणे, चिपळ्या, टाळ, झांजा, मृदंग, ढोल, यांच्या नादतालावर साधुसंतांच्या मेळ्यामेळ्यांतून गजरांचीं भजनें चालू आहेत; यापुढें बाजंत्र्यांच्या ताफ्याताफ्यांतून वेळे वेळेच्या निरनिराळ्या रागदारीवर सनयांच्या जोडांतून मधुर आलापदारीच्या ताना चालून त्यावर चौघडे झडताहेत; त्या पुढें नौबत व नगारे दुमदुमून राहिले आहेत; मशाली, हिलाल आणि शिड्यांचीं चिराखदानें यांच्या उज्वलित प्रकाशानें सर्व रस्ता लांबवर लखलखाटून जात आहे; त्या छबीन्याची मौज पाहणाऱ्या हजारों लोकांची रस्त्यारस्त्यांतून एकच गर्दी झाली आहे; हद्दीहद्दीच्या

दुतर्फा घरांच्या माड्यांच्या खिडक्यासज्जांतून शेंकडों स्त्रीपुरुषांचीं जोडपीं आपापल्या परिवारांसह ती मौज पाहण्यास उभीं आहेत; नगाऱ्यांपुढें हाताहाताच्या अंतरावर नळे आणि निरनिराळ्या रंगांच्या चंद्रजोती सुटून पाहणाऱ्यांस क्षणोक्षणीं निरनिराळा आनंद देत आहेत; मधून मधून चित्रविचित्र दारूचीं मनास आल्हाद व थक्कता देणारीं झाडें सुटत आहेत; ( त्या रोषणाईचा व आतषबाजीचा दोनशें रुपये पर्यंतचा सर्व खर्च नाशिक येथील हिंदुजातीच्या खाटीक लोकांनीं केला. ) अशारीतीनें छबीन्याची मिरवणूक होऊन पालखी रात्रीं बारांवर दोन वाजतां पुन्हा पादुकामंडपांत जाऊन पोहोंचली.

## ब्राह्मण भोजन.

चौदावे दिवशीं शनिवारीं महाराजांच्या संबंधानें पंचवटींतील श्रीराममंदिरांत मोठें ब्राह्मणसंतर्पण झालें. शिरापुरीचा उत्तम बेत असून तीनहजारांवर पात्र झालें. खेरीज एकंदर रमण्यांत न येण्यासारख्या शास्त्री वैदिक अग्निहोत्र्यादि विप्रसमुदायास घरोघर शिधे पोहोंचते केले.

## जंगी अन्नकोट.

रविवारीं अठरा ज्ञातीस महाराजांच्या प्रसादाचा मुक्तद्वार भंडारा असल्याविषयींचा शहरांत अगाऊ दोन दिवस दांडोरा पिटला जाऊन त्या अन्नकोटाचे तयारीस महाराजांची पुढारी मोठमोठी मंडळी सरसावून कांचा मारून उभी राहिली. पाकनिष्पत्तीसाठीं गोदातीरस्थ श्रीगोऱ्यारामा नजीकच्या उत्तर भागच्या प्रशस्त वाळवंटाची योजना करून त्याच्या मर्यादेस अनेक द्वारी कनाती चिणून वर चांदण्या ताणल्या. शनिवारच्या अस्तमानीं आहाळचर खणून चुली तयार झाल्या; लांकडांचे खंडोगणती गठ्ठे येऊन पडले, स्वयंपाकाची व पाण्याची वगैरे लहान मोठीं सर्वप्रकारचीं तिहेरी संजोगाचीं भांडीं येऊन थड-

कलीं; आसपास गांवच्या व शहरच्या दीड दोनशें बायकांच्या विळ्या ठेपून पाले फळ भाज्या चिरणें होऊन त्या सर्व शाखांचा एकत्र चार घटिकांत मोठा गंज पडला; व त्याप्रमाणेंच शेंकडों भेल्या चिरून शिऱ्याचा गूळ तयार झाला, तेल तिखट मीठ व भाजी-आमटीच्या मसाल्याचीं भरलेलीं सर्व पात्रें येऊन ठेपलीं; स्वयंपाकांत लागणाऱ्या पत्रावळींचे पुडे आणि दुरड्या पांट्या आदिकरून बुरडी सामान येऊन पडलें; निर्डोळ आणि सडीक अशा डाळतांदुळांची आणि तशींच शिऱ्याच्या गरगरीत कण-केचीं भरलेलीं पोतींचीं पोतीं दाखल झालीं, इत्यादि तयारींत शनिवारची रात्र लोटून रविवार फटफटला अहाळ व चुली अग्नीनें धडधडून ब्राह्मण मंडळीचीं स्नानें होऊन पाकनिष्पत्तीस आरंभ झाला. यासमयीं महाराजांची पुण्याई व पुढारी मंडळींचें त्यांच्या ठिकाणीं अस-लेलें खरें प्रेम, ह्या दोन्ही गोष्टी स्पष्ट दिसून आल्या. गंगेंत स्नान करून कड्या लाविलेले वाळ्याचे टुमदार तांबे भरून घरीं जातांना ज्यांचे हातास रग लागावयाची, अशा नाजुक गृहस्थांच्या खांद्यांवरून गंगोदकाच्या घागरी दिसूं लागल्या. पावणेतीन हात रुंदीचीं रेशीमकांठी धोत्रें नेसून, अंगावर नाग-पुरी महेश्वर्यादि नाजुक उपरणी वापरणारे, व हातांत पोंच्या सलकडीं, जोडवीं, मुद्या आणि गळ्यांत गोफ व कंठ्या धारण करणारे; असे मोठमोठे श्रीमान् व संभावित गृहस्थ, त्या समयीं ढुंगणास लहानसे बुधवारी पंचे गुंडाळून गळ्यांत यज्ञोपवितांच्या उपवीतिरूप कंठ्या करून हातांत मोठमोठे पळे व खांद्यावर सोधणीं वाहून स्वयंपाकांत घामाघूम होऊन गेले आहेत. अहा-हा! काय तो देखावा या मुखानें गावा! सर्व शाख, आमटी, वरण, भात, शिरापुरी, सिद्ध होऊन अकरा वाजल्यापासून ज्ञातीज्ञातीच्या पाहुण्या रावळ्यांसह स्त्री पुरुषांच्या पंक्ति बस-

ण्यास सुरवात झाली. एकामागूनएक भाताचीं मोठमोठीं भांडीं चुलीवरून खालीं उतरूं लागलीं. पुऱ्या तयार होऊन वरचेवर त्यांचे ढीग पडूं लागले. हा काळ पावेतों सभोंतालच्या गांवगन्नाहून भाविक जनांकडून ५, ७, १० शेर सद्यस्तप्त घृताचीं एकामागून येत असलेलीं भांडीं शिऱ्याच्या कढयांत उपडीं होऊन रिकामीं होऊं लागलीं. अशा वेळीं तांदूळ, कणीक, गूळ तूप वगैरेचें माप व वजन कोठून राहणार ! प्रत्येक जातीचा समाज श्रीगोदेच्या उभयतीरीं वाळवंट, खडक आणि पटांगणें यांवरून वेगवेगळे ठिकाणीं जेवावयास बसला होता. नेमून दिलेल्या मर्यादेपर्यंत जातीजातीच्या पुढारी लोकांनीं पराती, पातेलीं वगैरे मोठमोठीं भांडीं घेऊन येतांच, त्यांच्या त्यांच्या भांड्यांतून त्यांस लागेल तितकें अन्न, मध्यंतरीं ठेविलेल्या ब्राह्मण वाढप्यांनीं द्यावें आणि त्या जातिवाल्यांनीं आपापल्या जातीच्या पंक्तीस यथेच्छ वाढावें, असा बेत ठेविला होता. या प्रमाणें रात्रीचे अकरा वाजेपर्यंत क्रम चालून अतिशूद्र व यवनासुद्धां सर्व जाति महाराजांचा प्रसाद यथेष्ट सेवन करून तृप्त झाल्या. सर्व पदार्थ फारच रुचिकर व सुस्वादु झाले होते. व त्यांचा घमघमाट फार दूरवर चालला होता. या दिवशीं नाशिक पंचवटी व गांवगांवचे मिळून पंधराहजारांवर पात्र झालें, असा अंदाज आहे. शिवाय महाराजांचा प्रसाद ह्मणून लोकांनीं घरोघर शिरा नेला तो निराळाच. अशा प्रकारचा मुक्तद्वार अन्नकोट ( भंडारा ) या जनस्थान क्षेत्रीं झालेला कोणी पाहिला तर नाहींच, परंतु पूर्वीं कधीं झाल्याचें ऐकिवांतही नाहीं.

या अन्नकोटाचे दिवशीं गोसावी, बैरागी, तद्देशीय, व नेमाडी वगैरे ब्राह्मण, पुरभय्ये, अदिकरून दक्षणी ब्राह्मणांच्या हातचे न जेवणाऱ्या पांथस्थ अतिथिजनास भोजन देण्याकरितां

नाशिक येथील वेदमूर्ति रा० भाऊ बापाजी वैद्य वस्ती डिंगर आळी या भिक्षुक ब्राह्मणानें उदारपणानें पुढें सरसावून पदरच्या दोनशें रुपयेपर्यंत खर्चानें शिरापुरीचे सुमारे पांचशें पक्के शिधे दिले. नाशिकच्या एकंदर ब्राह्मण वस्तींत घेऊ लोक आहेत परंतु देऊ नाहींत, त्यांतून भिक्षुक ह्मणजे त्या कामीं पहिली प्रत. असें असतां वैद्य मजकुर यांनीं मोठ्या उदार मनानें आपली मोहोर बंद थैली खुली करून सर्व अतिथि जनांस यथेच्छ भोजनानें तुष्टि दिली. पैसा पैसा जोडून त्या द्रव्यसंचयाचा प्रसंगीं औदार्यानें धर्म कृत्यांत व्यय करण्यास मागें पुढें न पाहणारे असे भाऊ वैद्यासारखे पुरुष फारच क्वचित आढळून येतात, त्या अर्थी त्या भाऊ वैद्याची धन्य होय!!!

## ललीत व गोपाळकाला.

पुढें १७ वे दिवशीं पौषशु० १२ मंगळवारीं अस्तमानीं पादुका मंडपांत गोपालकाल्याचा मोठा समारंभ झाला. मणभर पोहे २ मण दहीं, मीठ, हिरव्या मिरच्या आणि कोथिंबीर यांची एकत्रता करून मोठमोठीं पातेलीं भरून ठेविलीं. मंडप व गंगातटाक मिळून लोक समाज २ हजारावर होता. कृष्ण व गोपाळांचे नाना खेळ होऊन ८ वाजण्याच्या सुमारास दहींहांडी फुटली पुढें गोपाल काल्याचा प्रसाद सर्वांस वांटून पुष्कळांचे घरोघरीं पाठविण्यांत आला.

अशा प्रकारेंकरून महाराजांच्या उत्तरकार्यासंबंधीं पादुकास्थापनापासून तों गोपालकाल्यापर्यंतचा सर्व उत्साह त्यांच्या पुढारी भाविक मंडळीकडून झालेला सांगितला. आतां महाराजांचें स्मरण या जगास निरंतर असावें या हेतूनें पुढारी लोकांनीं त्या भवतारक पुरुषाचें कांहीं स्मारक करण्याचें मनांत योजून त्या कार्यप्रयत्नास ते लागले, याविषयींचा उल्लेख खालीं करीत आहें.

"ज्या एका मूर्तीकरितां सर्व भरतखंड हालून राहिलें आहे, अशा जगद्गुरु श्रीयशवंतराय महाराजांची हल्लीं वृद्धावस्था असून शरीरीं फारच थकवा आला आहे. यास्तव त्यांच्या डोळ्यां देखतच त्यांच्या सन्मान गौरवार्थ त्यांची कांहीं स्मारकसेवा मंडळीकडून घडावी." असा उद्देश शके १८०८ चे अखेर रा० रा० बळवंतराव नारायण गोखले पुणेकर अकौंटंट निसबत एज्युकेशनल इनस्पेक्टर ईशान्य भाग मुक्काम नाशिक यांणीं सभेंत दर्शविला व त्या गोष्टीस श्री० रा० नारायण काशिनाथ उर्फ तात्यासाहेब जोगळेकर कारभारी संस्थान श्री त्र्यंबकेश्वर, रा० रा० गोपाळ रामचंद्र बिवलकर आणि रा० रा० वामन भाऊ वाड या त्रिवर्गाचें अनुमोदन पडलें. मग मशारनिल्हे त्रिवर्ग गृहस्थांनीं गोखले यांचा तो स्तुत्याशय श्री० रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब विंचुर संस्थानचे चीफ यांस कळविला. तो चीफ यांस पसंत होऊन, त्यांनीं त्या कार्योद्देशानें सार्वजनिक वर्गणी उभारून महाराजांचें जें कुलदैवत त्या श्रीनरहरीचें मंदिर बांधावें, असें ठरवून लागलींच योजना करून त्या कामीं एक लहानशी सभा स्थापून मंडळी नेमिली ती.

१ अध्यक्ष—श्रीमंत रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब विंचूरकर उमदेतुलमुल्क बहादूर सी० एस० आय० स्टार ऑफ इंडिया फर्स्ट क्लास सरदार.

२ उपाध्यक्ष—रा० रा० गोपाळराव रामचंद्र बिवलकर वैद्य नाशिक.

३ चिटणिस—श्रीमंत नरसिंगराव कृष्ण ऊर्फ रावसाहेब विंचूरकर फर्स्टक्लास सरदार व माजिस्ट्रेट.

४ खजिनदार—रा० रा० गणेश रघुनाथ ऊर्फ दाजीसाहेब मुठे साहुकार पंचवटी.



ग्रंथ संग्रह

## सभासद.

१ श्री० रा० रा० नारायण काशिनाथ ऊर्फ तात्यासाहेब जोगळेकर कारभारी संस्थान श्रीत्र्यंबकेश्वर.

२ रावबहादूर श्रीधर गुंडो डि० डे० कलेकटर नाशिक.

३ रा० रा० वामन पांडुरंग वाड नाशिक.

४ रावसाहेब बळवंतराव रावजी पेणसे पेन्शनर मामलेदार नाशिक.

अशा आठ गृहस्थांची सभा नेमली जाऊन महाराजांच्या विद्यमान कालांतच वर्गणी जमा करण्याची तजवीज चालू झाली आणि मंदिरास तशा प्रकारचें मुस्थळ मिळविण्याच्या योजनेस मंडळी लागली. इतक्यांत आपल्या देशाच्या दुर्भाग्यानें ह्मणा किंवा स्वयंप्रकाशित मनुष्याचें स्मारक त्याच्या देखत होणें हें ईश्वराला आवडलें नाहीं ह्मणूनच कीं काय, यशवंतराय महाराज याजला नाशवंत देहाचे बंधनांतून ईश्वरानें निरंतर मुक्त केलें.

## स्मारकास स्थाइक आश्रय.

काय चमत्कार पहा! महाराजांचें निर्याण झालें, तेच दिवशीं परमेश्वराच्या प्रेरणेनें ह्मणा अथवा कसेंही ह्मणा, परंतु रा० रा० रामचंद्र मोरेश्वर वैशंपाय वकील आणि गोविंद मोरेश्वर वै० वस्ती नाशिक ह्या उभयतां बंधूंस स्मारककृत्यास स्थाइक–आश्रय देण्याविषयीं अंतःकरणांत सद्वासना उत्पन्न होऊन त्यांनीं, गंगातटाकीं श्रीउमामहेश्वराचे देवालयाच्या पूर्वेस बोरूची बखळ ह्मणून एक मोठें मुस्तस्किम कोटबंद आवार आहे, त्यापैकीं आपल्या मालकीची सुमारें पांच हजार रुपये किमतीची उत्तरेकडील निमें जागा पूर्व पश्चिम लांब हात ८० आणि दक्षिणोत्तर रुंद हात २९ अशी महाराजांच्या नांवें संकल्पपूर्वक अर्पण करून, पुढें एकदोन दिवसांतच त्या जागेचें बक्षीसपत्र

सभोंवतालचे चिरेबंदी कोटासह सरकारांत नोंदवून तें पुढारी मंडळीच्या स्वाधीन केलें. याचें नांव औदार्य ! ! आणि याचें नांव उदार आश्रय !

## महाराजांच्या समाधीचें स्मारक.

सदरच्या बक्षीस दिलेल्या जागेच्या समोरच पूर्वेस, सुमारें ६० । ७० हातांवर गंगातटाकीं महाराजांस अग्निसंस्कार दिला. त्या ठिकाणीं समाधी बांधून त्यांच्या पादुकांची स्थापना करावी, असें मंडळीच्या मनांत आलें. पण स्मारक संबंधानें जर मंदिर व्हावयाचें आहे, तर दुसरे इमारतीस आश्रय कसा मिळतो, हें मनांत येऊन मंडळीस उद्विग्नता प्राप्त झाली होती, परंतु ईश्वरी चमत्कार व महाराजांचें सबळ पुण्य ह्या दोन गोष्टी अद्भुत! पहा, महाराजांच्या दहा दिवसांतच वऱ्हाड प्रांतांतील दर्यापूर येथील श्री० अन्याबाईसाहेब देशमुखीण ह्या नाशिक येथें यात्रेनिमित्त आलेल्या असून त्यांच्या कानावर ती गोष्ट जातांच त्या महाधर्मशील व भाग्यशालिनी बाईनीं इच्छित स्थळीं, मंडळींनीं ठरविलेल्या परिघाचा घोटींव चिरेबंदी अष्टपैलु चवुतरा बांधण्यास, त्याच्या खर्चाची आकारणी करून ७५० रुपयांची रक्कम लागलीच मंडळीस दिली. चवुतरा तयार झाल्यावर त्याच्या मध्यंतरीं लहानशा घोटींव चिरेबंदी अष्टपैलु सिंहासनावर महाराजांच्या पादुकांची स्थापना मोहन मास्तर यांच्या हातें व्हावयाची ठरलेलें पूर्वी वर सांगितलेंच असून, मास्तर यांणीं संगमरवरी पाषाणाच्या पादुका सुद्धां त्याचसमयीं करून ठेविल्या. चवुतऱ्यावर छत्री ह्मणजे आच्छादन असणें अवश्य पण तीही व्यवस्था लागण्यास प्रभुसत्तेनें मुळींच अवकाश लागला नाहीं.

श्रीमंत तात्यासाहेब जोगळेकर कारभारी संस्थान श्री त्र्यंबकेश्वर यांनीं चवुतऱ्यावर दगडी खांब, मेरापी व बाजूची

पानपटी इतकें काम करून देण्याचें कबूल करून, त्यास लागणाऱ्या खर्चाच्या अजमासानें ७५१ रुपये देऊन आणखींही कांहीं खर्च लागल्यास ती रक्कम देण्याचें पतकरिलें. येथपर्यंत तर सर्व बरोबर व्यवस्था लागली. आतां वरील कळसाचें काम मात्र होणें राहिलें, त्याची व्यवस्था ईश्वर-कृपेनें वर दर्शविलेलें काम पुरें होत नाहीं, तोंच कोणी एकादा दानशूर हरीचा लाल येऊन आपल्या हातून कळस लावण्याचें श्रेय घेईल यांत संशय नाहीं. हें समाधीचें काम पूर्ण झालें ह्मणजे लागलीच समोरील पाटांगणावर पर्जन्यकाळांत काढून ठेवतां येईल असा एक सुबक काढता घालता विस्तीर्ण सागवानी लांकडी मंडप तयार करण्याचा मोहन मास्तराचा विचार व निश्चय होऊन, त्यांनीं त्या मंडपासाठीं लागणारीं लांकडें खरेदी करणेंही चालविलें.

इतका वेळपर्यंत महाराजांच्यामागें महिन्यादीडमहिन्यांत त्यांच्या ज्या ज्या स्मारकगोष्टी घडून आल्या, त्यांचें विवेचन केलें. आतां त्यांच्या पश्चात् त्यांच्या गृहिणीची काय स्थिति घडली, या विचाराची येथेंच आवश्यकता असल्यावरून थोडका वेळ तिकडे वळत आहे.

## सती सुंदराबाई यांचें रूप, स्वभाव, गुण, स्थिती, कर्तृत्वाविषयीं विचार.

यशवंतराय महाराजांच्या पत्नी सौभाग्यवती सुंदराबाई ह्या गौरवर्ण नाकींडोळीं नीटस असून त्या महाराजांपेक्षां थोड्या उंच असत. त्यांचा स्वभाव थोडासा जाज्वल्य व मानी असून त्यांचें दानधर्मी जरा लक्ष्य कमी असे, तथापि आपल्या पतीच्या सत्कार्यास कधीं विपर्यास न आणणारी अशीं ती भार्या होती. माहेरची श्रीमंती व घरची मामलत, तेव्हां चार ठळकसे डागिणे अंगावर असावेत अशी स्त्रीजातिस्वभावानुरूप त्यांस सहजच इच्छा असे. ह्या गोठपाटल्या हातांत दाटल्या, तेव्हां यांत भर

घालून थोड्या सैल केल्या पाहिजेत; ह्या गांठल्यांत आणखी कांहीं पुतळ्या थाटल्या पाहिजेत; ही नथेची जोडी थोडी लहान आहे, सबब दुसरी मोठी घालून ह्या चौफुलीचाही साज दुसरा बसविला पाहिजे; इत्यादि प्रकारची पहिल्या पहिल्यानें त्यांच्या मनाची धांव असे, परंतु पतीच्या महौदार्यामुळें वरचेवर लंकेचें पार्वतीत्व त्यांस प्राप्त होऊं लागलें, त्या सहवासानें विचारांतीं त्यावरकांती डागिण्यांचें पुढें पुढें त्यांस मोठेंसें महत्व न वाटून स्त्रियांचा एक जो ठळक डागिना सौभाग्यकुंकुम, तें आपल्या विशाळ भाळीं मोठें ठळठळीत रेखून लोकांमध्यें त्या शोभूं लागल्या. पतीच्या भलभलत्याच दातृत्वाविषयीं कधीं कधीं त्यांस वाईट वाटावें, परंतु पुढें पुढें तें सर्व आंगवळणी पडून त्याच मिळणीं त्या मिळून गेल्या. खुंट्यांस गवाळीं टांगून तळ देऊन बसलेल्या भोजनभाऊंचा पूर्वी त्यांस त्रास वाटत असे, परंतु पुढें जेव्हां नित्य नित्य नव्यानव्या अतिथींच्या भोजनाच्या पंक्ति दिसावयास लागत चालल्या, तेव्हां त्याच सुंदराबाई आनंदानें पंक्तींतून धौतालपणानें वाढीत असतां श्रीअन्नपूर्णेप्रमाणें वाढूं लागल्या. पोटीं कांहीं संतान नसल्यामुळें आपलें सर्व संसारसुखवैभव कार्यें एक यजमान, असें दिवसानुदिवस त्यांस वाटावयास लागून, जें पतीनें कर्तृत्व तीच आपली इच्छा राखून त्या पतिच्छंदानुवर्तिनी अशा बनून गेल्या.

अशाप्रकारें सुंदराबाई पतितंत्रानुगामिनी होत्साती जावा, पुतण्या, सुना, आप्तस्वकीय, आश्रितजनस्त्रिया आणि परिचारिका, यांशीं निरभिमान व निर्मत्सरभावानें वागून सर्वांस दिवसानुदिवस अधिकाधिक प्रिय झाली. घरांत असलेल्या व नित्य नव्या नव्या येणाऱ्या भिक्षुकादि जनांचा कंटाळा न करितां पतिमनोभावानुरूप त्यांच्या आदरातिथ्यास जी सदां सादर होत गेली. भलत्याच वेळीं घरीं येऊन हाक देणाऱ्या क्षुधित पांथस्थजनांचा

तिरस्कार न करितां उत्साहानें स्वहस्तें पाक करून अथवा करवून त्यासर्वांस अन्नदानानें जी तृप्ती देऊं लागली. भोजनास पतीच्या पंक्तीस बसणाऱ्या मंडळीस पंक्तिप्रपंच न करितां एकसारखें वाढण्याचा जिचा परिपाठ पाहून सर्वांनीं जिची तारिफच करावी. घरांत सर्वांबरोबर आंग मोडून राबून, उद्याच्या तयारीस काय आहे नाहीं ह्याची मिसल लावण्यांत जिचा सारा वेळ मोडत असल्यामुळें कोठें दोनप्रहर रात्रीं जिची पाठ अंथरुणास लागावयाची. पुन्हा पहाटेस लवकर उठण्याची काळजी जीस होतीच. पुढें शिपाई घेऊन मोठ्या थाटानें देवदर्शनास जाण्याचें वारें जिच्या आंगीं मुळींच नसून, उगीच व्रतनेमधर्माचे फवारे न उडवितां पति हेंच कायतें आपलें सर्व देवदेव्हारें समजून, त्याच्या सेवाशुश्रुषेंत जी सदैव निमग्न राहिली. नेसावयास उंचीं लुगडीं आणि लेण्यास पुष्कळसे डागिणे यामध्यें भूषण अथवा हलकींशीं अलवाणी पातळें नेसण्यांत व बुच्या नाककानांनीं फिरण्यांत दूषण, जीस कधीं वाटलें नाहीं. वरी नित्य भागवतादि पुराणें, वेदघोष, कथाकीर्तनें कानीं पडत गेल्यामुळें जिची मती पवित्र होऊन ती निरंतर पुण्यकर्मींच वळून राहिली.

### बाईचें परलोकगमन.

अशा त्या भामिनीचीं चांगल्या समजुतीच्या वयापासून सतत ५० वर्षें मोठ्या सुखवैभवस्थितींत जाऊन, पतिसमागमानें सौभाग्याचें भरपूर भांडार लुटीत असतां पूर्वसंचीत दुर्दैवेंकरून तिजवर वयाचे ६६ वे वर्षीं आकाशाची कुऱ्हाड येऊन पडली. तिच्या सर्व सौभाग्य वैभवसुखानंदाचा प्रकाशदाता पतिरूप जो प्रज्वलित दीप, तो मालवला गेल्यामुळें ती अंधारांत चाचपडत पडून प्राप्त झालेल्या दुर्धर भोक्तृत्वास सादर झाली वगैरे मागें सहाव्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. पुढें त्यागतभर्तृकस्थितींत बाई शोकाकुळ राहून परमेश्वर चिंतनाची जपमाळ

ओढून जशी तशी काळक्रमणा करीत असतां, ईश्वरास तिची करुणा आली ह्मणा अथवा तिचें भोक्तृत्व तितकेंच ह्मणून ह्मणा, माघ कृष्ण १० चे रात्रीं, अकरा वाजतां हवेचा उपद्रव होऊन ती रात्र उजाडतां माघ कृष्ण एकादशी शके १८०९ मंगळवारीं बाई, पतिनिधनाच्या बरोबर दोनमहिन्यांनीं गर्गाचार्यांच्या मुहूर्तानें त्यास भेटण्याकारितां वैकुंठलोकीं गमन करिती झाली.

हेंच बाईचें जाणें जर पतीच्या अगोदर निदान एक दिवस घडलें असतें, तर तिच्या सद्भाग्यास सीमा नव्हती! सर्वत्र वाहवा व धन्यता होऊन सोन्याहून पिंवळें झालें असतें! परंतु त्या होण्यांत मध्यंतरीं "असतें" हा शब्द पडून राहिला यास कोणाचाच उपाय नाहीं!

आतां महाराजांच्या पश्चात् बाईची स्थितिव्यवस्था कशी लागेल, ही जगास उत्पन्न झालेली काळजी, देवानें तिचें गाऱ्हाणें ऐकून दोन महिन्यांतच सर्वपरी मिटविली. तेव्हां त्यासंबंधीं पुढें जास्त विचाराची मुळींच गरज न राहिल्यानें महाराजांच्या स्मारक—गोष्टींच्या पूर्वानुसंधानाकडे थोडका वेळ वळतों.

## महाराजांचें स्मारक.

महाराजांचें स्मारक ह्मणून जे श्री नरहरीचें मंदिर रा. रा. वैशंपायन वकील यांनीं बक्षीस दिलेल्या जागेंत बांधावयाचें, त्या एकंदर कामाकडे नव्वद हजार रुपयेपर्यंत खर्चाचा अजमास झाला आहे. पैकीं पन्नास हजार रुपये श्रींचें मंदिर, त्याजपुढील सभामंडप, बाजूंच्या ओऱ्या, मधील पटांगण, पुढील महाद्वारावरील नगारखाना आणि बाहेरील गंगाद्वाराच्या पायऱ्या मिळून एकंदर इमारतीच्या खर्चाकडे लावावयाचे. देवाची पूजा, नंदादीप, नैवेद्य, देवळाची झाडसारवण व पहारा अखंड चालण्यास पूजारी वगैरे देवस्थानच्या नेमणुकी खर्चा-

साठीं दरमहा तीस ह्मणजे सालीना ३६० रुपये निरंतर उत्पन्न होतील, असी जवळपासची एखादी स्थाईक इनामी जमीन १०।१५ हजार रुपये पर्यंत श्री नरहरीच्या नांवें खरेदी करावयाची. महाराज, आलेल्या सर्व ज्ञातींच्या अतिथींस अन्नदानानें तृप्त करीत असत, यास्तव तें त्यांचें स्मरण जगास निरंतर राहण्यासाठीं देवळाच्या ओऱ्यांत वस्ती करून राहिलेल्या अथवा येऊन ठेपलेल्या आंधळे पांगळे, लुले वगैरे शरीरापंग आणि व्याधिग्रस्त अशा अनाथ लोकांस अन्न देण्यासाठीं दरमहा ७५ रुपये शेंकडा पांच आणे मितीनें उत्पन्न होतील, अशी पंचवीस हजारांची रकम एखाद्या सचोटीच्या पेढीवर अथवा सरकारी ब्यांकेंत देवाच्या नांवें अखंड ठेवावयाची. श्रीनरहरींची शिलामय भव्य उग्र मूर्ति तंजावराहून तयार करवून आणविणें, तसेंच देवाच्या देवपूजेचें, रोषनाईचें, पालखी मिरवणुकीचें, नगारखान्याचें आणि अन्नसत्राचें, वगैरे सामान खरेदी करण्याकडे पांच हजार रुपये लावावयाचे असा एकंदर मंडळीचा घाट आहे.

ह्या महाराजांच्या सर्व स्मारक कृत्याकडे एकंदर सुमारें लाखरुपायांची रकम केवळ लोकाश्रयावर उत्पन्न करावयाची, तेव्हां नाशिक येथें स्वस्थ बसून नुसते चटक्याचे मांडव उभारण्यानें स्थिति लागावयाची नाहीं; यास्तव संस्थानिक-राजेरजवाडे, जाहागीरदार इनामदार व मोठमोठे श्रीमान् गृहस्थ, यांजकडेस कांहीं प्रमुख मंडळींनीं गांवोगांव जाऊन मागणी करण्यास फिरावें, असा पुढारी मंडळींत विचार ठरला मग तशा उद्देशानें प्रथमतः श्रीमंत राजे पतंगशहा महाराज संस्थान जव्हार जिल्हा ठाणें यांजकडे रा० रा० तात्यासाहेब जोगळेकर, दाजीसाहेब मुठे, वामन भाऊ वाड गोपाळराव बिवलकर, गोपाळराव चांदवडकर आणि बाळाचार्य मांडवगणे हे सहा गृहस्थ जाऊन त्यांनीं मंदिरासाठीं एकंदर

लागणाऱ्या लांकडांचें महाराजांच्या नांवें विनंतिपूर्वक मागणें केलें. महाराजांचें नांव ऐकून व त्यांच्या स्मारकाचा मंडळीचा स्तुत्योद्देश आणून राजे साहेबांना तत्काल दर १२ रुपये प्रमाणें एक हजार तुळया ( दांड्या ) आणि दर तीन रुपये प्रमाणें एक हजार पल्लेदार वांसे, मिळून पंधरा हजार रुपये किंमतीचीं आपल्या जंगलांतील उत्तम सागवानी लांकडें तोडवून तयार करवून तीं पुढें येणाऱ्या कार्तिक मासावर आपल्या हद्दींतील डहाणु रेल्वेस्टेशनावर पोंचवून देण्याचें मोठ्या आनंदानें कबूल केलें. याचें नाव औदार्य व याचें नांव उदार आश्रय! एकंदरींत महाराजांची तशीच सबळ पुण्याई कीं, कोठें कोणाकडेही त्यांचे स्मारकसंबंधानें कांहीं मागणें केलें असतां तो महा कृपण किंवा दरिद्रीजन असो. तथापि त्यास तत्क्षणीं सद्वासना उत्पन्न होऊन तो स्वशक्त्यनुसार महाराजांच्या सत्कृत्यार्थ आपला हात पुढें सरसावील, तर मग राजे पतंगशहासारखे श्रीमान् व महोदार राजपुरुष महाराजांच्या कार्यीं मनोत्साहानें धौतालवतील, यांत आश्चर्य काय!! असो.

शिवाय मंडळीच्या प्रयत्नानें गेल्या चैत्रमासापर्यंत मंदिराकरितां लोकाश्रय मिळाला तो.तपसीलवार रुपये.

३००० श्रीमंत रा० रा० माधवराव विठ्ठल उर्फ दादा साहेब फ० क्ला० सरदार व माजिस्त्रेट आणि त्यांचे पुतणे श्री० रा० रा० नरसिंगराव कृष्ण उर्फ रावसाहेब फ० क्ला० सरदार व माजीस्त्रेट या उभयतांकडून त्यांच्यासंस्थानविंचूरइलाख्यांत वर्गणी जमून रक्कम आली ती.

१०० श्री. राजे रामसिंग संस्थान दरभंगा यांची भेट देवळाली मुक्कामीं मंडळीनीं घेतल्यावरून त्यांनीं रोख देऊन पुढें आणखी मदत देण्याचें कबूल केलें.

३०० रेल्वे स्टेशन विगतपुरी जिल्हा नाशिक येथें मंडळी गेल्यावरून तेथील सार्वजनिक वर्गणी मिळाली ती.

५१ रा० ग० यशवंतराव महादेव तहशीलदार जिल्हा वणी प्रांत वऱ्हाड यांजकडून आले.

५१ श्री० रा० रा० चिमणाजी सदाशिव बर्वे जहागीरदार कोटुरें.

५१ श्री० रा० रा० रामचंद्र राजाराम जहागीरदार पिंपळदकर.

१०० रा० रा० भाऊसाहेब पंडित वस्ती नाशिक.

१०० रा० रा० कृष्णशास्त्री झांबरे व० नाशिक.

येणेंप्रमाणें अधिक चैत्र मासापर्यंत द्रव्याश्रय मिळून खेरीज स्मारक-मंडळींनीं देशावरावर गांवगांवीं व नाशिक जिल्ह्यांत विनंतिपत्रें पाटविलेल्या गृहस्थांकडून पांचांपासून शेंकडों रुपयांपर्यंत द्रव्यसाह्य आलें व येत आहे, असें समजतें. यापुढें माळवा, ग्वाल्हेर; नेमाड, वऱ्हाड, नागपुर, मोगलाई, पुणें, मुंबई, गुजराथ, काठेवाड वगैरे प्रांतांत स्मारक कार्योद्देशानें फिरावयास जाण्याचा मंडळीचा विचार घाटत आहे, परंतु घरचा मोहमायापाश सुटून सारखे ५।७ महिने हा प्रवास करण्याकरितां मंडळीचा पाय बाहेर पडेल तेव्हां खरें आणि तसें घडेल तरच मंडळी जव्हार संस्थानाप्रमाणें भरपूर द्रव्यलाभ पावून यशस्वी होईल. या हातीं धरलेल्या लाखों रुपयांच्या जगड्वाल कामास लोकांकडून ५।१०।२५।५० रुपयांच्यां मदती येण्याची वाट पहात बसणें यानें कार्यसिद्धि व्हावयाची नाहीं. आतां "मुंगीचा साखररवा हत्तीची क्षुधा कितपत शमवील" हा विचार मनांत आणून आपल्या हेत्वनुरूप मंडळींनीं "शुभस्य-शीघ्रं" या वाक्याप्रमाणें लवकर बाहेर पडावें अशी तीस या लेखानें पूर्ण सूचना आहे.

वर्गणी गोळा करण्याचे कामीं मंडळीच्या साह्यानें दाजीसाहेब मुठे यांची विशेष खबरदारी असून लोकांकडून येत असलेल्या रकमा महाराजांच्या स्मारक-कीर्दीस जमा करून त्यांवर्दीस वक्तशीर पावत्या देण्याचें त्यांजकडून होत आहे. त्याप्रमाणेंच श्रीनरहरीच्या मंदिराचे पाया भरण्याचें काम मुठे आणि भाऊसाहेब हाडपसरकर ह्यांच्या खऱ्या मेहनतीच्या देखरेखीखालीं बारा आणे होत आलें आहे.

आतां ह्या ठिकाणीं पुन्हां एक खेदकारक घडलेली गोष्ट कळविणें ओघानें भाग येत आहे, ती ऐकून वाचकांस फार वाईट वाटेल, यांत संशय नाहीं. परंतु जी गोष्ट केवळ ईश्वराधीन तेथें कोणाचाच उपाय नाहीं! महाराजांच्या पश्चात् जो कायावाङ्मनधनें त्यांच्या सेवाभजनीं तत्पर झाला; आणि जो महाराजांच्या स्मारक कार्य भागीं स्वतःखपून शिवाय त्या कामास लागणारे मजूर वगैरे लोक तसेंच चुना दगड वगैरे सामान जें जें पाहिजे असेल, तें मंडळीस थोडक्या खर्चांत वक्तशीर पुरविण्यासाठीं जो निरंतर ताबेदारासारखा उभा असे; आणि महाराजांच्या चितास्थानीं दर्यापूरच्या बाईनीं बांधणें ठरलेल्या अष्टपैलु चबुतऱ्यावर लहानशा शिलामय सुरेख सिंहासनावर संगमरवरी तयार करून ठेविलेल्या महाराजांच्या पादुका स्थापन करण्याचा ज्याचा कृतनिश्चय; आणि पाटांगणावर दरसाल आठमाही मांडव घालून तेथें महाराजांचा प्रतिवार्षिक बारा दिवस स्वताच्या खर्चानें उत्साह करण्याचा ज्याचा कृतसंकल्प; असा तो सर्वप्रिय व चित्तोदार पुरुष मोहन मास्तर हवेच्या उपद्रवानें अधिक चैत्र कृष्ण ७ मंगळवार रोजीं महाराजांच्या साक्षाद्दर्शनासाठीं वैकुंठगामीं झाला ! ! हरहर ! कायतें रूप ! कायतो बांधा ! काय ती इभ्रत ! काय तो जेठीपणा ! असा तो मोहन मास्तर महाराजांच्या निधनदिवसापासून सर्वविख्यातीस

येऊन पुढें चार महिने लोटत आहेत तोंच, विझत असलेला दिवा एकदम मोठा होऊन जात असल्याप्रमाणें त्याची स्थिति झाली ! जीवित्व हें क्षणभंगुर असल्यामुळें मनुष्याची इच्छा, हाव, धांव उमेद, हौस, मीपणा इत्यादि सर्व व्यर्थ असल्याची वारंवार खात्री होत असतां, तो आपल्यास चिरायु समजून मोहावर्तभ्रमणानें त्या जगन्नियंत्या परमेश्वरास न जाणतां स्वेच्छाचारी होतो, याहून दुसरें कोणतेंच आश्चर्य नाहीं ! ! ! असो. मोहन मास्तरच्या या अकालिक जाण्यानें सर्व नाशिककरांस हळहळ तर लागून राहिलीच, परंतु पुढारी मंडळीची एक बाजू खचली, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं.

देवळाचे पाया भरण्याचें काम बहुतेक आजपर्यंत पूर्ण झालें यापुढें पाथरवटी व गवंडीकाम लवकरच सुरू होणार. त्याप्रमाणेंच इकडे महाराजांच्या समाधीचा अष्टपैलु चबुतरा सुरेख रीतीनें तयार होऊन होणाऱ्या छत्रीचें काम मंडळीकडून मोठ्या धडाक्यानें चाललें आहे. आतां यांत उणीव इतकीच कीं या छत्रींत मुळच्या चबुतऱ्यावर मोहनमास्तराकडून लहानसें सुरेख अष्टपैलु सिंव्हासन तयार होऊन त्याजवर त्याच्या हातानें महाराजांच्या पादुका स्थापन व्हावयाच्या, परंतु त्यांजकरवीं तें काम घडून येण्याचा योग ईश्वरानें सर्वथैव तुटविल्यामुळें आतां तें पादुकास्थापन कोणा हरीच्या लालाच्या हातून होईल तें होवो ! असो, या समाधीच्या भोंवतालीं चौफेर सुमारें सत्तरशें हमचौरस हात चिरेबंदी पाटांगण बांधण्याचें मंडळीच्या मनांत आलें. तेंही काम पुरें होण्यास प्रभुसत्तेनें कांहींच उशीर लागत नाहीं. महाराजांची अशीच कांहीं जबरदस्त पुण्याई व थोरभाग्य कीं त्यांच्या संबंधानें ज्या ज्या गोष्टी मनांत आणाव्या किंवा योजाव्या, त्यांची त्यांची तत्काल आपोआप सिद्धि घडून येत आहे ! काय चमत्कार पहा ! पाटांगण बांधण्याचें